म. ग्रं. सं. ठाणे
विषय का/०२
सं. नं. ३००
१९८८

२०१

काव्य

नं. २०१
म. ग्रं. सं. ठाणे २०१

| | |
|---|---|
| विषय | सन |
| का/०२ | १९८८ |
| संग्रहालय क्रमांक | |
| ३०० | |
| ३०० | |

लेखक रा. भि. जोशी

पुस्तकाचें नांव पद्यसमुच्चय पुस्तक पहिले भाग १

[ हें पुस्तक सन १८६७ चे २५ वे आक्टाप्रमाणें नोंदून कर्त्यांनें सर्व प्रकारचे हक्क स्वाधीन ठेविले आहेत. ]

# प्रस्तावना.

[ पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीची. ]

ॲंग्लोव्हर्न्याक्युलर स्कुलांतील पहिल्या तीन इयत्तांमध्यें मुलांस मराठी कविता शिकवितात. त्या करितां नवनीत वगैरे पुस्तकें आहेत. परंतु ज्यांत इंग्रजी पुस्तकांचे नमुन्यावर लहान लहान उतारे आहेत, व ज्यांत विशेषतः उपदेशपर किंवा सृष्टिवर्णनपर चुटके आहेत, असें पुस्तक असल्यास तें मुलांस सध्याचे क्रमिक पुस्तकांतील व नवनीतादि पुस्तकांतील लांब व कठीण आख्यानां-पेक्षां विशेष ग्राह्य होईल, अशी आमचे शाळेतील शिक्षकमंडळी-ची कल्पना होती. तीप्रमाणें तशा प्रकारचें एकादें पुस्तक तयार करावें असें रा० रा० वामन शिवराम आपटे, एम्. ए., हे आमचे शाळेचे सुपरिंटेंडेंट असतांना यांनीं मला सांगितलें. यावरून सध्याचें पुस्तक तयार केलें आहे.

जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांत उपदेशपर, ज्यांना इंग्रजींत Moral Pieces असें नांव देतां येईल अशा प्रकारचे, व सृष्टिवर्णन पर उतारे फार कमी सांपडतात. त्या कवींचा उपदेश बहुशः वेदांताकडे वळतो. व सृष्टिवर्णनें हीं अगदींच मर्यादींत असून सर्वत्र एकसारखींच असतात. शिवाय पाश्चिमात्य कवींच्या प्रमाणें प्रत्यक्ष सृष्टिशोभा पाहून लिहिलेलीं वर्णनें आमचे कवींचे ग्रंथांत नाहींतच म्हटलें तरी चालेल! तथापि इतर गुणांनीं पाहिलें असतां मुक्तेश्वर, मोरोपंत, वामन, आनंदतनय, रघुनाथ पंडित इत्यादि कवींच्या ग्रंथांत बाहारीचीं स्थळें पुष्कळ आहेत. मोरोपंत व वामन या कवींची ग्रंथरचना ज्या मुलांकरितां पुस्तक तयार

१-न 2239

THE NEW ENGLISH SCHOOL SERIES OF TEXT-BOOKS

# पद्यसमुच्चय.

[ मराठी कवितांचे वेंचे; स्पष्टीकरण, टीका व कठीण शब्दांचा कोश यांसहित. ]

## पुस्तक पहिलें.

आवृत्ति दुसरी.
(सुधारून वाढविली)

पुणें येथें,
"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापिली.

सन १८८७.

किंमत आठ आणे.

केलें आहे, त्यांना जरा कठीणच आहे. तथापि त्यांच्या ग्रंथांतले सुलभ उतारे निवडून काढले आहेत.

प्रथमावृत्तींत नवीन कवींच्या कृतींस बरेंच स्थळ दिलें होतें, पण कविता शिकण्याचा जो उद्देश तो यापासून सिद्धीस जात नाहीं असें पुष्कळ मित्रांचें मत पडल्यावरून ते बहुतेक उतारे या आवृत्तींतून काढून टाकले आहेत, व त्यांचेबद्दल जुन्या कवींचे उतारे घातले आहेत. या पुस्तकाचे तीन भाग केले आहेत. पहिल्या भागांतील कवितांपेक्षां दुसऱ्या भागांतील कविता ज्यास्त कठीण आहेत; व त्यांपेक्षां तिसऱ्या भागांत कठीण कविता घातल्या आहेत. प्रत्येक भागांतल्या उताऱ्यांची रचना मात्र सुलभ व कठीण यांचेवरच फक्त नजर ठेवून केली नसून तींत विषयवैचित्र्यावर व एकाच कवीचे उतारे एके जागीं येऊं नयेत, यावर धोरण ठेविलें आहे. पहिल्या आवृत्तीचा उपयोग शाळेंत करून पहिल्यावर ज्या अडचणी शिकवितांना आल्या, त्यांतल्या करवतील तितक्या नाहींशा केल्या आहेत. मूळ पुस्तकांत पहिल्यापेक्षां ज्यास्त कविता घातल्या आहेत; शेवटल्या टीपाही पुष्कळ वाढविल्या आहेत; व शेवटीं कठीण शब्दांचा एक कोश दिला आहे. परंतु मुलांनीं या पुस्तकावरून मराठी कविता आपल्या आपण वाचावयास शिकाव्या असा उद्देश असल्यामुळें या टीपा व कोश यांपासून कठीण स्थळीं मात्र शिकविणारे व शिकणारे यांस उपयोग व्हावा, अशी त्यांची रचना केली आहे. मुलांस निरनिराळ्या महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांची ओळख होऊन त्यांना कविता वाचण्याची गोडी लागावी, हा या पुस्तकाचा मूळ उद्देश आहे. तो कितपत सिद्धीस जातो, याचा अनुभव शिकविणारांनीं घ्यावा.

ही आवृत्ति प्रथमावृत्तीपेक्षां सवाईपेक्षां ज्यास्त वाढली आहे. व

टीपा आणि कोश हीं बारिक अक्षरांनीं छापल्यामुळें एकंदर मजकूर दिढीनें वाढला आहे, त्यामुळें किंमत कमी करितां आली नाहीं. पुस्तक फार शुद्ध छापून निघावें असा उद्देश होता; परंतु तें छापत असतां प्रकृतीस अस्वास्थ्य असल्यामुळें तें मनासारखें शुद्ध निघालें नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते.

या नवीन आवृत्तीची तयारी करीत असतां निवड करून काढलेले उतारे पहाण्यांत रा० रा० परशुराम नारायण पाटणकर बी. ए. डे. ए. सोसायटीचे लाइफ मेंबर, यांनीं आपला अमोलिक वेळ खर्च केला; व पुस्तक छापत असतां रा० रा० गणेश रामचंद्र दातार, असि० मास्तर न्यु-इंग्लिश स्कूल यानींही फार मदत केली; याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

न्यु-इंग्लिश-स्कूल, पुणें
ता० २० जानेवारी १८८७.

रा० भि० जोशी.

२– ३ रामनाम .. .. .. .. .. .. .. ३२
२– ४ कालियामर्दन.. .. ... .. .. .. ३६
२–१५ भरतभाव .. .. .. .. .. .. ५८
३–१२ भामा-प्रकोप.. .. .. .. .. .. ८४
३–१४ नीतिपर श्लोक .. .. .. ... ... ८८

८ मोरोपंत.

१– २ मोरोपंताची कविता .. ... .. .. २
१–११ कर्णास श्रीकृष्णाचें भाषण .. .. ... १२
१–१५ धर्म युद्धांतून पळत आहे,
व कर्ण त्याचा उपहास करितो. .. .. १७
१–२० रामकृष्ण व नंदयशोदा यांची भेट .. .. २४
१–२२ संशयरत्नमाला .. .. ... .. .. २७
२– २ सदुपदेश .. .. .. .. ... .. ३४
२– ६ भीम आणि दुर्योधन यांचें
कोपयुक्त भाषण .. .. .. .. ४१
२– ९ अर्जुन ब्राह्मणसमुदायांतून उठून
यंत्र भेदन करावयास जात आहे .. .. ४५
२–११ भीष्मार्जुन युद्ध .. .. .. .. ... ४७
२–१४ पांडव अज्ञातवासांतून प्रगट होतात .. ५६
३– २ नीतिबोध .. .. .. .. .. .. .. ७२
३– ४ सेतुबंधावर उत्प्रेक्षा .. ... .. .. .. ७५
३– ६ भीष्म व परशुराम .. .. .. .. .. ७७
३– ८ शर्मिष्ठा व देवयानी यांचें भांडण.. .. .. ८०
३–१० दुर्योधन स्वसैन्यास धीर देत आहे .. .. ८२
३–१३ भीमाचें दुर्योधनाशीं त्या-
च्या अंतकाळचें भाषण .. .. .. .. ८६

३–१६ मोरोपंताची केकावली .. .. .. .. .. .. ९५
३–१८ यमधर्म व सावित्री .. .. .. .. .. .. ९९
३–१९ प्रद्युम्नाख्यान .. .. .. .. .. ..१००
३–२० अर्जुन अभिमन्यू करितां शोक करितो.. ..१०४

९ कृष्णशास्त्री चिपळूणकर.
१– ३ कुबेराची नगरी .. .. .. .. .. ३
१–१२ पक्षाचें घर.. .. .. .. .. .. .. १३
१–२३ अन्योक्ति ( गज, हरीण, वृक्ष, चंदन ) .. २९
२– ५ विद्याप्रशंसा .. .. .. .. .. .. ३९
२–१७ अन्योक्ति ( कोकिल, चातक, मयूर, शुक, बक, सिंह. ) .. .. .. .. ६५
३– ५ उज्जयिनी व तेथील महांकाळेश्वर .. .. ७५
३–२२ अन्योक्ति ( केतकी, वट, निवडुंग, सूर्य, चंद्र, हंस ) .. .. .. ..११०

१० पांडुरंग व्यंकटेश चिंतामणीपेठकर.
१– ७ बैरागी.. .. .. .. .. .. .. ८
३–२१ हिमालयपर्वतावरील सृष्टिशोभा .. .. ..१०५

११ विष्णु मोरेश्वर महाजनी.
१– १ विश्वमंदीर .. .. .. .. .. .. १
२– १ ईश्वराचें प्रातःस्तोत्र.. .. .. .. .. ३२
३– १ हिमालयावर बसून केलेलें ईश्वराचें प्रातःस्तवन.. ६९

१२ कृष्णशास्त्री राजवाडे.
१–२१ वसंतऋतूचें वर्णन.. .. .. .. .. .. २५
२–१२ वर्षाऋतूचें वर्णन .. .. .. .. .. ४९
३–१७ शरदागम .. .. .. .. .. .. .. ९७

१३ विनायक कोंडदेव ओक.

३– ७ रामशास्त्री यांनीं राघोबास सांगितलेलें प्रायश्चित्त .. .. .. .. .. .. ७९

**१४ पांडुरंग गोविंद पारखी.**

३– ३ प्रातःकाल .. .. .. .. .. .. .. ७३

**१५ हरि कृष्ण दामले.**

३–११ पतिनिमित्त शोक .. .. .. .. .. ८३

**१६ केशव सदाशीव रिसबूड.**

२–१० उद्योग .. .. .. .. .. .. .. ४६

**१७ वासुदेवशास्त्री खरे.**

१–१३ जुनें पुणें.. .. .. .. .. .. .. १४

१–१४ आजचें पुणें .. .. .. .. .. .. १५

३– ९ कोंकणप्रांत.. .. .. .. .. .. .. ८१

**स्पष्टीकरण व टीका.**

भाग १ .. .. .. .. .. .. ..११३

भाग २ .. .. .. .. .. .. ..१२१

भाग ३ .. .. .. .. .. .. ..१३०

**कठीण शब्दांचा कोश.**

# पद्यसमुच्चय.

## पुस्तक १.

## भाग पहिला.

---

### १. विश्वमंदिर.

#### श्लोक.

ईशें विश्व-विशाल-मंदिर पहा ऐसें कसें निर्मिलें!
शोभा दाखविण्यास हेर रुचिरीं द्वारीं उभे ठाकले.
येती प्रेक्षक जे तयांस बघुनी ते बाहती सत्वरीं:—
"याहो या, जनहो, विलोचन सुखा घ्या, या शिरा मंदिरीं!" १.
"याहो आंत, पहा चमत्कृति किती, द्या इंद्रियां तर्पण,
नेत्रां चित्र-मनोहराकृति, तसें श्रोत्रांस मंजु स्वन;
द्वारीं मात्र करा प्रणाम शिरसा त्या ईश्वरातें अधीं,
जो दे सर्व तुम्हां, तया स्तुतिसुमां अर्पा तुम्ही हो सुधी!" २.
येणेंपरी नमुनियां जन आंत जाती,
विश्वास पूर्ण धरुनी बहु सौख्य घेती;
वाहे समीर, मकरंद हरी फुलांचा,
संताप सर्व शमवी झणिं मानसींचा. ३.
श्रवण, नयन धाले; लोटला मोदपूर;
हृदयिं विकसलें तें प्रेम, विश्वास थोर;
नयनगतिहि जेणें बद्ध केली पुरा तें
पटल गळुनि जातें; गूढ ना तैं नरातें. ४.

जें अगम्य मुनिदृष्टिस होतें,
विश्वकर्तृमुख आज दिसे तें;
प्रीतिचा प्रभु असेच भुकेला,
हा प्रसाद मनुजांवरी केला. ५.
जे न वंदिति पदांस विभूच्या;
भाव ही न धरिती वरि त्याच्या,
ते जरी प्रविशती सदनांत
त्यांस हा सुखनिधी न मनांत. ६.

कुसुमांजलि. वि० ज्ञा० वि.

---

## २. मोरोपंताची कविता.

### आर्या.

आर्या आर्यांसि रुचे; ईच्या ठायीं जशी असे गोडी
आहे इतरां छंदीं गोडी, परि यापरीस ती थोडी. १
काव्य करावें, म्यां नच वचकावें दूषितो परि लघूस;
कां न सदन बांधावें? कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ! २
आर्य कथा-छंदानें, आर्या-छंदेंचि जन्मलीं सरलें;
यांहीं माझें तनु-वाक्कर्म-मनःपाप सर्वथा सरलें. ३
गीर्वाण शब्द पुष्कळ, जनपदभाषाचि देखतां थोडी;
यास्तव गुणज्ञलोकीं याची घ्यावी हळू हळू गोडी. ४
प्राकृत-संस्कृत-मिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कंथा,
भव-शीत-भीति-भीत-स्वांताला दाविला बरा पंथा. ५
भगवद्भक्तानुज्ञा कीं गाव्या सत्कथा यथामति, तें
स्वीकारिलें स्वहित म्यां, नमुनि स्वसुरद्रुमा रमापतितें. ६

मोरोपंत.

---

## ३. कुबेराची नगरी.

साक्या.

जेथें नित्य फुलुनि तरू, त्या–वरी गुंतती भृंगे;
नित्य डोलती, विकसति नलिनी कलहंसांच्या संगें; १
नित्य नाचती मोर उभारुनि सुंदर थोर पिसारे;
प्रकाशुनीयां नित्य चंद्रही उजळी प्रदेश सारे. २
मधुर मृदंगादिक वाद्यांचे ध्वनी ज्यांत उठताती,
तळीं जयांच्या बिंबुनी तारा फुलांपरी दिसताती. ३
अशा मंदिरीं रत्ननिर्मितीं यक्ष बसुनि आनंदें
सेवे प्राशिती विलासिनींच्या, मधुर मधु स्वच्छंदे. ४
गंगातीरीं कल्पतरूतळीं सुटतां मंजुळ वारे,
क्रीडति धन्या किन्नरकन्या जेथें बहुप्रकारें. ५
कुबेरमित्रत्वास्तव जेथें करितो शंकर वास,
भयें तयाच्या चाप धराया धैर्य नसे मदनास; ६
वस्त्रें उत्तम, सुगंध सुमनें, मदिरा मधुरहि फार,
परोपरीचीं रत्नकंकणें, तसेच मौक्तिकहार. ७
लाल कराया पाय रंगही, उटी तशी अंगास,
सर्वहि देई कल्पवृक्षची एक जिथें वनितांस. ८

पद्यरत्नावलि.

---

## ४. संस्कृत व मऱ्हाठी.

सुरस, सुंदरी, पवित्रसृष्टी, पक्वान्नें निपजवूनि पाठी,
संस्कृत-शब्द-सुवर्ण-ताटीं श्रेष्ठश्रेष्ठां वोगरिलीं. १
तींचि रसायन दुर्बळपणीं महाराष्ट्रभाषा-रंभा-पर्णी,
वाढिलें, तरी भुकाळू जनीं न सेविजे किमर्थ ? २

समर्थ-पणें कवि-पंडितीं सर्वज्ञतेच्या रत्नदीपीं,
निर्गुण निर्विकार पशुपती कनक कमळीं अर्चिजे. ३
तेथें भावार्थी मी दुर्बळ, धत्तूर-पुष्प माझे बोल,
अल्पमतीचेनि मोल काढविती ते केंवी. ४
तथापि दोहीं ठायीं सरिसा मोह कराल हा भरंवसा,
कां सान-थोर महेशा भजतां असे कडसणी ? ५
आणि ईश्वरस्वरूपीं डोळस, त्यांसी वर्णावर्णीं द्वेष
नुपजे, जैसा सूर्य-प्रकाश नेणें कदा तमातें. ६
तेंवी अर्थीं घालितां दृष्टी, न म्हणे संस्कृत-मऱ्हाठी,
रत्न-कुंभीं कीं मृत्तिका-घटीं गंगोदक सारिखें. ७
व्यास-वचन इक्षु-दंडू गाळुनी सुरस सारांश गोडू,
देशभाषां वळिले लाडू नावदेचे आवडी. ८
ते जैसे सुज्ञी न सेवणें, तैं आग्रहा वांचूनि काय म्हणणें,
कळंक रेखेस्तव चांदणें काय चकोरीं वाळिजे ? ९
व्यास-ग्रंथ-गिरीचें सोनें, संस्कृत-खोटिये गाळूनि मनें,
देश-भाषा घडिलें लेणें, साहित्यरत्नीं सु-जडित. १०
तें लेववितां कर्णभूषण, कां हो परते करावे कान,
श्रोते हो तुम्ही विचक्षण निर्मत्सर विचारा ! ११

मुक्तेश्वर.

---

## १. मनास बोध.

### श्लोक.

मना सज्जना, भक्तिपंथेंचि जावें,
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें;
जनीं निंद्यतें सर्व सोडोनि द्यावें,
जनीं वंद्य तें सर्व-भावें करावें. १

 आ॰ २०७

मना वासना दुष्ट कामा नये रे !
मना सर्वथा पापबुद्धी नकोरे;
मना सर्वथा नीति सोडूं नको हो,
मना अंतरीं सार वीचार राहो. २
मना पापसंकल्प सोडोनि द्यावा;
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा;
मना कल्पना ते नको वीषयाची,
विकारें घडे हो जनीं सर्व छी छी ! ३
नकोरे मना क्रोध हा खेदकारी,
नको रे मना काम नाना विकारी.
नको रे मना सर्वदा अंगिकारूं
नको रे मना, मत्सरू दंभ-भारू. ४
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें,
मना बोलणें नित्य सोशीत जावें;
स्वयें सर्वदा नम्रवाचे वदावें,
मना सर्व लोकांसि रे नीववावें. ५
तनु त्यागितां कीर्ति मागें उरावी,
मना सज्जना, हेचि क्रीया धरावी;
मना चंदनाचे परी त्वां झिजावें,
परी अंतरीं सज्जना नीववावें. ६
जगीं सर्वसूखी असा कोण आहे
विचारी मना, तूंचि शोधोनि पाहे.
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें,
तया सारिखें भोगणें प्राप्त झालें. ७
मरे एक त्याचा दुजा शोक वाहे,
अकस्मात तोही पुढें जात आहे;

पुरेना जनीं लोभ रे क्षोभ होतो,
म्हणोनी जनीं मागुती जन्म घेतो. ८
मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी,
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी,
सदा बोलणें नम्र, वाचा सुवाचा,
जनीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ! ९
अती लीनता सर्वभावें स्वभावें,
सदा सज्जनालागिं संतोषवावें;
तयाकारणीं सर्व लावीत जावें,
सगूणीं अतीआदरेंशीं भजावें. १०
विवेकें क्रिया आपुली पालटावी,
अती आदरें शुद्धबुद्धी धरावी;
जनीं बोलण्यासारखें चाल बापा !
मनीं कल्पना सोड, संसार-तापा. ११
सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें,
क्रिया पालटे, भक्ति-भावार्थ लागे;
क्रियेवीण वाचाळता ते निवारीं,
तुटे वाद, संवाद तो हीतकारी. १२
धरीं रे मना संगती सज्जनाची
जिणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची;
बळें भाव हा, वृत्तिसन्मार्गिं लागे,
महाक्रूर तो काळ विक्राळ भंगे ! १३

रामदास.

## १. राम शिवधनुष्य उचलण्यास जातात.

### श्लोक.

सवाई. या परिचें भव-ताप-विमोचन
चाप शरांकित, भव्य-मती
पाहुनि, सर्व-नृपांहुनि उत्तम
लाहुनि तोष, पुसे नृपतीः—
" कोण असे महि-पालक-बालक ?
हे जन-चालकसे सुचले;
सांग मला सहसा गमनाशय,
चांग मनासि मला रुचले ! " १
हांसोनियां, नृपसभे मुनिराज बोले,—
स्वानंद-संभ्रम-भरें हृदयांत डोले;
" हा जी नृपा ! बहुत भाग्य जगीं उदेलें !
याच्या गुणें दुरित-दैन्य समस्त गेलें. २
साकेताधिप-बाल हे, रण-तटीं रक्षोगणा काल हे,
दीनाचे कनवाळ हे प्रतिपदीं, राया ! जगत्पाल हे,
पुर्ते हे शुभलक्षणी, रतसदा धर्मै-करूं-रक्षणीं,
आनंदाब्धि अनुक्षणीं भरतसे यांच्या कृपा-ईक्षणीं ! ३
यांहीं दुःसह ताटिका निवटिली, निष्कंटका मेदिनी—
केली काननिं, यांचिया शर-गतीं पाताळभू-मेदिनी;
तो मारिच नभीं झुगारुनि, शरें केला सुबाहू पुरा,
नेला सिद्धिस यज्ञ, ते प्रवर हे आले तुझ्याही पुरा. ४
चापा नृपा, आणि महोत्सवातें
आले पहाया, बल-वैभवातें;
मार्गी अहिल्या विपिनांत रामें
केली शिला-मुक्त मनोभिरामें. " ५

परिसुनि मन रायें दाटलें रामपायीं
म्हणत मनीं, " करावा सोहिरा हा उपायीं;
कठिण तरि पणाचा व्यर्थ संकेत केला,
रघुवर नवरा हो धन्य या कन्यकेला ! " ६

भूपातें निरखी दिठीं निज-सखी-संगे, रमे सारखी
शोभे, तेचि उखी विखी-शशिमुखी माडीवरी पारखी;
झाली बुद्धि फिकी, नृपाकृति निकी, मानोचना आन कीं
लक्षी राघव कौतुकीं, तंव तुकी माया मनीं जानकी ! ७

आनंदतनय.

---

## ७. बैरागी.

### श्लोक.

ज्यांच्या माथ्यावरि बहु जटा पिंगटा शोभतात,
चित्ताभस्मे खळित तनु, रुद्राक्षमाळा गळ्यांत,
हातीं शूल प्रकट दिसतो, व्याघ्रकृत्ती बसाया,
हे गोसांवी झिजविति तपें या ठिकाणीं स्वकाया. १

ज्यांचें शोभे परमरुचिरें ऊर्ध्वपुंड्रें कपाळ,
काया गंधें करुनि, तुळसीलंबनें कंठनाळ,
वक्त्रीं कृष्णस्मरण, बसण्या निर्मिला कृष्ण-कृत्ती,
हे बैरागी दिसति करितां ध्यान एकाग्रवृत्ती. २

गंगावर्णना.

---

## ८. कुपुत्र लक्षणें.

### अभंग.

मायबापें केली आस, झाला बायकोचा दास;
झाला बायकोच्या बोला, सख्या भावाशीं अबोला;

बायकोच्या ऐकुनि गोष्टी, लागे बहिणीच्या पाठीं;
बायकोला पितांबर घट्टी, आईच्या लुगड्याला बारा गांठी;
मेहुणीला भरी चुडा, आईच्या हातांत कांकडा,
मावळणीला आशा गाळी, मेहुणीला पुरणपोळी.
आपण लावी रेशिमकांठी, बाप लावीतो लंगोटी.
गुरु शिष्य वैरकार, लेक धांवे बापावर;
आपण जेवी दूधभात, बाप देखुनि धुतो हात.
बापाच्या गळ्या दोरी, सासऱ्याला जवळ करी.
तुका म्हणे ऐशा नरा मोजुनि माराव्या पैंजारा. १

तुकाराम.

---

## ९. सत्याचा महिमा.

### ओव्या.

निर्जळीं शतकूपखनन तें एका वापिके समान,
शतभरी वापिकांचें पुण्य एकायज्ञीं पाविजे. १
शतक्रतूंचें सुकृत, एका पुत्रोत्पादनीं प्राप्त,
त्याचें श्रेय शतगुणित, सत्यरक्षणीं लाहिजे. २
अश्वमेध-शतांचें पुण्य, एकीकडे सत्य-वचन
तुळितां सत्य आगळें जाण, मेरु-सर्षप दृष्टान्तें. ३
चहूं वेदांचें साङ्ग ज्ञान सकळ तीर्थांचें अवगाहन,
त्यासी तुळितां यथार्थ-वचन, सत्य अगणित आगळें. ४
कोटीपुण्यें जोडिलीं यत्नीं, तीं जळती एके असत्य वचनीं
जैसा पावक स्फुल्लिंगकणीं नाशी कर्पूरगिरीतें. ५
सत्या परता नाहीं धर्म, सत्य तेचि परब्रम्ह,
सत्यापाशीं पुरुषोत्तम सर्वकाळ तिष्ठत; ६
सत्यें नेमिला न चळे नेम, त्यासी वोळगे मोक्ष-धाम,

घोर संसार-भयाचें नाम स्पर्शों न शके कल्पांतीं. ७
असत्य तेंची पैं पातक असत्य तोची महानरक,
असत्याचेंनि संगें दुःख अनंत जन्मीं भोगिती. ८
सत्यामृताची कनकवाटी जोडिली न सांडे भूतटीं,
असत्य बुद्धीची नरोटी, पवित्र होते नातळे. ९

मुक्तेश्वर.

---

## १०. शिवधनुष्य-भंग.

### श्लोक.

घातली सदृढ कास राघवें,
वंदिलें गुरुपदाब्ज लाघवें;
ठेविला वरद हस्त मूर्धनीं,
'पात्र तूं विजय चाप मर्दुनी !' १
जनकजा मिरवे उपरीवरी,
सहचरी वसनांचळ सांवरी;
सखि म्हणे, 'रघुवीर उभा असे
धनुष भंगिल संशय हा नसे !' २
ती भूमीसि म्हणे, "उमानि धनुषा रामासि साह्या करीं,
शेषा लोटिं शरासनासि, तपना ओढीं सहस्त्रांकरीं,
शंभू कार्मुक आवरीं दशभुजीं, पृष्ठीसि कूर्मा धरीं,
चापा दिग्गज हो धरा, विधि तुवां होईं हळू तें करीं ! ३
तीर्थे, व्रतें, जप-पुरश्चरणादि दानें,
उद्यापनादि हवनें, द्विज-भुक्त मानें,
साह्या करो सुकृत पूर्विल आजि मातें,
भंगो शरासन खरें रघुवीरहातें ! ४
नाना तिणें नवसिले सुर भूमिसाक्षी,

भंगावया धनुष ऊदित सर्वसाक्षी;
श्रीमूर्ति ते उभि असे भुपतींत देखा,
त्याच्या स्वरूपिं दुसरा करि कोण लेखा ? ५
केयूरांगद कुंडलें मणगटीं, जांबूनदें कंकणें,
वांकी, तोडर गर्जती घनरवें, पादांबुजीं भूषणें,
सीता-चित्त-मयूर नृत्य करि तो श्रीराम सर्वांपुढें,
धीरोदार उभा, प्रतापमहिमा नेणोति शास्त्रें मुढें. ६
राजे मानव-देव-दानव-सभे नृत्यांगना नाचती,
वाद्यांचे घन-घोष होति, अवघे रामाकडे पाहती,
नाना तें चतुरंग सैन्य परिघीं पाहों उभें ठाकलें,
विप्रांचे जयशब्द होति अवघे चित्रोपमा थोकले. ७
उल्हासें चमकोनि जाय धनुषापाशीं, उभा राहिला,
सांगातें अवघे पुरोहित, पुढें श्रीराम तो एकला,
कोदंडासि सभेसमोर उजवें घालोनियां वंदिलें,
दोर्दंडें उचलोनियां चढविलें, कर्णांत तें ओढिलें ! ८
रामानें सहवर्तमान मुनिच्या कोदंड उच्चालिलें,
राजे आणि विदेह-संशय-धियां संयुक्त आस्फाळिलें,
सीता-चित्त-समेत ओढुनि, भृगूपुत्रादि साहंकृती
त्यांचा दुर्मद गर्व भंगुनि, धनूभृत्यक्तसर्वाकृती. ९
घोषें चाप कडाडिलें, रघुपती कोदंड ओढी बळें
तेव्हां कोटि कडाडिले घन, विजा, कोदंडकोलाहळें,
सीमा सांडिती सिंधु, मस्तक तुकी शंभू स्वयें आपुलें,
ते सर्व भुप रामशक्ति नयनीं देखोनी वेडावले ! १०

विठ्ठल.

परिसुनि मन रायें दाटलें रामपायीं
म्हणत मनिं, “ करावा सोहिरा हा उपायीं;
कठिण तरि पणाचा व्यर्थ संकेत केला,
रघुवर नवरा हो धन्य या कन्यकेला ! ” ६
भूपातें निरखी दिठीं निज-सखी-संगें, रमे सारखी
शोभे, तेचि उखी विखी-शशिमुखी माडीवरी पारखी;
झाली बुद्धि फिकी, नृपाकृति निकी, मानीचना आन कीं
लक्षी राघव कौतुकीं, तंव तुकी माया मनीं जानकी ! ७

आनंदतनय.

---

## ७. बैरागी.

### श्लोक.

ज्यांच्या माथ्यावरि बहु जटा पिंगटा शोभतात,
चित्ताभस्में स्त्रळित तनु, रुद्राक्षमाळा गळ्यांत,
हातीं शूल प्रकट दिसतो, व्याघ्रकृत्ती बसाया,
हे गोसांवी झिजविति तपें या ठिकाणीं स्वकाया. १
ज्यांचें शोभे परमरुचिरें ऊर्ध्वपुंड्रें कपाळ,
काया गंधें करुनि, तुळसीलंबमें कंठनाळ,
वक्त्रीं कृष्णस्मरण, बसण्या निर्मिला कृष्ण-कृत्ती,
हे बैरागी दिसति करितां ध्यान एकाग्रवृत्ती. २

गंगावर्णना.

---

## ८. कुपुत्र लक्षणें.

### अभंग.

मायबापें केलीं आस, झाला बायकोचा दास;
झाला बायकोच्या बोला, सख्या भावाशीं अबोला;

बायकोच्या ऐकुनि गोष्टी, लागे बहिणीच्या पाठी;
बायकोला पितांबर धट्टी, आईच्या लुगड्याला बारा गांठी;
मेहुणीला भरी चुडा, आईच्या हातांत कांकडा,
मावळणीला आशा गाळी, मेहुणीला पुरणपोळी.
आपण लावी रेशिमकांठी, बाप लावीतो लंगोटी.
गुरु शिष्य वैरकार, लेक धांवे बापावर;
आपण जेवी दूधभात, बाप देखुनि धुतो हात.
बापाच्या गळ्या दोरी, सासऱ्याला जवळ करी.
तुका म्हणे ऐशा नरा मोजुनि माराव्या पैंजारा. १

तुकाराम.

---

## ९. सत्याचा महिमा.

### ओव्या.

निर्जळीं शतकूपखनन ते एका वापिके समान,
शतभरी वापिकांचें पुण्य एकायज्ञीं पाविजे. १
शतक्रतूंचें सुकृत, एका पुत्रोत्पादनीं प्राप्त,
त्याचें श्रेय शतगुणित, सत्यरक्षणीं लाहिजे. २
अश्वमेध-शतांचें पुण्य, एकीकडे सत्य-वचन
तुळितां सत्य आगळें जाण, मेरु-सर्षप दृष्टान्तें. ३
चहूं वेदांचें साङ्ग ज्ञान सकळ तीर्थांचें अवगाहन,
त्यासी तुळितां यथार्थ-वचन, सत्य अगणित आगळें. ४
कोटीपुण्यें जोडिलीं यत्नीं, तीं जळती एके असत्य वचनीं
जैसा पावक स्फुल्लिंगकणीं नाशी कर्पूरगिरीतें. ५
सत्या परता नाहीं धर्म, सत्य तेचि परब्रम्ह,
सत्यापाशीं पुरुषोत्तम सर्वकाळ तिष्ठत; ६
सत्यें नेमिला न चळे नेम, त्यासी वोळगे मोक्ष-धाम,

समर्थ-पणें कवि-पंडितीं  सर्वज्ञतेच्या रत्नदीप्तीं,
निर्गुण निर्विकार पशुपती  कनक कमळीं अर्चिजे. ३
तेथें भावार्थी मी दुर्बळ,  धतूर-पुष्प माझे बोल,
अल्पमतीचेनि मोल  काढविती ते कैंवी. ४
तथापि दोहीं ठायीं सरिसा  मोह कराल हा भरंवसा,
कां सान-थोर महेशा  भजतां असे कडसणी ? ५
आणि ईश्वरस्वरूपीं डोळस,  त्यांसी वर्णावर्णीं द्वेष
नुपजे, जैसा सूर्य-प्रकाश  नेणे कदा तमातें. ६
तेवी अर्थीं घालितां दृष्टी,  न म्हणे संस्कृत-मऱ्हाठी,
रत्न-कुंभीं कीं मृत्तिका-घटीं  गंगोदक सारिखें. ७
व्यास-वचन इक्षु-दंडू  गाळुनी सुरस सारांश गोडू,
देशभाषां वळिले लाडू  नावदेचे आवडी. ८
ते जैसे सुज्ञीं न सेवणें,  तैं आग्रहा वांचूनि काय म्हणणें,
कळंक रेखेस्तव चांदणें  काय चकोरीं वाळिजे ? ९
व्यास-ग्रंथ-गिरीचें सोनें,  संस्कृत-खोटिये गाळूनि मनें,
देश-भाषा घडिलें लेणें,  साहित्यरत्नीं सु-जडित. १०
तें लेवविता कर्णभूषण,  कां हो परते करावे कान,
श्रोते हो तुम्ही विचक्षण  निर्मत्सर विचारा ! ११

मुकेश्वर.

---

## ५. मनास बोध.

### श्लोक.

मना सज्जना, भक्तिपंथेंचि जावें,
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें;
जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें,
जनीं वंद्य तें सर्व-भावें करावें. १

 मोडी 209

मना वासना दुष्ट कामा नये रे !
मना सर्वथा पापबुद्धी नकोरे;
मना सर्वथा नीति सोडूं नको हो,
मना अंतरीं सार वीचार राहो. २
मना पापसंकल्प सोडोनि द्यावा;
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा;
मना कल्पना ते नको वीषयाची,
विकारें घडे हो जनीं सर्व छी छी ! ३
नकोरे मना क्रोध हा खेदकारी,
नको रे मना काम नाना विकारी.
नको रे मना सर्वदा अंगिकारूं
नको रे मना, मत्सरू दंभ-भारू. ४
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें,
मना बोलणें नित्य सोशीत जावें;
स्वयें सर्वदा नम्रवाचे वदावें,
मना सर्व लोकांसि रे नीववावें. ५
तनु त्यागितां कीर्ति मागें उरावी,
मना सज्जना, हेचि क्रीया धरावी;
मना चंदनाचे परी त्वां झिजावें,
परी अंतरीं सज्जना नीववावें. ६
जगीं सर्वसूखी असा कोण आहे
विचारीं मना, तूंचि शोधोनि पाहें.
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें,
तया सारिखें भोगणें प्राप्त झालें. ७
मरे एक त्याचा दुजा शोक वाहे,
अकस्मात तोही पुढें जात आहे;

पुरेना जनीं लोभ रे क्षोभ होतो,
म्हणोनी जनीं मागुती जन्म घेतो. ८
मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी,
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी,
सदा बोलणें नम्र, वाचा सुवाचा,
जनीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ! ९
अती लीनता सर्वभावें स्वभावें,
सदा सज्जनालागिं संतोषवावें;
तयाकारणीं सर्व लावीत जावें,
सगूणीं अतीआदरेशीं भजावें. १०
विवेकें क्रिया आपुली पालटावी,
अती आदरें शुद्धबुद्धी धरावी;
जनीं बोलण्यासारखें चाल बापा !
मनीं कल्पना सोड, संसार-तापा. ११
सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें,
क्रिया पालटे, भक्ति-भावार्थ लागे;
क्रियेवीण वाचाळता ते निवारीं,
तुटे वाद, संवाद तो हीतकारी. १२
धरीं रे मना संगती सज्जनाची
जिणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची;
वळे भाव हा, वृत्तिसन्मार्गिं लागे,
महाक्रूर तो काळ विक्राळ भंगे ! १३

रामदास.

## ६. राम शिवधनुष्य उचलण्यास जातात.

### श्लोक.

सवाई. या परिचें भव-ताप-विमोचन
चाप शरांकित, भव्य-मती
पाहुनि, सर्व-नृपांहुनि उत्तम
लाहुनि तोष, पुसे नृपतीः—
" कोण असे महि-पालक-बालक ?
हे जन-चालकसे सुचले;
सांग मला सहसा गमनाशय,
चांग मनासि मला रूचले ! " १

हांसोनियां, नृपसभे मुनिराज बोले,—
स्वानंद-संभ्रम-भरें हृदयांत डोले;
" हा जी नृपा ! बहुत भाग्य जगीं उदेलें !
याच्या गुणें दुरित-दैन्य समस्त गेलें. २

साकेताधिप-बाल हे, रण-तटीं रक्षोगणा काल हे,
दीनाचे कनवाळ हे प्रतिपदीं, राया ! जगत्पाल हे,
पुर्ते हे शुभलक्षणी, रतसदा धर्मे-करूं-रक्षणीं,
आनंदाब्धि अनुक्षणीं भरतसे यांच्या कृपा-ईक्षणीं ! ३

यांहीं दुःसह ताटिका निवटिली, निष्कंटका मेदिनी—
केली काननिं, यांचिया शर-गतीं पाताळभू-मेदिनी;
तो मारीच नभीं झुगारुनि, शरें केला सुबाहू पुरा,
नेला सिद्धिस यज्ञ, ते प्रवर हे आले तुझ्याही पुरा. ४

चापा नृपा, आणि महोत्सवातें
आले पहाया, बल-वैभवातें;
मार्गी अहिल्या विपिनांत रामें
केली शिला-मुक्त मनोभिरामें. " ५

परिसुनि मन रायें दाटलें रामपायीं
म्हणत मनिं, "करावा सोहिरा हा उपायीं;
कठिण तरि पणाचा व्यर्थ संकेत केला,
रघुवर नवरा हो धन्य या कन्यकेला!" ६
भूपातें निरखी दिठीं निज-सखी-संगें, रमे सारखी
शोभे, तेचि उखी विखी-शशिमुखी माडीवरी पारखी;
झाली बुद्धि फिकी, नृपाकृति निकी, मानीचना आन कीं
लक्षी राघव कौतुकीं, तंव तुकी माथा मनीं जानकी! ७

आनंदतनय.

---

## ७. बैरागी.

### श्लोक.

ज्यांच्या माथ्यावरि बहु जटा पिंगटा शोभतात,
चित्ताभस्में राळित तनु, रुद्राक्षमाळा गळ्यांत,
हातीं शूल प्रकट दिसतो, व्याघ्रकृत्ती बसाया,
हे गोसांवी झिजविति तपें या ठिकाणीं स्वकाया. १
ज्यांचें शोभे परमरुचिरें ऊर्ध्वपुंड्र कपाळ,
काया गंधें करुनि, तुळसीलंबमें कंठनाळ,
वक्त्रीं कृष्णस्मरण, बसण्या निर्मिला कृष्ण-कृत्ती,
हे बैरागी दिसति करितां ध्यान एकाग्रवृत्ती. २

गंगावर्णना.

---

## ८. कुपुत्र लक्षणें.

### अभंग.

मायबापें केली आस, झाला बायकोचा दास;
झाला बायकोच्या बोला, सख्या भावाशीं अबोला;

बायकोच्या ऐकुनि गोष्टी, लागे बहिणीच्या पाठी;
बायकोला पितांबर धट्टी, आईच्या लुगड्याला बारा गांठी;
मेहुणीला भरी चुडा, आईच्या हातांत कांकडा,
मावळणीला आशा गाळी, मेहुणीला पुरणपोळी.
आपण लावी रेशिमकांठी, बाप लावीतो लंगोटी.
गुरु शिष्य वैरकार, लेक धांवे बापावर;
आपण जेवी दूधभात, बाप देखुनि धुतो हात.
बापाच्या गळ्या दोरी, सासऱ्याला जवळ करी.
तुका म्हणे ऐशा नरा मोजुनि माराव्या पैंजारा. १

तुकाराम.

---

## ९. सत्याचा महिमा.

### ओव्या.

निर्जळीं शतकूपखनन तें एका वापिके समान,
शतभरी वापिकांचें पुण्य एकायज्ञीं पाविजे. १
शतक्रतूंचें सुकृत, एका पुत्रोत्पादनीं प्राप्त,
त्याचें श्रेय शतगुणित, सत्यरक्षणीं लाहिजे. २
अश्वमेध–शतांचें पुण्य, एकीकडे सत्य-वचन
तुळितां सत्य आगळें जाण, मेरू-सर्षप दृष्टान्तें. ३
चहूं वेदांचें साङ्ग ज्ञान सकळ तीर्थांचें अवगाहन,
त्यासी तुळितां यथार्थ-वचन, सत्य अगणित आगळें. ४
कोटीपुण्यें जोडिलीं यत्नीं, तीं जळती एके असत्य वचनीं
जैसा पावक स्फुलिंगकणीं नाशी कर्पूरगिरीतें. ५
सत्या परता नाहीं धर्म, सत्य तेचि परब्रम्ह,
सत्यापाशीं पुरुषोत्तम सर्वकाळ तिष्ठत; ६
सत्यें नेमिला न चळे नेम, त्यासी वोळगे मोक्ष-धाम,

घोर संसार-भयाचें नाम     स्पर्शों न शके कल्पांतीं. ७
असत्य तेंची पैं पातक     असत्य तोची महानरक,
असत्याचेंनि संगें दुःख     अनंत जन्मीं भोगिती. ८
सत्यामृताची कनकवाटी     जोडिली न सांडे भूतटीं,
असत्य बुद्धीची नरोटी,     पवित्र हातें नातळे. ९

मुक्तेश्वर.

---

## ३०. शिवधनुष्य-भंग.

### श्लोक.

घातलें सदृढ कास राघवें,
वंदिलें गुरुपदाब्ज लाघवें;
ठेविला वरद हस्त मूर्धनीं,
'पात्र तूं विजय चाप मर्दुनी !' १
जनकजा मिरवे उपरीवरी,
सहचरी वसनांचळ सांवरी;
सखि म्हणे, 'रघुवीर उभा असे
धनुष भांगिल संशय हा नसे !' २
ती भूमीसि म्हणे, "उमानि धनुषा रामासि साह्या करीं,
शेषा लोटिं शरासनासि, तपना ओढीं सहस्रांकरीं,
शंभू कार्मुक आवरीं दशभुजीं, पृष्ठीसि कूर्मा धरीं,
चापा दिग्गज हो धरा, विधि तुवां होईं हळू तें करीं! ३
तीर्थें, व्रतें, जप-पुरश्चरणादि दानें,
उद्यापनादि हवनें, द्विज-भुक्त मानें,
साह्या करो सुकृत पूर्विल आजि मातें,
भंगो शरासन खरें रघुवीरहातें ! ४
नाना तिणें नवसिले सुर भूमिसाक्षी,

भंगावया धनुष उदित सर्वसाक्षी;
श्रीमूर्ति ते उभि असे भुपतींत देखा,
त्याच्या स्वरूपिं दुसरा करि कोण लेखा ?' ५

केयूरांगद कुंडलें मणगटीं, जांबूनदें कंकणें,
वांकी, तोडर गर्जती घनरवें, पादांबुजीं भूषणें,
सीता-चित्त-मयूर नृत्य करि तो श्रीराम सर्वांपुढें,
धीरोदार उभा, प्रतापमहिमा नेणोति शास्त्रें मुढें. ६

राजे मानव-देव-दानव-सभे नृत्यांगना नाचती,
वाद्यांचे घन-घोष होति, अवघे रामाकडे पाहती,
नाना तें चतुरंग सैन्य परिघीं पाहों उभें ठाकलें,
विप्रांचे जयशब्द होति अवघे चित्रोपमा थोकले. ७

उल्हासें चमकोनि जाय धनुषापाशीं, उभा राहिला,
सांगातें अवघे पुरोहित, पुढें श्रीराम तो एकला,
कोदंडासि सभेसमोर उजवें घालोनियां वंदिलें,
दोर्दंडें उचलोनियां चढविलें, कर्णांत तें ओढिलें ! ८

रामानें सहवर्तमान मुनिच्या कोदंड उच्चालिलें,
राजे आणि विदेह-संशय-धियां संयुक्त आस्फाळिलें,
सीता-चित्त-समेत ओढुनि, भृगूपुत्रादि साहंकृती
त्यांचा दुर्मद गर्व भंगुनि, धनूर्भृत्यक्तसर्वाकृती. ९

घोषें चाप कडाडिलें, रघुपती कोदंड ओढी बळें
तेव्हां कोटि कडाडिले घन, विजा, कोदंडकोलाहळें,
सीमा सांडिती सिंधु, मस्तक तुकी शंभू स्वयें आपुलें,
ते सर्व भुप रामशक्ति नयनीं देखोनी वेडावले ! १०

विठ्ठल.

## ११. कर्णास श्रीकृष्णाचें भाषण.

आर्या.

कृष्ण म्हणे, " राधेया, भला बरा स्मरसि आजि धर्मातें;
नीच व्यसनीं बुडतां निंदिति देवासि, न स्वकर्मातें ! १.
जेव्हां तूं, दुर्योधन, दुःशासनशकुनि एकमति झालां,
कैसें कपटद्यूतीं चित्तीहि न धर्म लंघितां भ्यालां ? २
जेव्हां सभेसि नेली पांचाळी, मानिलें मनीं शर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ३
राज्य न देसी, करवुनि वनवासाज्ञातवासही जेव्हां
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना तेव्हां ? ४
केले दग्ध जतुगृहीं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना तेव्हां ? ५
चारुनि विषान्न भीमा सर्पे डसविले नृपें, असें खोटें
कर्म करवितां कर्णा, होता तव धर्म तेधवां कोठें ? ६
फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया अंग
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां ? वृषा सांग. ७
' शाश्वत नरकीं पडले पति पाहिले षंडतिल, वरीं अन्यां '
बोलुनि असें सभेंत द्रुपदाची गांजिली तुवां कन्या; ८
खर-दुर्वाक्य- शरशतें भेदित होतासि जेधवां मर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ९
अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां त्वां वारिलें न तें कर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? १०
पूर्वी धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि तो जसा कुचला,
आतांचि बरा सुचला ! धर्मगृहा सर्व व्हा परासु, चला ! ११
मागेंचि तुम्हीं भजतां धर्माला तरि तुम्हींच वांचवितां;
आतां मरा, न वांचे दीप्तगृहीं जो न तोय सांचवितां ! १२

रक्षावा धर्म असा करिसी उपदेश, तरि असे मान्य;
रक्षितसों धर्मातें, आम्हांला धर्म ठाउका, नान्य ! १३
हा धर्ममूर्त धर्मप्रभु, यातें भजतसों; असा मान्य
लोकांत कोण दुसरा ? सामान्य नव्हेचि हा असामान्य!" १४

मोरोपंत.

---

## १२. यक्षाचें घर.

### साक्या.

त्या नगरींत धनेशगृहाच्या उत्तरेस दिसतें जें
दुरूनि सुंदर मंदिर मोठें, तेंच जाण घर माझें. १
नानारत्नीं खचित जयाचें द्वार उंच बहु साजे,
अपूर्व शोभा पाहुनि ज्याची इंद्रचाप ही लाजे. २
असे जवळ त्या एक नवीनचि कल्पवृक्ष सुकुमार,
थोर फुलांचे गुच्छ येउनी जो लवलासे फार; ३
प्रियाकरांनीं नित्य घालुनी पाणी सायंकाळीं
अति कनवाळूपणें जयाला मुलासारिखा पाळी. ४
आहे सुंदर तळेंहि तेथें लहानसें, ज्यामाजी
नित्य शोभती बहुत फुलोनी सुवर्णकमळें ताजीं. ५
पाचेच्या पायऱ्या सभोंतीं असति ज्यांत उतराया,
जयांत नेमस्तचि जल असतें क्रीडा स्त्रीस कराया; ६
वर्षाकाळहि येतां तेथें हंस सुखें वसताती,
जवळहि असतां मानस, तिकडे कधींहि ते नच जाती. ७
त्याच तळ्याच्या कांठीं आहे क्रीडापर्वत, ज्याचें
नीळमण्यांचें चमके सुंदर उंच शिखर तें साचें; ८
ज्याच्या भोंतीं सुवर्णकदली झळकति चित्रविचित्रा;
विजेसहित तुज देखुनि तुजला आठवतो ता मित्रा. ९

## ११. कर्णास श्रीकृष्णाचें भाषण.

आर्या.

कृष्ण म्हणे, " राधेया, भला बरा स्मरसि आजि धर्मातें;
नीच व्यसनीं बुडतां निंदिति देवासि, न स्वकर्मातें ! १.
जेव्हां तूं, दुर्योधन, दुःशासनशकुनि एकमति झालां,
कैसें कपटद्यूतीं चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां? २
जेव्हां सभेसि नेली पांचाळी, मानिलें मनीं शर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ३
राज्य न देसी, करवुनि वनवासाज्ञातवासही जेव्हां
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना तेव्हां ? ४
केलें दग्ध जतुगृहीं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां
गेला होता कोठें धर्म तुझा सूतनंदना तेव्हां ? ५
चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले नृपें, असें खोटें
कर्म करवितां कर्णा, होता तव धर्म तेधवां कोठें ? ६
फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां ? वृषा सांग. ७
' शाश्वत नरकीं पडले पति पहिले षंडतिल, वरीं अन्यां '
बोलुनि असें सभेंत द्रुपदाची गांजिली तुवां कन्या; ८
खर-दुर्वाक्य- शरशतें भेदित होतासि जेधवां मर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? ९
अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां त्वां वारिलें न तें कर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म ? १०
पूर्वीं धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि तो जसा कुचला,
आतांचि बरा सुचला ! धर्मगृहा सर्व व्हा परासु, चला ! ११
मागेंचि तुम्हीं भजतां धर्माला तरि तुम्हींच वांचवितां;
आतां मरा, न वांचे दीप्तगृहीं जो न तोय सांचविता ! १२

रक्षावा धर्म असा करिसी उपदेश, तरि असे मान्य;
रक्षितसों धर्मातें, आम्हांला धर्म ठाउका, नान्य ! १३
हा धर्ममूर्त धर्मप्रभु, यातें भजतसों; असा मान्य
लोकांत कोण दुसरा ! सामान्य नव्हेचि हा असामान्य!" १४

मोरोपंत.

---

## १२. यक्षाचें घर.

### साक्या.

त्या नगरींत धनेशगृहाच्या उत्तरेस दिसतें जें
दुरूनि सुंदर मंदिर मोठें, तेंच जाण घर माझें. १
नानारत्नीं खचित जयाचें द्वार उंच बहु साजे,
अपूर्व शोभा पाहुनि ज्याची इंद्रचाप ही लाजे. २
असे जवळ त्या एक नवीनचि कल्पवृक्ष सुकुमार,
थोर फुलांचे गुच्छ येउनी जो लवलासे फार; ३
प्रियाकरांनीं नित्य घालुनी पाणी सायंकाळीं
अति कनवाळूपणें जयाला मुलासारिखा पाळी. ४
आहे सुंदर तळेंहि तेथें लहानसें, ज्यामाजी
नित्य शोभती बहुत फुलोनी सुवर्णकमळें ताजीं. ५
पाचेच्या पायऱ्या सभोतीं असति ज्यांत उतराया,
जयांत नेमस्तचि जल असतें क्रीडा स्त्रीस कराया; ६
वर्षाकाळिहि येतां तेथें हंस सुखें वसताती,
जवळहि असतां मानस, तिकडे कधींहि ते नच जाती. ७
त्याच तळ्याच्या कांठीं आहे क्रीडापर्वत, ज्याचें
नीळमण्यांचे चमके सुंदर उंच शिखर तें साचें; ८
ज्याच्या भोंतीं सुवर्णकदली झळकति चित्रविचित्रा;
विजेसहित तुज देखुनि तुजला आठवतो ता मित्रा. ९

मध्यें मंडप मधुमालतिचा, गुलाब शोभति भोंतीं !
काय वर्णु तीं सुखें त्या स्थलीं जीं अनुभविलीं होतीं. १०
त्या कुंजाच्या जवळ वकुळिचा एक सुबक तरु आहे,
तसा तांबडा अशोक, चंचल-पल्लव, तेथें पाहें. ११
पहिला मजपरि तुझ्या सखीच्या वदनांतिल मदिरेतें
वांछी, दुसरा तिच्या इच्छितो वामचरण-घातातें. १२
असे मांडला पाचमण्याचा पिंजरा तेथें थोर,
वसे त्यामधें कनकयष्टिवर रात्रीं अमुचा मोर. १३
प्राणाची मम धनीण शिकवी नाचायास जयातें,
रत्नकंकणीं युक्त करांनीं धरुनियां तालातें. १४

पद्यरत्नावलि.

---

## १३. जुनें पुणें.

### श्लोक.

दिसति उंच निळ्या गगनीं, अहा !
कळस निर्जर-मंदिरिंचे पहा !
गगन-छत्रच सांवरुनी शिरीं,
असति दंड उभे इतुके वरी. १
उचलती स्वशिरें वरतीं घरें,
स्वधन-गर्वच त्यांस जणों भरे !
नयन हे खिडक्या उघडूनियां
बघति येतिल कोण पुरांत या ! २
मधुर गायन, नर्तन, वादन,
उपवनांत विलास, सुभोजन,
सकळ लोक इथें उपभोगिती,

प्रतिदिनीं नवउत्सव चालती ! ३
धरुनियां तरवार सखी करीं,
भरुन चंदन-रक्त तनूवरी,
रण-वनीं यश-हंस धरावया,
रसिक वीर तयार पुण्यांत या ! ४
फिरुन आठ दिशांस सुपंडित,
करुन खंडित सद्यश मंडित,
विविधशास्त्र-वनांतिल केसरी
दुरुन येउन राहति या पुरीं. ५
मधुर निर्मल सौम्य सरस्वती
सुकवि जे वदनांतुन काढिती,
करिति संतत संत-सुवर्णन,
लुटुन नेति पुण्यांतुन या धन. ६

निबंधचंद्रिका—यशवंतराय.

---

## १४. आजचें पुणें.

बघुन आज दशेस पुण्याचिया
कवण सुज्ञ म्हणेल पुणें तया !
न असतें जरि चंचळ वैभव,
किति सुखी असते मम बांधव ? १
असासि निर्दय फारच, संपदे !
पळसि काय म्हणूनि दुरी मदें ?
न रणशौर्य, न साहस, सद्गुण
स्थिर करूं शकती तुजला क्षण ! २
न भगवें फडकेल निशाण या

महिवरी, गत जें पुरतें लया;
परत घेउन लूट पुण्याप्रत
कधिंच येतील वीर न सांप्रत ! ३
सण पडे दसरा प्रतिवत्सरीं,
परि न सौख्य मनाप्रत तो करी;
जमुन येउन वीर निजस्थळीं,
उतरती न पुण्याजवळी बळी. ४
' न रजपूत निजाम न हैदर
नच नजीब बघो तुमचा कर,
करून गारद या ' न असे कधीं
सुटाति आज हुकूम पुण्यामधीं. ५
रजत, कांचन, मौक्तिक, माणिक,
धन जयां जवळी बहु आणिक,
धुळिस जाति मिळून कुबेरसे
धनिक संप्रत अन्न तयां नसे ! ६
वसाति पंतप्रधान जिथे बरे,
नयन-सौख्यद सुंदर मंदिरें,
प्रभु-महा-विरहाग्नि न साहवे
म्हणुन जाळुन घेति, न राहवे ! ७
जनहि दुर्बळ होति दिनोदिन,
विसरले अपुले मुळचे गुण;
बदलुं पाहति पद्धति ते जुनी
म्हणुन फार विषाद वसे मनीं ! " ८

निबंधचंद्रिका—यशवंतराय.

## १५. धर्म युद्धांतून पळत आहे, व कर्ण त्याचा उपहास करितो.

### आर्या.

हांसत हांसत तो वृष बोले " जन्मोनि शुद्ध संतानीं,
कोण पळेल क्षत्रिय- धर्मीं शिक्षित असोनि संतानीं; १
कां पळशी मरण-भयें होतां हांसें कशास वांचावें ?
सांचावें लज्जेचें ओझें माथां, सदैव काचावें. २
युद्धीं परमार्थ मिळे, निश्चित मिळणें पलायनें तोटा,
हें जाणोनि पळे तो मातेच्या रोग पातला पोटा. ३
न क्षत्र-धर्म-कुशल, ब्राह्मण-धर्म-प्रवीण तूं सौम्य !
वाटे पदवी उचित स्वाध्याय-मखक्रियाच तो धौम्य. ४
कुंतीसुता, इतःपर युद्ध करायासि गांठि वीरांशीं
घालूं नको, नकोची ! स्पर्धा हि करूं नकोच धीरांशीं ! ५
आम्हां वीरांप्रति तूं यावरि अप्रिय वदों नको लेश;
वनकोल-यूथ-नाथें जिंकावा केंवि यज्ञकोलेश ? ६
यावें महारणाप्रति न पुन्हां, हा रंग वीर-मल्लांचा;
तेथें न कुश-स्रुक्- स्रुव-संभार,असे गदासि-भल्लांचा ! ७
जा, गा महान गुणा, दिधलें तुज जीवदान, जा जा गा;
जागा दाटुनि केल्या हरि वांचाया नसे गजा जागा." ८

मोरोपंत.

---

## १६. भीष्मार्जुन-युद्ध.

### श्लोक.

श्रोत्रयुग्म परिपूत कराया
सावधान, जनमेजय राया !

जो परेशरत, धन्य अहो तो,
गोष्पदोपम तया भव होतो ! १
प्रतिज्ञा जे केली यदुकुळवरें ' युद्ध न करीं,
धरींना शस्त्रातें कदनसमयीं मीं निजकरीं; "
' घडेना हें मिथ्या जरि, तरि न मी भागवत रे, '
प्रतिज्ञेतें भीष्में मनिं अवथिलें या दृढतरे. २
पिता शंतनू, माय ज्याची नदी जे,
स्वयें युद्ध ऐशास सन्मान दीजे;
असे गर्व तो ही हरावा मनाचा,
मनाचा असा भाव त्या वामनाचा. ३
नृपा ऐकिजे युद्ध देवव्रताचें,
गमें हेंचि साफल्य तूझ्या व्रताचें;
रथीं देखिले कृष्णकौंतेय दोघे,
म्हणे भीष्म, ' माझ्या शरातें यदो घे ! ' ४
भीष्माकडे रव भयानक दुंदुभीचा
होतां वदे तनय आनकदुंदुभीचा;
' दुश्चिन्ह आजि गमतें मज, सव्यसाची,
जाती शिवा अशिव हे अपसव्य साची ! ' ५
गर्वोक्ति फाल्गुन वदे, ' जगदेकराया,
आहे असा कवण तो झगडा कराया !
ज्यां काळखंज वधिले अतुलप्रतापी,
पौलोम ही असुर गोसुर-विप्रतापी ! ' ६
पितामह वदे तया, ' प्रबळ तूं, पृथानंदना,
रमेश रथिं सारथी चतुर वागवी स्यंदना;
स्वयें गतवयस्क मी, सरस वीर तूं रे नवा,
भिडें रणधुरंधरा, जय घडो सुखें वा न वा! ७

पारिक्षिता, मग शरासन पांडवानें
ओढूनियां हुतवहार्पितखांडवानें,
तो भीष्मदेह खचिला शरतांडवानें,
ज्याच्या क्रिये सकळ पद्मभवांड वानें ! ८

गांगेय कोपा चढला कसा रे,
ज्या मानिती हाचि कृतांत सारे;
गर्जोनियां सिंहरवें जयातें
पाहे, जणों मारिल आजि यातें ! ९

'त्वां काय कर्म करिजे लघुलेंकरानें !'
बोलूनियां मग धनू धरिलें करानें;
तें व्यापिलें सकळ सैन्य महाशरांनीं,
ग्रीष्मीं जसा पतित होय हुताश रानीं. १०

तो स्तोम येतां बहुसायकांचा,
झालाचि पार्थव्यवसाय काचा;
काचावला वीर, पुढें धसेना,
झाली नृपा ! सर्व भयांध सेना. ११

पुष्पवर्ण नटला पळसाचा
पार्थ सावध नसे पळ, साचा;
पाहिलें जंव निदान तयाचें,
तों दिसे वदन आनत याचें. १२

प्रतोद मग ठेविला, उतरला रथाधःस्थळीं,
म्हणे, 'प्रबळ भीष्म हा, जय घडे न या दुर्बळीं.'
करीं कमलनेत्र तो प्रथित चक्र तें स्वीकरी,
प्रमोद यमनंदना बहु, तया यशस्वी करी ! १३

असा येतां देखे रथनिकट तो श्यामलहरी,
नृपा, गांगेयाच्या हृदयिं भरल्या प्रेमलहरी;

शरातें चापातें त्यजुनि वदला गद्गदरवें,
'जगन्नाथें केलें मज सकळ लोकांत बरवें !' १४

' ये रथावरि झणीं, यदुराया,
खड्ग देइन विकोश कराया;
तोडिं मस्तक, पडो चरणीं या,
धन्य होइन तदाच रणीं या !' १५

श्रीमाधवावांचुनि आनदेवा
भजें, तरी हो मज आण देवा,
तुझीच कीं वाहतसें हरी रे,
मिथ्या झडो हे तरि वैखरी रे. १६

' मारावें मजला असेंच असलें चित्तीं तुझ्या केशवा,
तें मार्ते मग कोण रक्षिल पहा, विश्वेश नाकेश वा,
हा मुख्यार्थ जनार्दना मज गमे, भक्तप्रतिज्ञा खरी
कीजे, सर्वजनांत होइल मृषा, हो आपुली वैखरी !' १७

हें भीष्मवाक्य परिसोनि जगन्निवासें,
केलें विलोकन मृदु-स्मित पीतवासें;
वेगें फिरोनि चढला मग तो रथातें,
पार्थाचिया पुरविणार मनोरथातें. १८

वामन.

---

## १७. नळराजा.

### दिंडी.

चौगुणीनें जरि पूर्ण शीत-भानू । नळा ऐसा तरि कला-निधी वानूं;
प्रतापाचा जो न मावळे भानू । तया सारिखा दुजा कोण मानूं ? १

**श्लोक.** चंद्रासि लागति कळा, उपराग येतो;

गंगेसि भंग, बहु पाणउतार होतो;
जें चूर्ण होय तरि मौक्तिक तें कशाला?
नाहीं समान नळ-राज-महा-यशाला.

वाजीचें मन जाणता, सकळही राजी शिपाई जया,
याजी होउनियां द्विजांसि म्हणतो, "याजी धनें घ्यावया!
त्याजी जो धनदापरी, सुकृत जें त्या जीव ऐसें गणी,
गाजी तो नळ भूप, हूप धरूनी गा जी गुणींच्या गणीं. ३

**दिंडी.**

लोकबंधू जो होय रवी ऐसा । कुवलयाला जो सुखद चंद्र जैसा;
साङ्ग नोहे तो कुसुम-चाप तैसा । निषधरायाशीं तुल्य-रूप कैसा! ४

**श्लोक.**

कदा नेणों वोढी, शरधितुनि काढी शर कदा,
कदा धन्वीं जोडी, वरि वरिहि सोडी तरि कदा!
विपक्षाच्या वक्षावरि विवर-लक्षास्तव रणीं,
कळे राजेंद्राची त्वरित शर-संधानकरणी. ५

धाले धनीं पुढिल याचक या नळाचे;
येतां फिरोनि समुदाय पथीं तयांचे;
मागावयास जन मागिल देखियेले,
त्याहींच ते सकळ पूरितकाम केले. ६

रघुनाथ पंडित.

---

## १८. भगवन्नामप्रताप.

**श्लोक.**

आकाशअंत न कळूनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्यनुसार पक्षी;

नामप्रतापहि यथामति याच रीती
सीमा न पावति, तथापि मुनींद्र गाती. १
न कळतांहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें,
दुरित-तृणगृहाचें भस्म होणार तेथें;
मग समकरुणेची आयती कृष्णदृष्टी
भिजविल, करिते जे सर्व सृष्टयर्थ वृष्टी. २
न कळतां पद अग्निवरी पडे । न करि दाह असें न कधीं घडे;
अजित-नाम वदो भलत्या मिसें । सकल पातक दग्ध करी तसें. ३
न जाणतांहि ये मुखा हरि तथापि पापें हरी;
स्मरोनि महिमा, स्मरे वदानें तींच नामें जरी;
प्रवृत्ति विषयीं जरी असति त्या जनांचीं मनें,
विरक्त करितो हरी स्वगुण-नाम-संकीर्तनें. ४
न जाणे शिशू अग्निची शक्ति कांहीं,
जळो तूळ, इच्छा अशी ज्यास नाहीं;
तरी घालितां अग्नि, कार्पासराशी
जळे, येरिती नामही पाप नाशी. ५
हस्तीतें धुतलें, जळीं बसविलें, मालिन्य हीं नाशिलें,
तेणें तें पहिलें स्वकर्म वहिलें तीरींच आरंभिलें;
शुंडाग्रें धरिलें धुळीस, भरिलें सर्वांगही आपलें;
प्रायश्चित्त दिलें तथापि न भलें ज्याचें मन क्षोभलें. ६

वामन.

---

## १९. नळाचें उद्यान.

### दिंडी.

पनस, जंबू, जंबीर, विविध निंबें,
कुंद, चंदन माकंद सुदाडिंबें;

तुंग नारिंगें, विकसलीं कंदवें;
वसाति तेथें शुक-सारिका-कदंबें १

### श्लोक.

लतेतळीं रुंद निरुंद कालवे,
गळोनि तेथें मकरंद कालवे;
परागही सांद्र तयांत रंगती
फुलासवें भृंग-तती तरंगती. २

### आर्या.

उपरि सकंटक साचे, परंतु सांचे जयांत सुरसाचे,
घोंस असे फणसांचे षण्मासांचे, कितेक वरसांचे. ३

### श्लोक.

त्या वनीं एक तडाग तोयें तुडुंबले, तामरसानपायें
निथरा मंद मरंद वाहे, तपांतही यास्तव रिक्त नोहे. ४
अमृतही, पयही म्हणवीतसे; उभय होय तशी रुचि वीतसे;
मधुर गरस तें जल गा तसें; मधुर सारस यास्तव गातसे. ५
पीतां मरंद उदरंभर बंभराचें,
जें होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें;
जें पद्म तेथिल सहस्र दळां धरीतें,
प्रत्यक्ष सूर्यकिरणास विसाववीतें ! ६

### दिंडी.

तया सरोवरीं राजहंस पाहे, राजहंसांचा कळप पोहताहे;
तयांसाठीं हें वापिकाच पाहें, नळें केली हे कोण म्हणे नोहे ? ७
तयां हंसांचे देह कांचनाचे; पक्ष झळकती, वीज जशी नाचे;
रंग माणिकसे चंचुचे, पदांचे, जसे अधरींचे भीम-कन्यकेचे ! ८

रघुनाथ पंडित.

## २०. राम-कृष्ण व नंदयशोदा यांची भेट.

### आर्या.

नंद-यशोदा यांचा भेटावे राम-कृष्ण हा हेत,
आयकिलें कीं, आले गोवर्धन-गिरिसमीप आहेत.
द्याया रामा कृष्णा बहु दधि, नवनीत, कुसर, पायस ती
घेउनि जाय यशोदा, बर्ह-विभूषण, यथेष्ट साय, सती. २
नंद-यशोदा गोपी-गोप प्रेमें उपायनें वन्यें
देउनि भेटति कृष्णा, मानिति पाहोनि लोचनें धन्यें! ३
प्रभु साग्रज होय सुखी यातें पाहोनि, हा जसा नंद;
आलिंगुनि नमुनि म्हणे, 'झालों भेटोनि आज सानंद!' ४
नमुनि यशोदेतें तो भेटे; सप्रेम, राम-कृष्ण नृपा!
कुरवाळी, घे अंकीं, बहुत इची देवकी परीस कृपा. ५
नंद-यशोदा लागे, जेंवि प्रभु तेंवि, गाहिंवरायाला,
कवि मातातातांहुनि अतिवत्सल म्हणाति महिवरा त्याला. ६
आलिंगनें प्रभूच्या संतुष्टें गोप-गोपिका-चित्तें,
बा जेंवि लोभि-हृदयें विरहोत्तर लब्ध जाहल्या वित्तें. ७
कुशळ पुसे गाईंचें, वत्सांचें प्रभु पदार्थ ते सेवी,
प्रेमें धरि बर्हांगद, काढुनि रत्नांगद स्वयें ठेवी. ८
नंद म्हणे, 'पुससी तरि आहे सर्वत्र कुशळ बा कृष्णा,
बहु दुःख एक हें कीं तूं न दिससि, दर्शनीं महातृष्णा ! ९
रडुनि यशोदा वदली, 'बा स्मरण सदा तुझें, नसे विसर,
सोडूनि मानसातें हंस क्षणही दुजें न सेवि सर १०
म्हणतें, दुःख सराया शंकरनुति करुनि पाठ विनवीन,
परि मन वेडें, सोडुनि न किमपि अन्य आठवि नवीन ११
भगवान् म्हणे 'यशोदे, माते, सोडूनि खेद जा गेहा,
त्वत्पुत्र स्वजनाच्या त्राणीं न करुनि भेद जागे हा. १२

तुज जन जे स्मरतील प्रेमें, ते मन्मनांत भरतील;
होतिल मद्भक्त सुखें, माते ! भवसागरासि तरतील. १३
त्वन्मन-त्वत्कीर्तन-करिते सज्जन न ज मनीं वक्र,
ते प्रियतर मज होतिल, ओतिल पीयूष तन्मुखीं शक्र. १४
गाढालिंगनदानें निरवी प्रेषी व्रजासि पितरांतें,
तैसेंचि प्रभु सुखवी अभिमत पुरवुनि तयांहि इतरांतें. १५
साधु म्हणति, पितर क्षण हित-रक्षण करि तयासि न विसरती
मग रीति साधु-पतिची बा देइल कोणत्या न कवीस रती? १६
हे नंद-यशोदांसी भेटा हरि सर्व दाष देवाची,
व्यास म्हणे तोहि तरे जन, जो श्रोत्यासि हर्ष दे, वाची! १७

मोरोपंत.

---

## २१. वसंतऋतूचें वर्णन.

### श्लोक.

आम्रावरी सुरभि मोहर फार आला;
त्याचा परागचि पराग वनांत झाला;
येतां वसंत निजनाथ वनक्षितीनें
वाटे बुका उधळिला बहु त्या रितीनें. १
भोंतीं हेमसमान पीत कुसुमें हीं चंपकाचीं, तया—
मध्ये फुल्ल अशोक रक्तकुसुमें पाहून चित्तांत या
वाटे कीं, मधुनायकें सुमुदितें सौवर्णकांची असे
माणिक्यें खचिता महीस दिधली; उत्साहदा होतसे. २
रम्यध्वनी पिउनियां बकुलासवातें
भृंगावली करितसे हृदयांतसवातें;
ज्या होत रुष्ट पतिशीं रमणी तयांला
दूतीच हे जणुं निघे समजावयाला! ३

साऱ्या वनांत फुललीं सुमनें विचित्रें;
येणार काम म्हणुनीच वसंतमित्रें,
हे गालिचे पसरले वनभूमिभागीं,
लाऊनि किंशुकसुदीपचि जागजागीं. ४

पुष्पें फळें द्रुम विनम्र, सुगंध येतो
वायू वनांतुनि, मनाप्रति तुष्टि देतो;
हे भृंग पंचशर-मंगल-गीत गाती,
भृंगांगना सतत त्यांजवळी रहाती. ५

आला वसंत नृप, त्यावर पुष्पवृष्टि
वातप्रयुक्त तरु हे करिती सतुष्टी;
पृथ्वी पहा सकळ झांकुनि पुष्पभारें
गेली, धनू निजकरीं धरिलेंचि मारें. ६

संगीत भृंगरव, वाद्य पिकध्वनीच,
देताति सूर खगशब्दचि उंच नीच;
हा वायु शिक्षकचि, नृत्यकलेस दावी !
वल्ली सुनर्तनकला, किति हो वदावी ! ७

घेवोनि वृक्षकुसुमें वनवात वाहे,
भृंगालि पुष्परसलुब्ध तयांत आहे;
गुंजारवें अलि जणों पवनास गाती,
स्वावास पुष्पनिकराप्रति मागताती. ८

शाखा हलूनि पवनें तरुंच्या अनेकां
संलग्न होत वरचेवर ह्या अनेका;
जाणों परस्पर दृढ ग्रथिताति रानीं
ह्या मंडपास रचिल्या असती कमानी ! ९

हा मंद चंदनसुगंध सुशीत येतो
स्पर्शें तनूस सुख फारचि वात देतो !

गुंजभ्द्रमभ्द्रमरपुंज निकुंज झालें,
पुष्पें फळेंहि बहु गंधचि गंध झाले. १०
सारेचि हे तरु गिरीवरि पुष्पभारें
लाऊनि मस्तकिं तुरे त्रिविधप्रकारें,
वातप्रचालित पहा करिती सुनृत्य
जाणो नटप्रवर होत वसंतभृत्य ! ११
हे कर्णिकार पिवळ्या कुसुमोत्करानीं
आहेत पीत जिकडे तिकडेहि रानीं
नेसूनि पीत वसनें नर जागजागीं
आहेतसे गमतसे मजला, कृशांगी ! १२

ऋतुवर्णन.

---

## २२. संशयरत्नमाला.

उठतां बहु त्वरेनें ' कोठें जातां ! असें तुम्हां देवी
पुसती झाली, जाणों पुसतां झाता पुढें न पद ठेवी. १
किंवा नारद आला आलापीत स्वकीय सच्चरितें,
प्रेमळ गीत तुम्हांला हरि! हरिणापरिस बहुत वश करितें. २
कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें.
शरणागत-भय-शमना ! यास्तव येणें तुझें नसे घडलें. ३
किंवा मजहुनि दुसरा कोणी बहु-दीन दास आदळला,
तच्छुभ दैव-समीरें त्यावरि करुणा-घन प्रभू वळला. ४
प्राय: सु-मुहूर्ताचा शोध करायासि लागला वेळ,
होय महत्कार्य, परी प्रभुचा तों नित्य सहज हा खेळ. ५
किंवा तुज एकाकी पाहुनि, खळ-दैत्य आडवे आले
फुटतां सागर-सिकता सेतूचें काय त्यापुढें चाले ? ६

किंवा तुज गुंतविलें भजकीं, परि ते दयार्द्र या रंकीं;
उद्धरित्यासि न सज्जन गुंतविती गाय कढतां पंकीं. ७
किंवा चुकतें कांहीं स्तवनीं, तेणेंचि मागुता बसली,
तरि हे मन्मूर्खत्व; प्रभु तूं दोषज्ञहि तसा नससी. ८
कीं भीतो भ्रांत वृथा, मृग-जल-मग्नासि काय तारावें ?
म्हणतां असें कसें ? शिशु-भय जाया बागुलासि मारावें ! ९
कीं पावावें समयीं सदय मनांतूनि योजिलें जरि तें,
तरि जेंवि रुक्मिणीचें चित्त माझें अधीर मन करितें. १०
किंवा पुराणपुरुषा, संप्रति बहु भागलासि या कामीं
तुज नीज लागलीं तों सजलों मारावयासि हाका मी. ११
किंवा बरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करा,
तरि वरि तसाच आंतहि; उगाळितां कोळसा प्रयास करा ! १२
कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त, तिळ स्थळ नसे नसावेंची,
वसवा पुरें, पुरे कां म्हणतां, धनवंत फण कसा वेंची ? १३
कीं याचकांसि देतां सरले चारीहि मुक्ति-धन राशी,
भक्तिच मजद्या, द्यावें देवाला अमृत योग्य, न नराशी. १४
कीं भेटि बहु दिसां, भय भेटाया दीनबंधुला वाटे;
तरि भेटावें विधिनें गेले जाताति साधु ज्या वाटे. १५
कीं भीशी, मज एका उद्धरितां लागतील फार झटें,
तरि कोणाहि न कळतां न्यावा झांकोनि दास पीत-पटें ! १६
कीं लक्ष-भोजनापरि केला संकल्प संपला, देवा,
तरि दाते क्षुद्रिकळ्हा मग न म्हणाति काय, 'या बसा, जेवा.' १७
कीं एक मीच उरलों पापी, हें बीज ठेविलें जतन;
वतन स्वकीय मज कां करितें त्वन्नाम मंगलायतन ! १८
कीं कार्य-बहुत्वें तुज फावेना यावया, जगत्पाळा,
तरि रूप घ्या दुजें, ती विद्या कंठीं वसे जशी माळा ! १

कीं मागें गुप्त उभा असति प्रेमें, उभारुनी बाहे,
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकसी बा हे ? २०

---

## २३. अन्योक्ति.

### गजान्योक्ति.

#### श्लोक.

न ताप निवला, तृषा न शमली, रजें माखलें
शरीर, अजुनी नसे कमल एक ही चाखलें,
न सोंड उचलूनियां कमलिनी गजें स्पर्शिली,
हकाक मधुपीं पहा अधिच काय आरंभिला ! १
माझी शक्ति अपूर्व, बाग अवघा म्यां मोडुनी टाकिला,
ऐसें मानुनि हर्ष फार तुजला चित्तीं खरा वाटला;
ग्रीष्मीं तीव्र रवी तपोनि करितां आंगीं तुझ्या काहली,
ती पीडा टळण्यास कोणति तुवां युक्ती गजा योजिली? २
कंठीं मोठा बळकट असे पाश, पायांत बेडी,
बैसोनायां शिरिं नर तुझ्या अंकुशें गंड फोडी,
जी पेक्षां कीं मरण बरवें भासतें, त्या दशेतें
पावोनियां अजुनि हि गजा दाविशी कां मदातें ? ३

### हरिणान्योक्ति. दिंड्या.

मत्त असती जे धन्याच्या मदानें
न दावीशी त्यां तोंड दीनवाणें,
आर्जवाचीं भाषणें मधुर खोटीं
करुनि तोषविशी न त्यां कधीं पोटीं. ४

गर्ववचनें ही परिसशी न त्यांचीं,
धरुनि आशा त्यांचिया प्रसादाची,
घरा त्यांचीया करुनि येरझारा
न घालविशी तूं स्वीय काळ सारा. ५
भूक लागलिया कोमला तृणातें
भक्षुनीयां तूं पावसी सुखातें;
स्वस्थ निद्रेशी घेशि झोंप येतां,
चित्ति नाहीं तव काडिमात्र चिंता. ६
अशी सौख्याची स्थिती प्राप्त व्हाया
योजियेलें त्वां कोणत्या उपाया ?
काय कोठें त्वां तपश्चरण केलें ?
मृगा ! योगें ज्या भाग्य हें उदेलें. ७

नवें कोमल उगवलें गवत दाट
स्वच्छ सुंदर वाहतो त्यांत पाट,
अशा पाहुनियां उत्तम स्थलातें
भूल पडली तैं मृगाच्या मनातें,
व्याध चापीं योजुनी बाण राहे
आड जाळीच्या, न तो त्यास पाहे ! ८

वनीं हिंडोनी शीण फार झाला,
घाम अंगाला तुझ्या दाट आला,
बैस येउनियां स्वस्थ आश्रमांत,
करीं रोमंथा, नीज वा निवांत. ९
दुष्ट भिल्लांचा इथें वास नाहीं.
मुनी बसले हे शांत, यांस पाहीं;

भूतमात्रीं हे दयेतें करीती,
मृगा मनिंची बा सोड सर्व भीति ! १०

---

## वृक्षान्योक्ति.

### आर्या.

दाटी वाटसरांची, तीव्र उन्हाळा असा असे फार;
मार्गीं एकच तरु हा कितिकांचा ताप तो करिल दूर ? १२

### श्लोक.

दावाग्नी खवळोनियां तरुवरां जाळावया जैं वळे,
जाती सर्व पळोनि कोकिल, शिखी, राघे, तसे कावळे,
भक्षायास इथें चहोंकडुनियां एकत्र जे जाहले;
येतां संकटकाळ होय जवळी ऐसा न कोणी मिळे ! १३

## चंदनान्योक्ति.

आहे एक सुगंध मात्र जवळी तो त्यास राखावया
ऐसे घोर भुजंग पाळिशी जना जे धांवती खावया;
येतीं गोड फळें फुलें हि बरवीं दैवें तुला चंदना,
त्यांच्या, बा, करितास काय न कळे संरक्षणा योजना ! १४
वनीं विलसती बहू विविध वृक्ष चोहींकडे,
तयांत मम चंदना सम न एकही सांपडे;
जयास न दिलीं फळें न कुसुमें हि दैवें जरी,
शरीर झिजवूनि जो तरि परोपकारा करी १५

---

# भाग दुसरा.

## १. ईश्वराचें प्रातःस्तोत्र.

### श्लोक.

चमत्कृतिनिधान ही कृति तुझी, जगाच्या पते!
तुझेंच जगदंड, जें अखिल चित्त आकर्षितें.
सुरम्य इतुकी जरी कृति तुझी, तरी तूं किती
सुरम्य असशी प्रभो! खुटतसे मतीची गती. १
निवास तव कोणता कळतसे न हें निश्चयें;
स्वरूप नच ही तुझें दिसुनि चर्मचक्षूंस ये;
तरी तव मनोहरा कृति जरी हि साधारणा,
दया प्रगट दाविते, अतुल शक्ति, अस्मन्मना. २
नेत्रांहा देखितोहे परिजनगण जो किन्नराख्य प्रभूतें,
गातो काव्यें करूनी निशिदिनिं विभुची कीर्ति वाद्यां वरी ते,
त्यासी पृच्छा करीं मी—" करुनि मजवरी प्रीति, सांगें मला तें
आहे कोठें प्रभूची वसति! सतत जी मोद देतेच तूतें." ३
जे हिंडती पशु समस्त धरातलाला,
जे मीन सेविति पयोनिधिच्या जलाला,
व्योमीं विहार करिती खग जे, तयांसी
यांचीं अहर्निश भजाच तुम्ही प्रभूसी." ४
दिसे शुक्र हा पूर्वभागीं प्रभातीं,
जना सूचवी दूत सूर्यप्रभा ती
जयाची प्रभा द्योतवीते नभातें,
" करी " त्या म्हणें मी " प्रभूच्या स्तवातें." ५

असे चक्षु जो सूर्य सर्वा जगाचा,
असे अंतरात्मा समग्रां जिवांचा
तया मी म्हणें–" थोर ईशास मानीं,
प्रभातीं दुपारीं स्तवीं अस्तमानीं." ६
कधीं चंद्र येतो रवीच्या घराला,
करूनी कधीं तारकांचाच मेळा
विराजे विधू पूर्ण आकाशगामी,
" स्तवीं रे परेशास " याचीं तया मी. ७
ग्रह, जे रविची प्रदक्षिणा
करिती एकमतें, तयांस मी
करितों अतिलीन याचना
" प्रभुचें गीत मुखें वदा तुम्ही. " ८
जीं द्रव्यें पंच केलीं अनल, जल, धरा, वायु, आकाश ईशें,
यत्संयोगेंच सारे नयनविषय हें सृष्ट विश्व प्रकाशे,
ज्यांच्या योगेंच होती सुखद ऋतु हे, त्यांस मी प्रार्थितों हें,
" सर्व स्थित्यंतरीं हो प्रभुकवन करा, विस्मरा या न मोहें!" ९
तापे सूर्य नदादिकांवरि, करीं उष्णा जला शोषवी,
पावे नीर नवीन रूप घनसें, त्यातें रवी रंगवी;
ऐसा जो घन अंबरीं झळकतो, निःशब्द वा वर्षतो,
" ईशा मोदभरें स्तवी सतत तूं"–ऐसें तया यावितों. १०
चारी दिशांकडूनि मारुत वाहती जे,
त्यांहीं प्रभुस्तवन सप्तसुरांत कीजे.
ऐकूनि हें श्रवणरंध्रविहार गीत
प्रेमोत्कटें रसिक पादप ते डुलोत ! ११
घेती नद्या जनन ज्या गिरिगव्हरांत,
गावोत त्या प्रभुवरा रमणीय गीत;

सत्पक्ष कोकिल वसंतसखे वनांत
मोदें प्रभुस्तव करीत निजस्वनांत. १२
नमस्ते जगत्कारणा ! आदिशक्ते !
नमस्ते प्रभो ! क्षेमदात्रि नमस्ते !
जसें ध्वांत सूर्यागमीं नाश पावे,
तसें त्वत्करीं पाप माझें पळावें ! १३

कुसुमांजलि. वि० ज्ञा० वि०.

---

## २ सदुपदेश.

### आर्या.

श्रीरामासि भजावें भक्तें म्यां जेंवि तेंवि संतातें;
राजासि उपासावें तैसेंचि जनें प्रधान-पंतातें. १
रंगावें सद्वचनें मतिनें, चूर्णें जसेंच हळदीनें,
भजन न सोडावें म्यां जेंवि कधीं कर्षकें न हळ दीनें. २
सद्व्यसनीं वेचावें आयु, न पुरेचि भरंवसा याचा;
झालें जीर्ण तरि मनीं आहे रसिकांत भर वसायाचा. ३
हरि-हर-जनाश्रय बरा, होतें तदितर जनाश्रयें भंड,
लागुनि असमर्थाच्या कांसेला वस्त्र पावतें दंड. ४
कांपावें मन कुजनीं वृद्धपणीं कांपतें जसें शिर त,
सत्संगींच शिरावें, बाळ जनन्यंचळीं जसें शिरतें. ५
सत्संगींच असावा प्रेमा, ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं,
रम्यहि अभक्त हा मज, मधुपा चंपक जसा असेव्य, जनीं. ६
वत्स जसा स्तन्यातें सादर पीतो धरोनि आम्यातें,
नें साधुमुखोद्गत यश तैसें प्यावें करोनि आ म्यां तें. ७

प्रेमें नवीं नवीं तीं माझ्या रसनेसि सुकवि-कुल-गीतें
गीतें यावीं, येती माहेरा जेंवि बहुत मुलगीतें. ८
ज्यांत न हरि-हर-जन-यश ऐसें जें काय कीर्तनीं गान,
तें अलवण भोजनसें नच सेउत आर्त-बाळसे कान. ९
हरि कीर्तनीं शिरावें धनिक गृहीं जपुन जेंवि चोरानें,
बहु कार्येंहि नुठावें, बहु मारें जेंवि कुचर ढोरानें. १०
त्यां कीर्तना टपावें, मार्जारें सर्वदां जसें दुग्धा,
सन्मति विनयादि गुणां वाहो प्रेमें, नगां जशी मुग्धा. ११
निज देह-गेह-भान प्रभुभक्तांच्या कधींहि मेळांत
मज कीर्तनीं नसावें, जेंसें शिरतां मुलास खेळांत. १२
भव-गज-भय शमवाया वृत्ती हरिकीर्तनींच राखावी,
पित्तनिवारक जैसी सुलभ बरी सुंठि-शर्करा खावी. १३
नारायणनामानें नच सोडावें कदापि हें वदन,
मेल्याही, लोभ्याच्या चित्तें सोडूं नये जसें सदन. १४
ज्याचे चित्तीं हरिहर तत्संगाति दे सदा मला देवा,
दे त्वद्भजनीं बुद्धी आवड पुरवुनि तुझीच पदसेवा. १५
संसार दो दिसांचा, सत्संग धरी कुलीन तोचि तरे,
घ्यावें बरें म्हणोनि स्वपरमुखीं हें कुलीनतोचित रे ! १६

---

## ३. रामनाम.

### श्लोक.

मुनि-मनें रमती रघुनंदना । तुजमधें दश-कंधर-सूदना !
म्हणुनि निर्गुण, जानकि-नायका । म्हणतिराम तुतें गति दायका. १
सूर्य-वंश-अमृतांबुधि-सोमा । रामचंद्र म्हणती तुज रामा !
पाप-ताप हरि नाम जिवाचे । दाह शांत करणार शिवाचे. २

चंद्र आणि धरिली शिरिं गंगा । जाय ना तरि विषानळ भंगा,
रामनाम जपतां मग वाचे । दाह शांत करणार शिवाचे. ३
राम हृत्कमळिं आतळवेना । रामनाम वदनीं पळवेन ;
काळकूट मग शंकरकंठीं । काळ राघवभयास्तव कंठीं. ४
शर्वकंठ-विष-गर्व हराया । शक्त नामचि तुझें रघुराया,
सेतु सागर कधी उतराया । नाम-सेतु भव-सिंधु तराया. ५
नाम राममय रामचि लोकीं । हें न जाणत वृथा शिणलों कीं
राम-नाम धरिलें जयिं वाचे । तूटले तयिंच पाश भवाचे. ६
सिंधु-सेतु रचिला रघु-रामें । नाशिला भव-समुद्रचि नामें
तारिलीं स्वनगरी अवतारीं । राम-नाम भुवन-त्रय तारी ! ७

वामन.

---

## ४. कालियामर्दन.

### श्लोक.

प्रचंड डावा भुजदंड भारी । सव्यें करें वाजवि वेणु भारी;
गर्जोनि वृक्षाचवरी, तटाकीं । उडीविषाच्यासलिलांत टाकी. १
कढ आधीं पाणी रथ चरण-पाणी वरुनियां,
उडी टाकी हाकेसरसि उदकीं सांवरुनियां;
भुजंगाचा डोहो गहनहि अहो तो खळबळी.
वसे जेथें सर्प स्वगृह करुनीयां खळ बळी. २
पाणी धनुःशत उचंबळलें न्हदाचें,
त्यामाजि तें विषचि तुंबळ दुर्हृदाचें;
कल्होळ लोळ भयकारक ये तटाका,
आश्चर्य हें जरि गमेल मनांत टाका ! ३
कीं अनंत बळ त्या प्रबळाचें । काय हो नवल ह्याच बळाचें ?
हे चरित्र सुर-मानव तारी । वर्णिजे म्हणुनियां अवतारीं. ४

उडी-हर्दी टाकुनियां निघाला । आला खळाच्या सदनासि घाला;
विलास येथूनि दुजा हरी तो । करा, खलाचा मद जो हरीतो. ५

खेळे जळीं त्या खळ-दंड-पाणी;
विदारिती श्रीभुज दंड पाणी,
जळांत हस्ती करि विक्रमातें,
दावी तसा श्रीहरि या क्रमातें. ६

आफळी ऱ्हदजळीं भुजदंड, । त्रास तो करि खळास उदंड;
घोष तो परम दुःसह मानी । काळिया, विषमदें अभिमानी.
कर्णहीन नयनें ध्वनि घेतो, । क्रुद्ध होउनि भुजंग निघे तो;
देखिला डहुळि जो स्वजळाला, । देखतांचि हृदयांत जळाला. ७
देखिलें नयनी नंद कुमारा, । शामसुंदर-वरा, सुकुमारा,
मंद हास्य अति रम्य मुखाचें । दाखवी स्वमुख नित्य सुखाचें. ८
हरी तेज सौंदर्य पद्मोदराचें,। असें श्रीपदद्वंद्व दामोदराचें;
न रूपास ज्या साम्य वेदीं पुराणीं, ।पहातां पुरेना जयाची शिराणी!१०
खेळे जळीं त्या खळगर्व हंता, । हरावया जी फणिची अहंता;
त्याविण कोणी स्वमदा न वारी; । तो देखिला येरिति दानवारी. ११
देखूनियां क्रुद्ध फणींद्र झाला, । धांवूनियां श्रीगरुडध्वजाला
वर्म स्थळीं दंश करूनि दांतें, । दावी बळें विक्रम-संपदांतें. १२
तें सर्पदेहें मग कृष्णजीची, । श्रीमूर्ति, सत्कीर्ति पवित्र जीची,
अनंत कल्याण गुणावतारी, । आच्छादिली जे भुवनासि तारी. १३
लोकरीति जगदीश्वर दावी, । जे अपूर्व म्हणऊनि वदावी;
हें न जाणति जन व्रजवासी । दुःख शोक करितील जिवासी. १४
त्यामाजि जे सन्निध गोपजाती, । गाई, गुरें, दुःख-पथासि जाती,
तीरीं समस्तांसहि दुःख आधी । झाली, वदे श्रीशुक तेंचि आधीं. १५
भुजंगें हरी वेष्टिला सर्व देहीं, । न हाले, न चाले, न कांहीं वदे हीं;
असें जाणुनी सर्व मूर्छेस जाती, । महाशोक-दुःखें भयें गोपजाती. १६

ज्या लाभ हा तो प्रिय पूर्ण काम,
ज्याच्या पदीं देह, कलत्र, काम,
समर्पिला, ये रिति त्या अजाला
देखूनि , त्यांतें बहु शोक झाला. १७
मूर्छा विमानीं गगनीं सुरांला,
आक्रांत गाईव्रज-वासुरांला,
आक्रंदती, मांडिति रूदनातें,
देखोनि ऐसें मधुसूदनातें. १८
ऽकडे अर्पुनि लोचनातें, । भयें पहाती व्रजमोचनातें;
शोक यांला बहु तीव्र जाला, । दावी महोत्पात अति व्रजाला. १९
नभीं उल्कापात, क्षितिवरिहि उत्पात दिसती;
'हरी कोठें आहे ?' म्हणुनि जन अन्योन्य पुसती;
हरी गेला राना त्यजुनि बळरामासि सदनीं,
असें हें जाणोनी वदति अति दुःशब्द वदनीं. २०
हरी चित्त, वित्त, प्रियप्राण ज्यांचा,
न सोसे वियोगाग्नि पादांबुजाचा;
न उल्लंघवे दुःखशोकार्णवातें,
उडे धैर्य, जैशीं तृणें जीर्ण वातें. २१
धरूनी मनीं सर्व या काळजीला,
निघाले पहायासि गोपाळजीला;
सर्वे चालिली बाळ-वृद्धादि सेना
हरिविण जीवित्व कोणा दिसेना. २२
परम वृद्ध, बहू लवले कटीं,
धरुनि काठि करें, अति संकटीं,

त्वरित चालति, बाळहि रांगती,
हरिच ज्या सुपथीं सकळां गती ! २३

५. विद्याप्रशंसा.

आर्या.

विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व या जगामाजी,
न दिसे एक हि वस्तू विद्येनेंही असाध्य आहे जी. १
स्वाभाविकां गुणांहीं केवळ बघतां समस्त सृष्टींत,
प्राणिगणीं मनुजापरि पंगू एक हि नयेच दृष्टींत. २
सिंह-व्याघ्र-गजादिक असती मनुजाहुनी बळें अधिक,
भासे जयांपुढें हा बलहीन क्षुद्र, जेंवि कीं मशक. ३
देहाच्या सौंदर्यें स्वैरगतीनें हि पाहतां दिसती,
पक्षी लक्षावधि ही, जे श्रेष्ठ नरांहुनी बहुत असती. ४
राजा भर्तृहरि म्हणे, ‘ नर विद्याहीन पशुच जाणावा,’
परि मज वाटे तो पशु पेक्षां ही फार नीच समजावा ! ५
विद्याबल-सम अढळे न दुजें बल कोणतेंहि या लोकीं,
तीनें निजप्रभावें वश केलें सकल विश्व अवलोकीं ! ६
क्षुद्रा पशु पक्ष्यांची काय कथा ? पांच ही महाभूतें,
ज्ञानबळें आकळुनी केलें मनुजें स्वदाससम त्यांतें. ७
विसरूनि परस्परांचा विरोध, जल-वन्हि सेविती त्यातें,
दासापरि वश होउनि करिती त्याच्या समस्त कृत्यांतें. ८
त्याची वस्त्रें विणिती, रथ ओढिति, लोटती हि नौकांतें,
बहु सांगणें कशाला ! करिती तो सांगतो तयां, तें तें. ९

मोठे मोठे तरुवर मोडी, फोडी तशा शिलाराशी,
विद्युल्लता नरें ती केली संदेशहारिका दासी. १०
विद्येच्या सामर्थ्यें केला रवि चित्रकार मनुजानें,
होउनि अंकित वायुहि तुष्ट करी त्यास सुखकरें गानें. ११
व्यासादिक आद्यमुनी कवि अर्वाचीन सर्व थोर तसे,
म्हणती एक मतें कीं धन विद्यासम नरास अन्य नसे. १२
देउनि किंवा भोगुनि उणें न होतां सदैव वाढतसे,
ऐसें एकच विद्याधन, अद्भुत गुण न हा दुज्यांत वसे. १३
न बलात्कारें राजा, न चोर कपटें जया हरायास
होई समर्थ, ज्याच्या अल्प हि संरक्षणीं न आयास. १४
नानाविध रत्नांचीं कनकाचीं असति भूषणें फार,
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार. १५
या साऱ्या भुवनीं हित-कर विद्ये सारिखा सखा नाहीं,
अनुकूळ ती जयाला नित्य, तयाला उणें नसे कांहीं. १६
गुरुपरि उपदेश करी, संकट समयीं उपाय ही सुचवी,
चिंतित फळ देउनियां कल्पतरूपरि मनोरथा पुरवी. १७
कांतेपरि एकांतीं स्वांतातें हर्षवूनियां रिझवी,
आनंदसागरीं मन बुडवुनि चिंताज्वरास ती विझवी. १८
जी करि मर्त्य नराला अजरामर ती सुकीर्ति मिळवाया;
विद्याच साधन खरें, पुढें तिच्या अन्य साधनें वायां. १९
भूमंडळीं पसरलें यश रामयुधिष्ठिरादि राजांचें,
परि तें फळ वाल्मीकि-व्यासांच्या प्रौढ वाणिचें साचें. २०
नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य, हें वचन
सत्य असे, तरि विद्यादानाशीं तुल्य पुण्य आणिक न. २१
ऐश्वर्य-बल-धनादिक सौख्यें प्रसवे समस्त जीं कांहीं,
ती विद्या जो देई, तेणें वद काय तें दिलें नाहीं ! २२

यापरि सकल सुखें जी देई, दुःखें समस्त जी वारी,
त्या विद्यादेवीतें अनन्यभावें सदां भजा भारी. २१

पद्यरत्नावलि.

---

## ६. भीम आणि दुर्योधन यांचें कोपयुक्त भाषण.

### आर्या.

भीम म्हणे, " रे अधमा, केलें त्वां आणि जें तुझ्या तातें,
चित्तांत आठवावें पदरीं फळ घ्यावया, कुजाता, तें; १
विष चारिलें, बुडविलें डोहांत करावयासि वध मातें,
स्मर वारणावतींचें जतु-सद्म-च्छद्म-कर्म अधमा तें ! २
कपट-द्यूतें हरिलें सर्वस्व पुढें करोनि कितवातें,
नेली सभेंत साध्वी, व्हावें शिवतां जिला चकित वातें. ३
त्वां नागवी करविली सुगुणांची प्रीति-हेतु जी वसती,
छळिली परोपरि खळा अस्मत्सर्वस्व कीर्ति, जीव सती. ४
ऐशीं अनेक पापें केलीं त्वां, भरत-कुल-कलंका रे !
तूं नेंवि दुर्गुणांहीं न अशा दशतुंडही अलंकारें. " ५
कुरुराज म्हणे, " मंदा मेळविलें बहु विकत्थनें काय ?
हाय म्हणवितों, युद्धश्रद्धेसह भंगितों तुझा काय ! ६
वदलासि दुर्विचेष्टित माझें जें जें, खरेंचि भीमा तें,
मंदा न तदेक-प्रति–कृत घडलें म्हणुनि लाज भी मातें. ७
म्यां करुनि तुम्हां वल्कल-धर, दीन, सुचिर वनोवन फिरविलें,
अज्ञातवास दास्यहि करवुनि, निजतेज दुःसह मिरविलें; ८
तुज लाविलें स्वतेजें म्यांचि कढी-भात-वरण घाटाया
वांटाया प्राज्य पुरण पापड पोळ्या प्रभूत लाटाया. " ९

मोरोपंत.

---

## ७. शर्मिष्ठा व देवयानी यांचें भांडण.

### ओव्या.

भार्गवी बोले क्रोध-नेत्री, " शिष्य पूजकाचिये पुत्री
पवित्राचें वस्त्र अपवित्री, नेसलीस अविचारें. १
पितृभाग्यें चढलीस मदा उल्लंघिली धर्म-मर्यादा,
येणें दोषें श्रेष्ठपदा-पासोनि चळलिस उद्धते. २
माझ्या पित्याचें आज्ञोदक प्राशूनि जातसे तुझा जनक,
राज्यपदाची हे भीक शुक्रकृपेनें वोपिली. " ३
ऐकोनि कोपली नरेंद्रतनुजा म्हणे, " तूं भिक्षुकाची आत्मजा,
पोषकातें हेळसितां लज्जा पोष्य कैशी पावेना ? ४
अयोग्य व्युत्पन्नाशीं तंडे, निशस्त्री शस्त्रधराशीं भांडे,
दातयासीं मागतें तोंडें थोरीव बोले आपुली. ५
अवलोकितां लोकीं तिहीं, मागण्यापरतें हीनत्व नाहीं,
तोचि जीविनोपाय पाहीं रौरवातुल्य याचका. ६
चौदा विद्या चौसष्ट कळा, चातुर्यज्ञानें गुणागळा,
मागों जातां गोळांगुळा-प्राय भासे परगृहीं. ७
जैशीं आदित्याचीं झाडें, सन्मुख खोलती सूर्याकडे,
कीं पत्रें पसरलीं येरंडें, आवरूं नेणे सर्वथा. ८
तैसा दातया सन्मुख, सदा पसरिला हस्तक,
नाना अवज्ञेचें दुःख, तो विभाग तयाचा. ९
निरंतर राहोनियां नगरीं, आहोरात्र वर्णना करी,
उभा वोळगे जोडल्या करीं, शुक्राचार्य आमुतें. १०
तया भिक्षुकाची कुमरी, मज श्रेष्ठेशीं बोलिसी थोरी,
आपुल्या दोषां जीवीं करीं, दंड पावसी कुबुद्धे ! " ११
म्हणोनि दासीचिया हातीं, पृष्ठीं मर्दिली मुष्टिघातीं,
कूपीं सांडोनि समस्ती गेल्या झाल्या स्वस्थाना. १२

भार्गवी निर्माल्या विशेष ऐसा मानोनी संतोष,
दानवी शांतवोनि रोष, राजगृहीं प्रवेशे. १३

मुक्तेश्वरी.

---

## ८. हंस आणि दमयंती.

### श्लोक.

तो मंडलाकृति फिरे उतरावयाला,
भैमी-मुखेंदु-परिवेष म्हणों तयाला;
तेथें महीवरि तसा खग बैसताहे,
ते सुंदरी निज-कुतूहल जेंवि पाहे. १
जो बैसतां चपल-पक्षपुटीं धरेला,
हाणीतसे फडफडां, ध्वनिही उदेला;
पाहे तया खगवरास वरानना हे,
मानी मनीं नवल हें, मग बोलताहे. २
"असा पक्षी लक्षीं बहु-विहग-लक्षीं न मिळतां,
सुवर्णी जो वर्णी, वद कवण वर्णी कवयिता !
'अगाई ! हा बाई ! त्वरित वरि जाईल पळुनी,
धरूं जातें हातें, हळुहळु, तयातें न कळुनी !" ३
ऐसें वदे, मग तयास धरावया हे,
ते होय हंसगमना, पहिलीच आहे;
वाजेचना वलय, नूपुर-नाद नोहे,
तो तद्गतीस निरखूनि कसा न मोहे ! ४
हं मंद मंद पद सुंदर-कुंद-दंती
चाले, जसा मदधुरंधर इंद्रदंती;
हंसा धरूं जवळि जाय कृशोदरी ते,
निष्कंप कंकण-करासि पुढें करीते. ५

गवसलासि तसा खग भासला,
तरि तदीय सखीजन हांसला.
मग सर्वेचि बुझावुनि हाकिला,
उडविलाचि, पिटाळुनि टाकिला. ६

कांहीं उडोनि गगनीं मग नीट येतो,
नाहींच दूर, न समीप, बसे तसा तो;
पाहे सुधाकर-मुखी कलहंसराया,
लाहे मनोरथ तयास पुन्हां धराया. ७

## सवाई.

" हंस धरीन म्हणोनि मनोरथ हा मज होय विनोद तुम्हांला;
याल, हंसाल, पिटालहि ताल, पुन्हा उडवाल तया विहगाला;
जा परत्याच, तुम्ही नलगेच; " असें वदुनी नृप-राजसुता ते;
राहविलाच सखीजन, आपण मात्र तयास धरूं मग जाते. ८

## श्लोक.

रागेजली, अरुणकांति विराजवीते,
हे एकली सुतनु, चंद्रकला तसी ते
गेली हळूच, कलहंस समीप केला;
कांहीं पुढें फडकला अवलोकिजेला. ९
आणीकही पद न वाजत मंद चाले;
जो चालतां पदर सांवरिला न हाले;
हेही करी निज-करीं खग सांपडेसा
तोंही हळू हळुच होय पलीकडेसा ! १०
मद-गज-गमनेनें मागुती चाल केली,
विनत तनुलता हे तत्समीपास नेली;

पुनरपि फडके हा फारसा दूर नाहीं.
जवळि कवळि ऐसा भासला हंस पाहीं!

रघुनाथ पंडित

## ९. अर्जुन ब्राह्मणसमुदायांतून उठून यंत्रभेदन करावयास जात आहे.

तैं धनुकडे निघे द्विज-वृंदांतुनि विप्र एकला जाया,
सायूंसि तोच शिकवी साधू-साह्यातिरेक लाजाया. १
कोणी म्हणति, " निवारा, आम्हां क्षत्रियकृतोपहासाचें
पात्रत्व नवें द्याया चुचपळ बटु जोडितो पहा साचें ! " २
किति म्हणती, " जाऊंद्या, होउं न देईल कर्म कुत्सा हें,
पूर्वीं श्रीराम जसा, उठलासे हा तसाचि उत्साहें. ३
त्याला अगस्त्य-नामा ब्राह्मण निःशेष नदनदीपातें,
विस्मरलां रामातें कां त्या भृगु-वंश-सदन-दीपातें ? ४
ब्रह्म-तपःकेलि-गृह ब्राह्मण न करिल काय हो बोला ?
विजयोस्तु! म्हणा, चढला विप्राशीनें न कोण तो मोला? " ५
पावे तत्काळ महा-ऋद्धिप्रति, पार्थ तोक, विप्राशी
त्या माता कामदुधा, कारुण्य-स्तन्य तो कवि प्राशी. ६
नमिला आधीं पार्थें विश्वप्रियसुहृदकृत्रिम पिनाकी,
म्हणती यद्यश सेउनि अमृतीं गोडी नसे किमपि नाकीं. ७
मग हृदयीं आठविला कुशल-कर कुशेशयाक्ष कंसारी,
यत्स्मरणें शुचि-मति-यति-पति-गतिला योग्य होय संसारी. ८
करुनि प्रदक्षिणा, धनु उचलोनि ख्याति तो करी मोठी,
चापाच्याचि न केवळ, नरवीरांच्याहि वांकवी कोटी ! ९
यंत्राछिद्र-द्वारें पांचहि शर एकदांचि सोडोनी,
पाडी पळांत पृथ्वी-वरि पुरुष-प्रवर लक्ष्य तोडोनी. १०

प्रीति मुनिगणाच्या ही, राजांच्या कीर्ति सोमवंशाच्या,
घाली कंठीं माळा, कृष्णा त्या श्रीमरुत्वदंशाच्या. ११
आशीर्वादांच्या द्विज, पुष्पांच्या करिति सुरहि वृष्टीतें,
द्रुपदपुरी जनकपुरी-सम सुखदा होय साधु-दृष्टीतें ! १२
ब्राह्मण नाचति रंगीं, आनंदें उडविती स्वचेलांतें,
तें तोय होय हो यश खळ-जन नृप-चित्त-तप्तैलातें. १३
सत्कांत-लाभ-चिंता उत्साहें उचालितांचि धनु सरली
सद्गुण-रक्ता कृष्णा कृष्णाजिन-धारकाहि अनुसरली ! १४

मोरोपंत.

---

## १०. उद्योग.

### श्लोक.

आहेच काळ सकलांहुनि मूल्यवान,
तो आळसीं क्षण निरर्थक घालवा न;
दाही दिशा हुडकिल्या स्वमनें, तथापि
गेली घडी न दिसणार पुन्हां कदापी. १
आयुष्य-वेळ दिधली परमेश्वरें जी,
तद्वृद्धि कोणिही करूं न शके स्वकाजीं;
ती नित्य मात्र घडते दिनरात्र यांहीं,
या लागिं सद्व्यय तिचा करणेंच कांहीं. २
आहेच वेळ तरि पुष्कळ कामकाजा
ऐशा तिच्या भरंवशावरती नका जा.
ती दूर दूर म्हणतां निज-कार्यवेळा
ठेपेल येऊनि, तिची असली स्वलीला ! ३
जो आपला हितक, उद्यम-बंधु, साथी,

त्या नाविसंबुनि धरा दृढ शीघ्र हातीं.
तत्सेवनीं झिजुनि देह सदा वसावा.
जीवा घडेल सुख-भोग, मना विसावा, ४
येतील ते दिवस उत्तम, हा हवाला
घेतां, घडेल न कधीं सुख या जिवाला;
उद्योग आपण करूं जरि एकनेटें,
दारीं घरीं किमपि वाण नुरेल कोठें! ५
उद्योगशील पुरुषास न दे क्षुधा ती
बाधा, कधीं न भिववी विपदा ददाती.
कामीं स्वतां सतत जो रमला तयातें
सोपें कठीण असतांहि समस्त होतें. ६
जें काम आज करणें, न उद्यांवरी तें
टाकीं, स्वयें त्वरित सिद्धि तया वरीते;
प्रत्यक्ष मेहनत माय खऱ्या विधीची;
संपत्ति दे स्वतनया परमावधीची. ७
सारें हि दुर्मिळच मेहनतीशिवाय;
दे पेरिल्याविण फळास जमीन काय?
कोठनि दे उघडिल्याविण छत्र छाया,
पंखा हवेस्तव हवा तरि हालवाया ! ८

व्यवहारपद्यसंग्रह.

---

## ११. भीष्मार्जुन-युद्ध.

[ अर्जुन पराभूत झाल्यावर श्रीकृष्ण भीष्मावर धाऊन जातात ]

भीष्म ग्रीष्म-तरणिसा, अर्जुन हेमंत-तरणिसा गमला,
देव ह्मणे, "बहु आला, वृद्धाहुनि जिष्णुचाचि राग मला. १

हा शूर ' दूर, ओ, सर, ' म्हणणार महा-प्रभा-वहा रविला!
हार विलासि जनेंसा येणें कैसा प्रभाव हारविला? २
झाला धीर परि परिम्लान सखा जाति-पुष्प-गुच्छकसा,
तुच्छ कसा हा प्रवया चिरद्विज भलता अहींद्रपुच्छ कसा! ३
हा पांडवांसि भस्मचि करिल उपेक्षा करूं नये याची,
पदरासि अकीर्तिश्रित-सुहृदनवनपथकरून येयाची!" ४
आणुनि मनीं असें, ज्या धन्य म्हणति सर्व विप्र, तो दास
भीष्म वधाया धांवे हरि, हस्तें कवळुनि प्रतोदास. ५
देव रथातें सोडुनि, धांवे देवापगा-विलापार्थे,
कीं दुस्तरारि सागरिं न बुडो कासेसि लाविला पार्थ! ६
पार्थप्रति प्रयत्नें तो बळ कारुण्य-सिंधु राखाया,
क्रोधें गर्जत धावे, सिंह जसा मत्तसिंधुरा खाया; ७
" एह्येहि देवदेव! श्रीकृष्ण! नमोस्तुते!–" असें बोले,
ओले गळ प्राज्य-प्रेमाश्रुभरें करूनियां, डोले! ८
भीष्म म्हणे, " त्वद्धस्तें व्हाया समरांत शांत नवसा जो
होता करित, तो हा जेंवि हरिहतेभ शांतनव साजो! ९
जरि मारशिल, मज गति लाभ, तुजहि कीर्ति लाभ गुरु-तर तो.
विश्वगुरो! प्राकृतही, तारुनि शरणागतासि, गुरु तरतो. १०
तूं हरिसा हरि, साची हरिणी सुरसिंधु, मीहि पाडससा
पाड, ससाध्वस हो अरि-हरिचा पावेल काय पाड ससा? ११
ब्रह्मांड भस्म व्हावें ज्याच्या दर-रक्त-चक्षुच्या पातें,
तो तूं आगें मारूं पाहसि मज, दावुनि प्रतापातें! १२
झालों धन्य त्रिजगीं! भास पळ प्राकृतांसि मारकसा;
त्या प्रभुनें तो केला भस्म स्वातिक्रमेच्छु मार कसा?" १३
धांवुनि धरी धनंजय मागुनि त्या माधवासि बाहूंनीं;
मग्न दृढ चरणींच मिठी घाली पहिलीच रीति पाहूनी. १४

दूर उसळला होता कोपावेशें मुकुंद कंदुकसा.
राहे उभा प्रभु, गमे इभसा;-धृतचरण भक्त अंदुकसा. १५
पार्थ म्हणे, " श्रीधर्मा-वरि धरितिल जे असिप्रति ज्ञाती
मरतील; त्यजसी कां 'आयुध न धरिन' असि प्रतिज्ञा ती? १६
मारिन भीष्मातें मी,-इतरांतें ही, भवद्दयाधारें;
बा! त्वत्प्रसाद ज्यावरि, केवळ मेर्वग्रही तया धारें! १७
लोक तुज मृषावादी ऐसें न म्हणोत सत्य-संध-पते,
मरतिल तव-दृक्पातें भीष्मद्रोणादि सर्व अंधप ते." १८
कुरु-कुंजरासि गेला होता यदु-सिंह तो खरा खाया,
परते पर तेथूनि, प्राण-प्रिय-मित्र-तोख राखाया. १९

मोरोपंत.

---

## १२. वर्षाऋतूचें वर्णन.

### श्लोक.

वर्षास येइ, परि ही सकलांस वर्षा
देऊनि जीवन, करी बहुत प्रहर्षा;
आईच ही स्वशिशुताप-निवारणाला
अत्यंत तत्पर असे जनपोषणाला. १
चोरास, साधुस, रसालतरूस, आणी
निंबास, चंदनतरूस समान पाणी
देवोनियां टवटवीत करी समस्तां,
मातेसमानचि जगांत असे प्रशस्ता. २
सखे, वर्षर्तूची घन-मदकरी सज्ज करुनी
पहा स्वारी आली, बहुतचि कडाकोट करुनी;
नगाऱ्याशीं तुल्य ध्वनि गडगडा होय, महती
निशाणाची शाटी लखलखित ही वीज दिसती ! ३

हा शूर ' दूर, ओ, सर, ' म्हणणार महा-प्रभा-वहा रविला!
हार विलासि जनेंसा येणें कैसा प्रभात हारविला? २
झाला धीर परि परि-म्लान सखा जाति-पुष्प-गुच्छकसा,
तुच्छ कसा हा प्रवया चिरडिल भलता अहींद्रपुच्छ कसा! ३
हा पांडवांसि भस्मचि करिल उपेक्षा करूं नये याची,
पदरासि अकीर्तिश्रित-सुहृदनकनपथकरून येयाची!" ४
आणुनि मनीं असें, ज्या धन्य म्हणति सर्व विप्र, तो दास
भीष्म वधाया धांवे हरि, हस्तें कवळुनि प्रतोदास. ५
देव रथातें सोडुनि, धांवे देवापगा-विलापार्थ,
कीं दुस्तरारि सागरिं न बुडो कासेसि लाविला पार्थ! ६
पार्थाप्रति प्रयत्नें तो बळ कारुण्य-सिंधु राखाया,
क्रोधें गर्जत धावे, सिंह जसा मत्तसिंधुरा खाया; ७
" एह्येहि देवदेव! श्रीकृष्ण! नमोस्तुते!–" असें बोले,
ओले गळ्ल प्राज्य-प्रेमाश्रुभरें करूनियां, डोले! ८
भीष्म म्हणे, " त्वद्धस्तें व्हाया समरांत शांत नवसा जो
होता करीत, तो हा जेंवि हरिहतेभ शांतनव साजो! ९
जरि मारशिल, मज गति लाभ, तुजहि कीर्ति लाभ गुरु-तर तो
विश्वगुरो! प्राकृतही, तारुनि शरणागतासि, गुरु तरतो. १०
तूं हरिसा हरि, साची हरिणी सुरसिंधु, भीहि पाडससा
पाड, ससाध्वस हो अरि–हरिचा पावेल काय पाड ससा? ११
ब्रह्मांड भस्म व्हावें ज्याच्या दर-रक्त-चक्षुच्या पातें,
तो तूं आंगें मारूं पाहसि मज, दावुनि प्रतापातें! १२
झालों धन्य त्रिजगीं! भास पळ प्राकृतांस मारकसा;
त्या प्रभुनें तो केला भस्म स्वातिक्रमेच्छु मार कसा?" १३
धांवुनि धरी धनंजय मागुनि त्या माधवासि बाहूंनीं;
मग दृढ चरणींच मिठी घाली पहिलीच रीति पाहूनी. १४

दूर उसळला होता कोपावेशें मुकुंद कंदुकसा.
राहे उभा प्रभु, गमे इभसा;–धृतचरण भक्त अंदुकसा. १५
पार्थ म्हणे, " श्रीधर्मा-वरि धरितिल जे असिप्रति ज्ञाती
मरतील; त्यजसी कां 'आयुध न धरिन' असि प्रतिज्ञा ती? १६
मारिन भीष्मातें मी,–इतरांतें ही, भवद्दयाधारें;
बा! त्वत्प्रसाद ज्यावरि, केवळ मेर्वग्रही तया धारें! १७
लोक तुज मृषावादी ऐसें न म्हणोत सत्य-संध-पते,
मरतिल तव-दृक्पातें भीष्मद्रोणादि सर्व अंधप ते." १८
कुरु-कुंजरासि गेला होता यदु-सिंह तो खरा खाया,
परते परः तेथूनि, प्राण-प्रिय-मित्र-तोख राखाया. १९

मोरोपंत.

---

## १२. वर्षाऋतूचें वर्णन.

### श्लोक.

वर्षास येइ, परि ही सकलांस वर्षा
देऊनि जीवन, करी बहुत प्रहर्षा;
आईच ही स्वशिशुताप-निवारणाला
अत्यंत तत्पर असे जनपोषणाला. १

चोरास, साधुस, रसालतरूस, आणी
निंबास, चंदनतरूस समान पाणी
देवोनियां टवटवीत करी समस्तां,
मातेसमानचि जगांत असे प्रशस्ता. २

सखे, वर्षर्तूची घन-मदकरी सज्ज करुनी
पहा स्वारी आली, बहुतचि कडाकोट करुनी;
नगाऱ्याशीं तुल्य ध्वनि गडगडा होय, महती
निशाणाची शाटी लखलखित ही वीज दिसती! ३

ढगा पाठीमागें ढग जमुनि हे थाट असती,
जसे योद्धे अंगीं धरुनि कवचें कृष्ण दिसती !
पुढें वारा सेनापतिच सरसावूनि हटवी
तपर्तूंत मागें, अणिक बहु तच्छक्ति घटवी. ४

सूं सूं अगोदर सुटे घनघोर वारा
मागोनियां सरसरा पडताति धारा;
व्योमीं विजा लखलखा लवताति भारी
गर्जे बहू कडकडा घन भीतिकारी. ५

घेतो जनाकडुनियां नृपती धनातें,
जैसा पुन्हाहि समयीं धन देइ त्यातें,
तैसाच आठ महिने जळ सूर्य घेतो,
भूमीस वर्षुनि पुन्हां समयींच देतो. ६

होऊनि भर्तृविरहें बहु तप्त कांता
होतांच योग पतिचा जशि होय शांता,
तैशी मही प्रथम तप्त बहूत झाली,
पर्जन्ययोग घडतांच पहा निवाली. ७

धाराभिघात अचलावरि होत आहे
मित्रा, तरी तिळहि हे ढळती न पाहें !
जे उच्च त्यांस व्यसनें जरि फार आलीं
तत्रापि हे स्थिरचि होत विपत्तिकाळीं. ८

वाटा तृणें उगवतां सकळा बुजाल्या,
संस्कारशून्य, बहु संशयदायि झाल्या,
विद्या जशा परिचयाविण संशयातें
देताति लुप्त बहु होउनियां जनातें. ९

चंद्र प्रकाशित करी सकळां घनांतें,
त्याचेंचि रूप घन झांकिति हे पहा; तें

आहे तयास फल अल्पदिनांत हानी
साहंकृती, मलिन, जो गुरुला न मानी. १०

शेतें मळे सकळ हे जळबंब झाले,
हा कोण पाउस ! महापथही बुजाले;
ओढ्यांतुनी खळखळां जळ वाहताहे,
घों घों चहूंकडुनियां वनवात वाहे. ११

पूरें नद्या भरूनियां दुथडी वहाती,
पांथस्थ हे अडुनि ऐलथडी रहाती;
नौकाद्युपाय न चले, न कळेच कांहीं;
व्यापार-शून्य बसले जन ठायिं ठायीं. १२

पाणी बिळांत शिरतांच महाभुजंग,
सं सूं वरी निघुनि, पावुनि अंगभंग,
हे शेंकडोंच पडले क्षितिपृष्ठभागीं,
तैसे अनेकविध जंतुहि जागजागीं. १३

आहा ! उदार किति हा नव मेघराजा,
वृष्टी करोनि, समतुष्टि, जनांस ज्या ज्या
आपत्ति, त्या सकळ शांति करोनि वारी
संताप, देउनि सुपुष्कळ भोज्य, वारी. १४

होतां कलाधिप तमांत विलुप्त सारा,
खद्योतसंघ करि हा अपुल्या प्रसारा;
विद्युत्प्रसंग नसतां बहु सावकाश
स्वच्छंद मूर्ख करिती अपुला प्रकाश. १५

होतां अखंड घनगर्जित, त्यांत भेक
टों टों ध्वनी मिळुनि हे करितीं अनेक;
मूर्खें उगेंच विबुधांपुढतीं बसावें
हांसास पात्र न वदूनि कदापि व्हावें ! १६

पूरें समुन्नत तरू उपटून गेले,
होऊनि वेतस विनम्र तसेचि ठेले;
अत्यंत नम्रचि सदा प्रवळासि व्हावें,
ह्या वेतसांपरि समुन्नतिला भजावें. १७
येताच मेघ गगनीं उदायास, फार
हे मोर नाचति उभारुनि पुच्छभार,
जे लोक तापहर साधु, समृद्धि त्यांची
पाहूनि शांतिच घडे स्थिरजंगमाची. १८
सोपानमार्गचि जणो नवमेघखंड,
तींहीं चढोनि गगनावरि हे उदंड,
जाती जणो स्वकुसुमें रविला पुजाया,
अत्युच्च वृक्ष कुटजादिक धन्य व्हाया. १९
आला वसंत म्हणतां म्हणतांचि गेला,
ग्रीष्मर्तु येउनि तसाच समाप्त झाला;
वर्षाऋतु प्रगटुनी सुचवी जगातें
कीं धुंद होउंच नका! जग सर्व जातें! २०
बालत्व आणि तरुणत्व तशी जरा ही
एकापुढें इतर होय, तरी न राही
कांहींच, यास्तव वहू समजून वागा
कीं, शेवटीं नच पडा पदरांत नागा! २१
एक्या ऋतूंतिल दुज्या ऋतुमाजि नाहीं
वस्तू, असें समजुनी सकळां जनांहीं,
तत्तत्प्रसंगीं उपलब्ध असेल कीं जें;
तत्संग्रहार्थ बहु सत्वर यत्न कीजे. २२

ऋतुवर्णन.

## १३. नळ व दमयंती.

### श्लोक.

प्रकट तिजपुढारां जाहला राजमाळी,
पदर वरि न घेतां हार तैसा झळाळी;
' निजहृदय-निवासी काय बाहीर आला ? '
निरखुनि दमयंती तेंवि मानी तयाला. १
गजबजोनि समस्त तिच्या सख्या,
गजगमा उठल्या तिज सारिख्या;
पदर सांवरितां नृपबाळिका,
झळकती हृदयीं मणिमाळिका. २
रामातें जनकक्षमापति-सुता, रामा जशी रेवती,
कामारीस नगाधिराजतनया, कामासि जैशी रती,
या मानूनि तशी विदर्भदुहिता रामा मनीं भाविते,
हा माझा हृदयाब्जसूर्य म्हणुनी त्या मानिनी बोलते:- ३

साकी " कोण तुम्ही कवणाचे, कोठुनि येथें कां आलां हो?
काय निमित्तें दिधला मजला हा निजदर्शन-लाहो ? ४
अटक न केली तुम्हांसि येतां त्या सातांही बंकीं,
हीं माझ्या नयनाचीं सुकृतें, विशेष मी हें शंकीं ! ५
सभवला कवणाचे वंशीं ? सांगा हो, अकळंकी !
उभे असा कां, भागतसां हो, या, बैसा पर्यंकीं ! ६

श्लोक. " राजे असाल, तरि धन्य वसुंधरा हे,
शोभाल देव तरि, नाक यथार्थ आहे;
भोगी तुम्ही उपजलां जरि नागलोकीं,
खालीं असोनि सकळांवरि होय तो कीं ! ७

## साकी.

" दुग्धपूर नसतां निजरूपीं क्षीरसिंधु तो जैसा,
वसंत आला नाहीं तरि तो उद्यानभाग जैसा, ८
अमृतकराचा उदय न होतां रजनीसमयो जैसा,
तुमच्या विरहें आजि जहाला कवण देशतो ऐसा; ९

श्लोक. भूपाळ जो मम मनोमुकुरीं उभासे,
तो नैषधेंद्र तुमचा अनुबिंब भासे,
रूपें तरीच दिसताति दिगंतराळीं
तीं हीं कसीं म्हणवितील तुम्हां निराळीं ? " १०

" आहेस कीं सुखवती कमनीयलीळे,
निश्चित कीं हृदय होय तुझें सुशीळे?
आतां नकोच अवलंब विलंबनाचा
हेजीब मी समज मुख्य-सुराधिपाचा. ११
जो धरी निजकरीं शतकोटी,
ज्यासि नम्र सुमनःशत कोटी,
तो सुरेंद्र हि तुला नत, याची-
' हा असो वर ' तुळा न तयाची. " १२
बोले नृपाळ, " पुससी मम वंश, नामें,
या वीण सांग तटलीं तुझि काय कामें ?
आलों सुधांशमुखि ! जे घटना कराया,
तीतें विचारुनि वरीं सुरलोकराया. " १३

## घनाक्षरी.

बोले सुंदरी तयासी, । " स्ववंश नाम न सांगसी
तरि आम्हां परपुरुषासी । वदणें मर्यादा नोहे. " १४
तिचा पाहुनियां कोप । काय बोले नळभूप,

" चंद्रवंशाचें हें रोप । माझें जाण, राजसे ! १५
महाजनाचा आचार । निज नामाचा उच्चार
करूं नये हें साचार । शास्त्राधार आहे कीं. " १६
पुन्हां बोले ते सुंदरी । " चंद्रवंशीं महीवरी
बहू आहेत ते परी । नामें घेतां जाणावें. १७

## आर्या.

" मी वासुदेव ऐसें स्वनाम मुरहर वदे सकळवेदीं
आधार तोचि मानुनि निजाभिधानासि कवण न निवेदी ? " १८

## घनाक्षरी.

बोले नैषधेंद्र वाचा । " नाम हेंजीव इंद्राचा,
किती संक्षेप नामाचा । काय तेणें करिसी तूं ? १९
केला काय अंगीकार । बोलूं इंद्रासी निर्धार ? "
तंव ते बोले सुकुमार । चंद्राकार-वदनातें.— २०

## श्लोक.

" ऐरावतावरि बसोनि, विमानदेशीं
जो संचरे सुरपती सुखसंपदेशीं,
मी भूमिकेवरि असोनि, तयास कांहीं
मागावया तरि कशी मज लाज नाहीं ? २१

## घनाक्षरी.

नळा वेगळा भ्रतार । नलगे स्वप्नीं हें साचार
ऐसा निश्चय विचार " । तंव राजेंद्र बोलतो. २२
" टाकुनि इंद्राचा संभ्रम । धरिसी कां तूं नळ-भ्रम,
आईल अवस्था विभ्रम । नसता श्रम होइल. २३
तुझें सौंदर्य पाहाया । धरी सहस्राक्ष-काया
तया वरीं देवराया । नळमाया टाकुनी. २४

अथवा तुज जो मोहला । होऊं नेदी नैषधाला,
यास्तव त्याच इंद्राला । माळ गळां घालावी. ” २५

रघुनाथ पंडित.

---

## १४. पांडव अज्ञातवासांतून प्रगट होतात.

### आर्या.

अच्युत-पदासि चिंतुनि सानुज धर्म स्ववेष घेऊनी,
सुदिनीं बसे नृप-पदीं त्या मत्स्याच्या सभेंत येऊनी. १
मागुनि विराट येउनि हांसोनि ह्मणे, “ सभासदा, कंका,
भद्रासनीं बसाया आजि तुज कशी न वाटली शंका? ” २
अर्जुन म्हणे, “ नृपा हा हरिच्या अर्धासनीं बसायाचा,
आहे प्रताप-महिमा विख्यात जगत्त्रयीं असा याचा ! ३
गंधर्वांसि हरि म्हणे ‘ याचींच यशें करूनि तांडव गा ! ’
हा पुण्य-श्लोक प्रभु सम्राट् सद्गुणसमुद्र पांडव गा. ” ४
मत्स्य म्हणे “ पांडव हा तरि भीमप्रमुख बंधु जे चवघे,
कोठें? कृष्णा कोठें? जीस क्षणहि न विसंबती अवघे. ” ५
पार्थ म्हणे, “ सूद तुझा बल्लव मगधेंद्रकाय हा चिरिता,
करिता झाला सूतान्वयसागर भीम-काय हाचि रिता. ६
हयपाळ जो नकुळ तो, गोपाळक तोचि होय सहदेव,
अर्जुन बृहन्नडा मी, भिडला ज्या चापपाणि-सह देव. ७
सैरंध्री हे कृष्णा, मेले कीचक इला अनादरिते,
हे किति, हर-मुरज उदधि व्हावे क्षोभें इच्या अनाद-रितें. ८
अज्ञात-वास दुर्घट, परि निर्विघ्न त्वदाश्रयें घडला,
होतों सुखरूप तुझ्या गर्भांत, श्रम न लेशही पडला. ” ९
उत्तरहि पांडवांतें वर्णुनि, कळवी पुन्हा स्वजनकास

कीं " होचि घालणारे व्यसनीं तारावया स्वजन कास. " १०
भूप म्हणे " त्वां अर्जुन पूजावा, सर्वकाळ भीमहि त्यां,
न असत्य हरिजनाच्या सोडुनियां गर्व काळ भी महित्या. ११
वत्सा काय वदों रे, धर्मात्मा धर्म हा असा मान्य,
त्यां ताडिला ललाटीं अक्षें, अपराध हा असामान्य ! १२
सचिवांहीं, त्यां, त्वांहीं प्रार्थावा धर्मराज, कन्या या
द्यावी धनंजयाला, पोटीं घालावयासि अन्याया. " १३
उत्तर म्हणे, " बहु बरें, नकळत अपराध घडति परि साचे,
साधु क्षमी यशस्कर, घनहि सुभूषेंत पडति परिसाचे ! " १४
भेटे विराटराजा त्या पांचा पांडवांस गुरुसाच,
व्यसनांत आश्रयप्रद अन्नप्रद होय वृद्ध गुरु साच. १५
धर्मासि म्हणे, " बा गा साधो, जोडा नसेचि या दिवसा,
स्वपदीं मच्चित्तींही संपादुनि सुकृत-जय-दयादि वसा. १६
तारुनि परासि तरती हरि-जन, जें वर्णिलें असें कविनीं,
तें दाविलें मज तुम्हीं कुरुकुळ-संतति-सरोजिनी-रविनीं, १७
राज्यादि सर्व दिधलें तुज त्यां, हें आपुलें असें म्हण गा,
शशि-चूड नको न म्हणे धुतऱ्याचें फूल वाहत्या भणगा. १८
धर्मा, धनंजय-वधू होउ म्हणे धन्य भाग्य मत्तनया
देसील मान वचना तूंचि प्रभु अन्य भाग्यमत्त न या १९
पाहे धर्म धनंजय-वदनातें तेधवां नर वदे तो,
ते परिसिते म्हणाति सुख याहुनि हरि-वेणुचा न रस देतो. २०
" प्रेम तुझें आम्हांवरि ऐसेंचि दया सुधानदी राहो,
अभिमन्युची वधू हो ती माझी बा वुधा न दारा हो. २१
केंवि वरावी वर्तत होती कीं एक वर्ष कन्यासी,
हरिजन कथेंत शिरतां न विशंकावे शुकादि सन्यासी २२

तो साधु-जनां तोखद ओखदसा होय खळ-जना, भाचा
योग्य तुला जामाता, बहिश्वर प्राण जळज-नाभाचा." २३

मोरोपंत.

---

## १५. भरतभाव.

### श्लोक.

वाम-अंकगत भूमि-कुमारी वामबाहु-सुरता सुकुमारी;
वल्कलांबर-जटा-अभिरामा देखतो भरत त्या अभिरामा.
दूर्वा-दल-श्यामल दीप्ति देहीं, सेवी पदें लक्ष्मण तो विदेही;
गंगातटीं सेवित मंदवातें देखे अशा श्रीरघुपुंगवातें २
देखोनि ऐसें रघुनंदनातें धांवे त्वरेनें पदवंदनातें,
अलभ्य जो हर्ष सुरादिकांहीं तो होय,त्या माजिच शोक कांहीं. ३
रडे फुंदफुंदे, शिरीं पादपद्मा
धरी, सद्म मानी जया नित्य पद्मा;
वळे क्षेम दे, त्यास वोढूनि राम,
स्व-भक्त-प्रिय स्वामि-विश्वाभिराम. ४
मांडियेउपरि बैसविला हो, अश्रुनीर पुसि, दे सुखलाहो;
बापरा न रड, सांग सुवार्ता, शब्द हा निववि दुःख-दवार्ता. ५
तों देखिला गुरु वसिष्ठ, तयास वंदी
ब्रम्हण्य देव जडला चरणारविंदीं;
तों माउल्या तिघिहि सत्वर पावल्या हो,
भेटोनियां तिघिहि सत्वर सेविल्या हो. ६
पिता सुखी कीं म्हणतांचि रामा,
राहोनि त्या सांगति सूपरामा;
रडे अहो रामहि लोकरीती,

स्त्रिया पुन्हा शोक महा करीती ! ७
सपिंडी क्रिया राम गंगातटाकीं,
करी, आणि ते पिंड गंगेंत टाकी;
रडे लोकदृष्टीस शोक-श्रमातें,
प्रभू दाउनी, ये पुन्हा आश्रमातें. ८

तों वदे भरत गोष्टि मनाची, प्रार्थना बहुत आगमनाची
मांडिली, परि न राघव मानी, देखतां सुरवरांस विमानीं. ९
आणि फिरे स्वपुरीप्रति राम हा म्हणुनि, आधि मनीं अमरां महा;
भरतशब्द तदर्थ न ये मना, पुरविणें प्रभुला सुरकामना. १०

" आज्ञा पित्याची मज मोडवेना,
वत्सा, तुझी गोष्टहि तोडवेना;
घालूं नका बा मज संकटांत,
नको पडों या सहसा हटांत !" ११
असी आयके जेधवां रामवाणी,
मुखश्री करी बंधु तो दीनवाणी;
म्हणे, " तात-आज्ञा मृगांकानना रे
मला सांग, जाईन मी कानना रे !" १२
" बापा, ऐसें वर्ततां तो विशेषें
आज्ञा-भंग प्राप्त दोघां अशेषें;
एवं राज्या-तें तुवां रे भजावें,
ताताज्ञेनें कानना म्याच जावें." १३
येना असे भरत देखुनि रामराया,
गंगातटीं रचुनि दर्भ बसे मराया;
पाहे वसिष्ट मुनिवक्त्र-सरोरुहातें,
श्रीराम, आणि खुण दाखवि हो स्वहातें. १४
" कीं सांग गुह्य अवतार-चरित्र याला,

जें तारितें चहुंयुगांत जगत्त्रयाला;"
बोले वसिष्ठ मग सन्निध जाउनीयां,
"कां प्राण टाकिसि" म्हणे समजावुनीयां. १५
"हा राम मारील दशाननासी,
यालागिं जातो प्रभु काननासी;
नको निवारूं भरता, तयाला
ब्रम्हादिकांच्या पद-दातयाला. १६
येणार मागुति चतुर्दश-वत्सरांतीं,
राहो वनांत तितुके दिन आणि रातीं;
आत्माच तो, तुज वियोग तयासि नाहीं,
येऊनियां करिल जे तव कामना ही." १७
हें आयकोनि जरि शोकहि दूर केला,
प्रत्यक्ष-दर्शन-सुखास बहू भुकेला;
तेव्हां उठोनि भरतें पदवंदनातें
केलें दुरूनि, म्हणतो रघुनंदनातें. १८
देखोनियां गमन निग्रह राघवाचा
बोले उभा भरत, निश्चयरूप वाचा—
"वर्षें चतुर्दशवरीच धरीन देहा
त्यानंतरें त्यजिन यास, निरोप दे हा. १९
वर्षें द्विसप्तभरि काल समाप्त झाला,
त्यानंतरें अजि तुझ्या चरणांबुजाला
स्पर्शें शिरें न जरि, देह तयाच वारीं
यातें त्यजीनचि, विरिंचि जरी निवारी. २०
वर्षें चतुर्दशहि रक्षिन, शासनातें
अंगीकरीन, न बसेन नृपासनातें;

सिंहासनावरि तुझ्या पदपादुका मी
पूजीन जों तवपदांबुज-लाभ-कामी. २१
पादुका जडित आणुनि हातें, रामचंद्र चरणांबुरुहातें
लावुनी, निजशिरीं भरतानें वंदिल्या, रघुवरांघ्रि-रतानें. २२

वामन.

---

## १६. मार्कंडेय.

### श्लोक.

पूर्वी एक मृकंडु- नामकमुनी सत्कर्म-धर्मार्थिला,
कांतेनें प्रियकांत तो प्रियपणें पुत्रार्थ जो प्रार्थिला;
" संतानाविण हें जिणें जड जगीं संसार निःसारसा
भासे, यास्तव हो स्तवा पशुपती मागा कुळोद्धारसा." १
जाणोन हृद्गत तिचें मुनिराज-राजे,
हे मी सुखी करिन फार सुतातुरा जे,
तो आचरे गिरिदरींत महातपातें,
सोसूनियां कठिण-वात, हिमातपातें. २
ध्यानीं वसे मुनि उदार सदाशिवाचे
पंचाक्षरी-प्रमुख मंत्र जपोनि वाचे;
ऐसें पुरश्चरण-संचित फार झालें,
शेखीं तयासि निजपुण्य फळासि आलें. ३
झाला प्रसन्न मुनिमान्य पिनाकपाणी,
" बा रे अभीष्ट वर माग ! " म्हणे सुवाणी.
" मी तों विरक्त, विभवादि नको, परंतु
संतान एक मजदे कुळ-हेतु-तंतु. " ४
त्यानंतरें शिव सनातन-कर्मसाक्षी,

बोले सखोल तनु अर्ध जया मृगाक्षी,
" देईन दान परि एक विधान भासे,
तूं ऐक, माग मग, लाग विवेक-कासे. ५
साधू, सुंदर शाहणा सुत, तया सोळाच वर्षें मिती,
जो का मूढ कुरूप, तो शतवरी वर्षें असे स्वस्थिती;
या दोहींत कसा मनांत रुचला तो म्यां तुतें दीधला; "
झाला थोर तटस्थ ऐकुनि मुनी, दोहींकडे वेधला ! ६
मग म्हणे मुनिराज, " कृपानिधी ! घरिं विचारून येइन आवधी,
निजवधूसि कसा सुत मानला। पुसुन येइन, सांब शिवा, भला. " ७
त्वरितगति निघाला, शीघ्र सद्मासि आला,
प्रिय वधुसि वराला सांगता सांग झाला;
मग सति पद माथां वंदुनी प्राणनाथा,
कथि न सुरस गाथा सर्व संसार चाथा. ८
" सारासार-विचार-पंडित, महाचातुर्य-चिंतामणी,
विद्या-वेद-विनोद-वाद-बुधता-वेदांत-बोधाग्रणी,
रूपें सुंदर, देहदिव्य धरिला थोड्या वयाचा जरी,
वंशोत्तंस, अभंग, मंगळनिधी, कल्याणकारी तरी ! ९
धीमंत तो करि सुकर्म निजस्वभावें,
कर्मैं स्वधर्म उजळेल गुण-स्वभावें;
धर्मेंच मर्म समजेल, तदा भवारी,
तुष्टेल इष्टद सदाशिव कष्ट वारी. " १०
आकर्णोनि सुपर्णसा पुनरपी पूर्वस्थळा पातला,
साष्टांगें प्रणिपात त्या मुनिवरें पादांबुजीं घातला;
" दे देवा, मज पुत्र सुंदर, भला, ज्ञाता सुहृत्तापहा ! "
गौरीनाथ तथास्तु ! बोलुनि निजस्थानासि गेला पहा ! ११
आश्रमीं मग मुनी प्रमदेशीं । नांदतां गिरिगुहान्तर-देशीं;

गर्भचिन्ह धरिलें पति पाहे। तो म्हणे मुनि, महेश कृपा हे! १२
'मार्कंडेय' अशी मृकुंडमुनिनें नामाभिधा ठेविली,
वाटे बालक बोबडें नव वदे, ते वाक्सुधा सेविली;
झाले वत्सर पांच, योग्य म्हणुनी केला द्विजाती भला,
झाला धर्म-निधान तो गुरुकुळीं, विद्या भली लाधला. १३
तर्कव्याकरणादि-नाटक कळालंकारशास्त्रांतरीं
ज्याचा खेळ, अशी विशाळ झळके प्रज्ञा-प्रभा अंतरीं;
लीलाप्राय समस्त प्राकृत-कथा वेदांत- सिद्धांत ते,
हातीं आमलका-समान डुलती, सांगों किती काय तें! १४
वर्षावरी स्वसुख वर्षत वर्ष जातां,
चिंता तशा तशि उठे बहु हर्ष-जाता
माता पिता उभयतां भय-ताप- संगें,
संतप्त गुप्त रुदती बहुता-प्रसंगें. १५
"हा संकटा! कटकटा! विकटा! कपाळा!
कां दीधला सुत मला, सुरलोक- पाळा!
होतों सुखी न गणितांचि अशा भयातें
दैवा फुटे हृदय, आठवितां वयातें!" १६
मार्कंडेया कारणें माय-बापें। झालीं दीनें, शोषिलीं शोकतापें;
वर्षें गेलीं पंधरा आजि याला,। एका वर्षा कोंवि देखों तयाला!" १७
धारल धाक मनीं वदतां तया। बहुत मानिल हा रुदतां भया;
म्हणुनि ना रुदती वदती भिती। उभयतां सहज-स्थिति दाविती. १८
परंतु तें दुःख मनीं न झांके। सर्वेंद्रियां शोक-समुद्र फांके;
येती बळें लोचनिं बाष्पधारा। या इंगितें जाणविलें कुमारा. १९
जडुनि हात वदे मृदु मात "कशास मनांत विखेद करां,
काय उणें पडलें मजपासुनि!" पाय नमी विनवी पितरां;
कंठ सगद्गद बोलति ते "शितिकंठ-वरें दिधलासि बरा,

संकट घालुनि शंकर दे वर शंकतसें सकळंक-वरा." २०
रुदित होति त्या प्रति निरोपितां । वदति यापरी माउली पिता;
शिवशिवा! असा खेद कासया । करितसां तुम्ही, नाहिं नाश या. २१
शिव दयाळु जो दे सुसंतती । भजति त्यांचिया रक्षितो तती.
अजि तया उणी काय संपदा । विनटतां पदा वारि आपदा." २२

पूजानुरक्त बहुभक्त विरक्त झाला,
चित्तीं जपे सतत सांब-पदांबुजाला;
मृत्युंजयाविण जगीं भय कोण नाशी ?
निर्धार हा समजुनी नियमी मनाशी. २३
जपत तपत ऐसा तो करी तीर्थयात्रा,
धवल शुभ विभूती लाउनी सर्व गात्रा;
स्फटिक-मणि-गणाच्या रम्य रुद्राक्षमाळा,
करिं शिरिं निजकंठीं नित्य घाली सुढाळा. २४

हृत्पद्मीं शिव पादपद्म धरुनी पद्मासनीं बैसला,
जैसा पद्मज पद्मपाणि-युगुलीं प्रार्थी तसा भासला;
त्या काळीं विकराळ सेवक यथाकाळीं मुनींद्रावरी,
काळें पाठविलें बळें क्षितिवरी, त्या कोण बा आंवरी ?२५
आले गर्जत खड्ग-खेटक-गदा-पाणी दणाणी धरा
हातीं झेलित वागुरा निगदिती 'ओढा विदारा धरा!'
धांवा घेत उफाळती द्विजवरा ते लक्षिती लोचना,
तो भ्याले शिवमूर्ति देखुनि दिठी ध्यानीं जगन्मोहनी! २६

भ्याले असे समजुनी शिवपूजनातें,
लेखीच ना मुनि मनांत रिपू-जनांतें!
वाचेसि नाम जपतां शिवशंकराचें,
सामर्थ्य लेश नचले यम-किंकरांचें! २७

क्रोधें काळ उफाळिला, भुजबळें जाळें झुगारी गळां,

तों झांकोनि दिठी शिवाप्रति मिठी मारी मुनी आगळा;
लिंगाही समवेत पाश जडतां हांकारिले ब्राह्मणें,
" शंभो, शंकर, धूर्जटे, पुरहरा ! आतां नुपेक्षीं ! " म्हणे. २८
निरखुनि यम डोळां मारिली लात देवें,
क्षण न लगत भूमीं पाडिला वामदेवें;
सुरवर सुमनाचे वर्षती भार भारी,
मुनि नमुनि उभा तो धाट जैसा इभारी. २९
मृकंडूच्या बाळा धरि हृदयिं काळांतक करें,
म्हणे, " बारे वत्सा, भजन-जळ-मत्स्या न विसरें,
जनामध्यें कांहीं भयलय कदाही तुज नसो,
चिरंजीवी होईं, हृदयिं विष-बाधा तुज नसो ! " ३०

आनंदतनय.

---

## १७. अन्योक्ति.

### कोकिलान्योक्ति.

येथें समस्त बहिरे बसतात लोक,
कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक ?
हे मूर्ख, ज्यांस किमपीहि नसे विवेक,
रंगावरूनि तुजला गणतील काक. १
काका मौन धरूनि बैससि जरी या आम्रवृक्षावरी,
तूतें कोकिळ मानितील जन हे सारे स्वचित्तीं तरी;
होतो स्थानगुणें चि थोर बहुधा वस्तू; नृपाच्या शिरीं
पंका कोण न मानिती मानि असे कीं कस्तुरी ही खरी? २

या माळावरि वृक्ष एक हि नसे बाळा खुळ्या कोकिला,
येथें मंजुळ शब्द काढुनि गळा कां शोषिसी आपुला ?
जेथें बोल अमोल वाटति तुझे तो देश बा वेगळा,
तेथें आम्र फुलोनि गंध विखरे चोहींकडे आगळा! ४

वसंतसमयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो,
जयास अवलोकुनी सुरतरू हि चित्तीं थिजो,
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती,
परी पिकाचि एकला मधुर-वाणि लाधे कृती.

## चातकान्योक्ति.

नको घात्तुं, बा चातका, मेघ नाहीं,
धुराचा असे लोट हा, नीट पाहीं;
न या सेवितां तूज पाणी मिळेल,
तुझ्या मात्र डोळ्यांतुनी तें गळेल ! ५

ते अन्य मेघ, तव जे हरिती तृषेतें,
कां व्यर्थ आरडुनि शोषविशी जिभेतें ?
हे, चातका, घन रिते शिशिरांत येती,
जे गर्जती, परि न वारिकणाहि देती. ६

नवीं पद्में जेथें विकसुनि सुगंधा विखरती,
तळीं ऐशीं तोयें सतत भरलीं फार असती;
तरी पर्जन्याचे जलकणचि कां चातक पितो ?
गमे मातें, मानी शिर नमविण्या लाज धरितो ! ७

## मयूरान्योक्ति.

झाडें पेटुनि वाजती कडकडां, त्यांचा ध्वनी होतसे,

ज्वाला राहुनि राहुनी उठति या, विद्युल्लता ही नसे;
काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा,
वर्षाकाळ न हा, दवानल असे, मोरा पळें रे घरा ! ८

मयूरा तुला भूषवी हा पिसारा,
तुझा यामुळे जाण लौकीक सारा;
तया सांडतां हानि तूझी घडेल,
नृपाच्या किरीटावरी तो चढेल ! ९

## शुकान्योक्ति.

फळें मधुर खावया असति, नित्य मेवे तसे,
हिरेजडित सुंदरीं कनकपंजरीं ही वसे
अहर्निश, तथापि तो शुक मनांत दुःखें झुरे,
स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखातें स्मरे ! १०
बसुनि उपवनीं बा जोंवरी कावळा हा
करित कटकटानें लोककर्णास दाहा,
बस निमुट, शुका तूं, तोंवरी स्वस्थ कोठें;
कमिपण गुणवंता काय मौनांत मोठें ? ११

## बकान्योक्ति.

उभा राहे एके चरणि धरणीतें धरुनियां,
तपश्चर्या वाटे करित जणुं डोळे मिटुनियां;
बका, ऐशा ढोंगें तव अमति मासेच ठकती,
परि ज्ञाते तूझें कपट लवलाहीं उमजती ! १२

## सिंहान्योक्ति.

मी रोड एकटा मी, आणी मज पाठबळ नसे कांहीं,
ही शंका स्वप्नीं ही सिंहा ! तुझिया मनीं वसत नाहीं. १३

सांप्रत पुनः पुन्हां कां हे हत्ती मत्त गर्जती फार ?
गेला सिंह वनांतरिं वाटे, ज्याचा पराक्रम अपार. १४
मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरती सिंह पाही स्वभावें,
काका, त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरी मांसखंडास खावें.
जो उन्मत्तां गजांच्या खरतरनखरीं फोडुनी मस्तकांतें
घाला रक्ता पिऊनी, न च मृतपशुंच्या इच्छितो तो कणातें.१८
कृतीचीं आयाळें जडवुनि, गळा पुष्ट करुनी,
बसे श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी;
तरी जो ऐकोनी भिउनि पळती मत्त हि करी,
कसा त्या नादातें क्षणभरि हि तो पामर करी ! १६

पद्यरत्नावलि.

---

# भाग तिसरा.

## १. हिमालयावर बसून केलेलें ईश्वराचें प्रातःस्तवन.

### श्लोक.

बर्फानें असती पहा धवल जीं, मेघांस जीं भेदिती,
आरोहूनि तया शिरांवरि बसे हा शुक्र शुभ्रद्युती;
वाटे स्नेह असे, हिमालय! तुझा अत्यंत त्याच्यावरी,
आहे योग्य तुम्हां समानगुण जे त्यांचीच मैत्री खरी. १
तुझ्या तनुवरी जरी अमित ओघ हे नाचती,
उड्या बहुत मारिती, बहुत खेळती, हांसती,
तरी न सखया तुवां निज उदात्तता टाकिली,
कशी मुनिपरी, अहा! सतत शांतता सेविली! २
तुझ्या प्रतितटीं तरू विविध उंच गेले पहा!
प्रभातसमयीं नसे पवन, शांत अत्यंत हा
दिसे तरुसमूह हा जलनिधीपरी केवळ,
समीर नसतां जलामधि उचंबळेना जळ. ३
समीर गमतो मला परि वरी अहा धूमसा,
विभेदुनि तया कसा अचल वाढला उंचसा;
विचार करितां पुन्हां, न च विभेदिले, वाटतें;
सनातन तुझें खरें सहज धाम दे शांतितें. ४
अगा अचल-नायका! भय मनांत उत्पादिसी,
न भीति परि केवला, अमित शांतिही मानसीं;
न दृष्टि ढळवे जरी तुजवरूनि मोदाकरा!

तरी न मन हें तुला भजतसे, भजे ईश्वरा. ५
गमे सदय पावतां रव मनोहर स्वांतरीं,
तशी मम विकासते हृदयिं मूर्ति तूझी खरी;
प्रमोदभर मानसा विसरवी निजा चेतना,
न केंवि मग भावना त्रिजगदात्मरूपा मना ! ६
स्मरोनि विभुची कृपा नयन ढाळिती आंसवें,
मना ! तदुपकार तूं स्मरसि नित्य मोदोद्भवें;
प्रमोद उपकार रे मधुर शब्दसंघीं वदें,
करीं भजसवें प्रभुस्तवन सानुमंता मुदें ! ७
तमासह तुझें निशीं सतत युद्ध शैलाग्रणी !
सहाय तुज तारका विखरल्या नभःप्रांगणीं !
तुझें शिखर सेवितो, उदय पावला शुक्र हा,
प्रभातरविरंजवी तुज सुरम्यवर्णीं अहा ! ८
सखा अरुण वा तुझा तुजसि भेट देतो अर्धीं;
प्रकाशवृतसानुला तुज विलोकुनीयां सुधी
म्हणे,–" दिवस पातला; उठुनि नित्य कर्म करा. "
नियामक जनां खरा, नगवरा ! स्तवूं ईश्वरा. ९
अदृश्य रविच्या करां तव महाश्रयस्तंभ जे,
कुणीं खणुनियां धरा अचल रोविले ?-त्या भजें,
कुणीं विविधरंग हे -विनटतोसि ज्यांहीं-दिले ?
वदें तुज दिले कुणीं नद, तुडंबले जे जलें ? १०
वदाल नद हो तुम्ही ?-स्रवतसां प्रवृद्धें मदें
तमोमय दरींतुनी, जनन हें तुम्हां कोण दे ?
कशा कठिण कातळांवरुनि इंद्रवज्राहतां
प्रसन्नजलनिर्भरें सतत या उड्या मारितां ! ११
नसे खळ असा ध्वनी, धवलफेन भंगावली,

अखंड जल, वेग हा, अतुल शक्ति,-कोणीं दिली ?
" इथें जलतरंग हो ! स्थिर तुम्ही असा " हा कुणीं
निदेश दिधला तुम्हां ? अचल जाहलां त्या क्षणीं. १२
नगा ! तुजवरी किती हिममया नद्या सांचल्या !
मिळूनि नग जाहला अपर तो; नद्या गोठल्या.
तुझ्या शिखरिं आसरा नच तयां मिळाला भला,
म्हणूनि ढळला; परी प्रभुवचें मधें थांबला ! १३
प्रपात ! सरिता ! तुम्हां सतत शांति-देवी वरी;
निशाकरकरीं अहा रजतसानुसानापरी
तुम्हांस दिधला कुणीं धवलिमा ? तुम्हां भास्करें
वदा करण रंग दे !-कवण मोद पुष्पाकरें
वदा ! " प्रभु " जलौघ हे ! हिमशिली ! प्रभूतें स्मरा !
नद्या " प्रभु " वदा तुम्ही उपल हो ! स्मरा ईश्वरा !
प्रपात ! तव थोर हा रव, वदे प्रभूतें सदा;
भवन्मुख समीर हा, सरलवृक्ष ! ईशा वदा ! १५
अहो ! हिमनगोद्भवा कुसुमिता लतांनो स्मरा !
मुदें विचरतां तुम्ही गवय हो, स्मरा ईश्वरा !
स्मरा जलद हो तुम्ही प्रभुवरा मनापासुनी !
सहाय तुमची सखी कनकगौर सौदामिनी. १६
अगा अचल नायका ! प्रभुस पूजण्या साधनें
समीप असती तुझ्या, भज तया प्रसन्नें मनें !
पवित्र जल घेउनी सुरधुनीनदीपासुनी
करींच अभिषेक तूं अगरु-चंदना चर्चुनी ! १७
स्वयें हरिणनाभिनें प्रभुस कृष्ण लावीं टिळा;
सुगंधिसुममालिका ग्रथुनि घालि त्याच्या गळां;

प्रसन्न विभुसी करीं, अगरु-धूप तूं लावुनी;
करील मग आरती जलदभाज सौदामिनी ! १८

कुसुमांजली.—वि० ज्ञा० वि०.

---

## २. नीतिबोध.

### आर्या.

भज सन्मार्गातें तूं, देवज्ञांची करूं नको गर्हा;
स्वप्नींहि देवहेलन न करावें, रीति हे तुला अर्हा. १
बा ! कोप, लोभ, शठता, असदाग्रह, पिशुनता, कुटिल भाव,
उद्वेग, दंभ, यत्नें सोडीं, जोडीं महाजनीं भाव. २
हे न तुवां विसरावें, स्त्री, मृगया, द्यूत, पान यांत सदां
अत्यासक्ति नसावी, स्त्रीजित अविनीत जे तशांत कदा. ३
सुखसंपन्नीं मैत्री, नित्य दया दुःखितीं जनीं हि करीं,
संतोष पुण्यवंतीं, बा ! औदासीन्य, दुर्मती न धरीं. ४
अतिगर्व, अतिक्रोध, श्रम, निद्राहार, भाषण, क्रीडा,
हे षट् पदार्थ वर्जीं, होइल यांतें न वर्जितां पीडा. ५
विद्योत्साह, श्रद्धा, स्मृति, पुण्य, ख्याति, धैर्य हे आधीं
अनघा मन घालुनियां अतिपूर्वक षट्पदार्थ तूं साधीं. ६
सक्रोध हो अरिजनीं, स्वकलत्रीं हो सकाम तूं बापा;
सकृप सलोभ हि चित्तीं हो स्वजनांच्या हरावया तापा. ७
हो द्वेषी पाखंडीं, साधुजनीं हो सराग तूं बा मा;
दुर्मंत्रीं केवळ जड, पिशुनोक्तीं बधिर हो, महाभागा ! ८
नास्तिक, धूर्त, पतित, शठ, षंढ, कितव, चपल, खल, जड, क्रूर,
निजकल्याणाकरितां वत्सा ! सोडूनि यांसि दे दूर. ९

जननी, जनक, सती, स्त्री, गुरु, सज्जन यांचिया वचां, साधो!
विश्वासपदाहि धरीं, न अविश्वासें तुला व्यथा बाधो ! १०
सावध सदा असावें संसारीं, स्वहितकृत्य लक्षावें;
पुरुषार्थाचें साधन बा, धनसें हें शरीर रक्षावें. ११
निर्दोष जे तयांची चित्तांत कधीं धरूं नको शंका;
प्राणहि वेंचुनि रक्षीं वृद्धा, बाळा, सुदुर्बळा, रंका. १२
सोसिति अपकारातें, उपकारातें न साधु आठविती,
कीं सोसितां न सा विति होय वपु, न सोसितां न आठ विती ! १३
यत्नें कीर्तिच जोडीं, बा ! होय पदार्थ हाचि बहु धन्य !
राजे पंडित यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य. १४

मोरोपंत.

---

## ३ प्रातःकाल.

### श्लोक.

निस्तेज शुभ्रांशु दिसे प्रभातीं,
सुधीपुढें अज्ञ जसा विकांती;
प्रदीप शोभा-लव-हीन तैसे,
निष्कांचनाचे गुण तुच्छ जैसे. १

तारा होती विरल, समयीं लोक निःशौर्य जैसे,
जाई तेव्हां तिमिर पळुनी, देखतां चोर तैसे;
होई सारें नभ शुचि, असें साधुत्वत् कीं सुहंस,
जाई रात्रीं त्यजुनि मनुजां, श्री जशी आळशांस. २

सुकून जाती कुमुदें प्रभातीं,
संफुल्ल होती कमलें किती तीं !
चंद्रास्त-सूर्योदय या द्वयातें
करी पहा देवचरित्र हो तें ! ३

आर्या—प्रातःकालीं प्राची पिंगटरुचि सत्य गर्भिणी वाटे,
प्रसवे रविरत्नातें निषिद्धदर्शन म्हणून कीं मोठें !

दिंडी—सुटति योरांच्या जन्मकाळिं लोक ४
बंदिमध्यें असताति जे अनेक;–
कमलबंधापासूनि भृंग मुक्त,
भीरु सुटती प्रिय-बाहु-बंध-सक्त. ५

आकाशामधुनी पडो जलनिधीमाजी रवी वा बुडो,
जावो वा परलोकिं, शूर लढण्या ध्वांतासुराशीं भिडो;
देऊनी क्षितिभृच्छिरीं अहरहः पाद प्रकाशे च हा;
तेजस्वी न ढळे जरीहि विपदा येती तयां दुःसहा. ६

ते अद्रिराज शरणागत अंधकारा
कीं स्वोदरीं दरित रक्षिति देति थारा;
येतां रवी धरिति पाद शिरीं तयाचे,
तो त्यां करीं अभय दे, सुजनत्व साचें. ७

दिंड्या—वियोगानें रात्रिच्या खिन्न झाली
पद्मिनी तें पाहूनि अंशुमाळी;
पादपतनें सानंद करी तीस;
सत्य होती प्रिय नम्र मानिनीस! ८
नविन नलिनीसंगास लुब्ध होई,
अली कुमुदिनि सोडून शीघ्र जाई;
तद्वियोगासहमान फिरे मागें,
भ्रमे स्त्रीद्वययुत जेविं उभयरागें. ९
कुंद-चंदन मकरंद घेत येई,
जला वरुनी, स्वच्छंद, मोद देई;
मधुपवृंदा करि अंध सुगंधांहीं
वात ऐसा सुखकंद मंद वाही. १०

साकी—प्रात:कालचि उद्योगाला उत्तम हा गणिलाहे,
जिकडे तिकडे सुंदर शोभा, झुळु झुळु झुळूक वाहे! ११

षड्ऋतुवर्णन.

---

## ४. सेतुबंधावर उत्प्रेक्षा.

### आर्या.

शतयोजन आयत, दश-योजन विस्तीर्ण सेतु शंकेतें
दे, गेला बुडवाया कोपाकुल भूमि-बाहु लंकेतें. १
किंवा तो कपिकटको-त्तरसिंधूद्भत बुभुक्षु कालाऽही
दूर पसरला खाया रात्रिचरां क्षुद्र-बेडकांला ही. २
सेतु न तो, यत्पातिनें स्वसुता नेली, नशी वृकें एणी
त्या लंकेची श्री-भू-देवीनें ओढिली असे वेणी. ३
राम-जयश्री-लक्ष्मी लंका घाली सुनील पाटावें
सेना-वऱ्हाडिणींला पायघडी, कां असें न वाटावें ! ४
बहुधा तुच्छ जलधि-तृण चाटायाचा धरूनियां धीट
गेला प्रभु-प्रतापा-सित-पथ रक्षोटचीकडे नीट. ५
कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्याकडे रडत वाटे,
आली जी लंका-श्री तीचा तो साञ्जनाश्रुपथ वाटे! ६
कीं रचिले स्वापयशें शोकानळ-दग्ध-सागरोरचि तें !
सूचविले तर्क असे त्या सेतुवरें महा-सुधी-रचितें. ७

मोरोपंत.

---

## ५. उज्जयिनी, व तेथील महांकालेश्वर.

### साक्या.

पुढें अवंतीदेशीं जाउनि पाहें पुरी विशाला,
स्मरती जेथिल वृद्ध नागरिक उदयनभूपकथांला; १

सुकृतिजनांनीं भूवरि येतां उरलेल्या सुकृतानें,
स्वर्गभाग जणु आणिला खालीं त्या नगरीरूपानें; २
धुऱ्या सुगंधी करिती जेथें सुकवाया केसांतें,
धूर तयांचा गवाक्षमार्गें येउनि पोशिल तूतें; ३
उभारूनीयां थोर पिसारे प्रासादांवरि मोर,
हर्षें नाचावया लागतिल देखुनि तुला समोर; ४
तरुण सुंदरी फिरतां त्यांच्या रंगित जीं चरणांहीं
त्या सौधाग्रांवरी विसावा घ्यावा जलदा, कांहीं; ५
महाकाल जो त्रिभुवनपति, त्या वंदाया मग जावें,
प्रभुकंठाची प्रभा मानुनी गण तुज बघतिल भावें; ६
तया स्थळींचीं बालोद्यानें हलवी मारुत मंद,
विलसित पत्रां डोलवूनि जो हरी तयांचा गंध, ७
जेथें जवळचि गंधवतीचा प्रवाह सुंदर वाहे,
विलासिनींच्या स्नानें परिमल जयास बहु येताहे. ८
दुसऱ्या समयीं पोंचशील तरि, जों सूर्योदय होई,
तोंवरि थांबें, पुढें जावया न करीं कांहीं घाई. ९
प्रभात-पूजा-समयीं प्रभुच्या दुंदुभिकार्य करोनी,
मंद-गर्जना सफळ घडो तव शिव-सेवेलागोनी ! १०
चरणीं वाजति मंजुळ पैंजण ज्या करितां नृत्यातें,
करीं धरूनी चातुर्यें ज्या डोलविती चवऱ्यांतें; ११
नानापरिचीं रत्नभूषणें झळकति बहुत जयांचीं,
श्रमें होउनी लाल शोभती सुंदर वदनें साचीं. १२
त्या गणिकांवरि तेथें शीतल जलबिंदू तव कांहीं
पडतां त्या तुजकडे पहातिल हर्षभरित नयनांहीं. १३
उमलुनि कमलें निघति तयांतुनि भृंगसंघ कीं जैसे,
घना, तयांचे काळे चंचल कटाक्ष दिसतिल तैसे. १४

तांडव करितां शंभु तयाचे भुज निज पटलें व्यापी,
संघातेनें रक्त होय जें, मुळचें कृष्ण तथापी; १५
ऐसा सौम्योपायें येतां ओल्या गजचर्माची
शोभा पाहुनि, तुजवरि गिरिजा प्रसन्न होइल साची. १६

पद्यरत्नावलिः

---

## ६. भीष्म व परशुराम.

### आर्या.

येऊनि कुरुक्षेत्रीं राहे, सांगोनि पाठवी, राजा!
धांवोनि भेटलों मी, वेद-धनुर्वेद पाठ वीरा ज्या. १
मत्कृत पूजन घेउनि राम म्हणे, " रे सुरापगांगभवा,
भक्त्यार्पित बहु नाहीं, तरि काय असे दुराप गांग भवा. २
गरुडें सुधा तसी त्वां हे अंबा रण करूनि जरि हरिली
तरि हारिलीनमति-जनें संसृतिरुचि तेंवि केंवि परिहारिली ?" ३
वदलों, " सत्य भ्रात्या करितां हरिली बळें, पर ' स्वामी
वरिला शाल्व, ' म्हणे हे, घेऊं जाणुनि कसें परस्वा मी ?" ४
राम म्हणे, " शाल्व न घे, मानी हारि गज परें दिला न वरी,
त्वां जिंकिली यदर्थे त्वद्भ्राता तो करू इला नवरी. " ५
मीं वदलों, " जें दुष्कर, सुयशस्कर, सांग काज रामा, तें
होइल अकीर्ति देतां कां हा उपदेश काजरा मातें ! " ६
राम म्हणे, " त्वद्गुरु मी, माझे सुख-पुण्य-कीर्तिजनक वच,
गुरु वचनासचि म्हणती सर्व भले पुण्यकीर्तिजन कवच !" ७
मीं बोलिलों, " असें तो न घडेल कधीं, दयानदा, पावें.
गुरुनें ज्यासि अधर्मा-चरण न माने तया न दापावें ! " ८
राम म्हणे, " होय सुखी निजगुरुचें वचन शिष्यजन करिता
नातरि गुरुकुंभ-भव-क्षोभें छात्रामृतांशु जनक रिता.

मज गुरु पुढें ‘ असें तो न घडेल कधीं, ’ असें कसें वदसी?
असतां समर्थ अघटित-घटना-पटु मत्कुठार, हा सदसी! १०
खचशील कौरवा तूं, कीं बहु चढला तुझा मद सिगेला,
लंघावया पहासी, गांवाला कायरे मदसि गेला! ११
वधिले क्षितितलवर्ती क्षत्रिय म्यां एकवीसदा सारे,
माझा प्रताप गातां रुद्भ्रम दे कवीस दासा रे.” १२
ऐसें भलतेंचि वदे, वर्णावा मुख्य तो गुरु गुम्हेंनीं,
पाहे राम मजकडे जेंवि हरिकडे हरी गुरुगुरूनी! १३
वदलों, “धर्म-न्यायें हा देह तपोवनांत राबावा,
त्यजुनि दुरभिमान, धरूनि शांतिसि ताहाने जनांतरा बावा. १४
वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता हा भीष्म शांतनव समज!
देवांसि मागते ते झाले मरणीं करूनि नवस मज! १५
गेलें गुरुत्व तुमचें, कां हो म्हणतां वधीन अनघातें?
येइल पदरांत कसें यश धर्म-न्याय-निष्ठ-जन-घातें! १६
सच्छिष्याला विद्या गुरु झांकायासि काय हो शिकवी?
पांडित्य पहा माझें पाहोनि मला म्हणाल ‘होशि कवी.’” १७
हांसुनि राम म्हणे, “रे, हितकर गुरुवचन कां न आइकसी?
साहेल तुझी तुजिया दुःसह शोकानलासि आइ कसी? १८
भीष्मा, मज सिंह गणीं, वेड्या, तूं आपणासि कलभ गणीं!
न रविपुढें मिरवेसें चंद्राहि, कसें असेल बल भगणीं? १९
देसिल सत्यवतीतें शोक, बहुत रडविशील गंगेतें;
समज बरें, मददूषित जें जें तेज क्षणांत भंगे तें! २०
हो सिद्ध, ये हरीनें व्यसु आला तो करेणु केला हो,
हो गंगेला शोकद, तोखद हे तोक रेणुकेला हो. २१
सिंधूंत नग जसा कपि, तैसा पाहोनि गर्वनग रामीं
वंदुनि, ‘येतों’ ऐसें बोलुनि, आलों फिरोनि नगरा मी २२

आम्हां गुरुशिष्यांचा अत्यंताद्भुत पहावया समर,
आले बहु सुरराज-ब्रह्मर्षिसमेत सर्वेही अमर. २३
ठेवुनि चाप करींचें, उतरूनि रथावरूनि पद नमुनी
'मम जयमाशास्व !' असें प्रार्थियला कीर्ति-केलि-सदन मुनी २४
मज राम म्हणे, "न नमन करितां करिताचि हानि शापानें,
वंदावा गुरु हर्षद अमलद्विजराज हा निशापानें, २५
भीष्मा, मजला म्हणसी जरि 'जयमाशास्व मे-विभो राम,'
तरि संप्रति जैसा तूं जयकाम तसाचि हाहि जयकाम." २६
नमुनि रथीं बैसुनि मी वदलों, "गुरुजी न हार नत पाहो !
तुमच्या न ब्राह्मण्या न श्रुतिवृंदा प्रहार न तपा हो ! २७
स्वीकारिला तुम्हीं जो असमुचित-क्षत्रधर्म साधूनीं,
खंडीन त्यासि होइन सन्मत हें साधुकर्म साधूनी." २८
ऐसें तेवीस दिवस झाले युद्ध त्रिलोकमोहन हो,
म्हणतचि होतों देवा समयीं समरक्रतूंत मोह न हो ! २९

मोरोपंत.

---

## ७. रामशास्त्री यांनीं राघोबादादास सांगितलेलें प्रायश्चित्त.

### श्लोक.

" प्रत्यक्ष बंधुसुत राज्यपदार्थ मारी
ऐसा न अन्य जगतीवर देहधारी !
कैसे तुम्हीं विसरलां जगदेकराया,
राज्यीं न वास तुमच्या मन घे कराया ! १
जें शास्त्र आजवर ऐकविलें तुम्हां मीं.
तें सर्व आजि दिसतें मजला निकामी.

अंधास दीप, बधिराप्रति गान झालें !
ऐसें अकर्म करणें मज भाग आलें. २
माता कष्टविली वृथा ! निजपिता तैसा स्वसंरक्षणीं !
खाया काळ भुईस भार जगलां, पापा कराया घणी !
प्रायश्चित्त तुम्हां दिसे मरणही माझे मतें तोकडें !
येवो राग न आपणास, वदलों जें वाटलें रोकडें ! " ३

पुष्पवाटिका.

---

## ८. शर्मिष्ठा व देवयानी यांचें भांडण.

### आर्या.

शर्मिष्ठा कविजांवर नेसे झडकरि, कळों न वासव दे;
तों तीस देवयानी बोढुनि तत्परिहितात्मवास वदे. १
" असुरसुते, मच्छिष्या होउनि मद्वस्त्र नेससी कां गे ?
वहु मातलीस ऐसें मज समुदाचारलोप हा सांगे ! २
मर्यादा पाळावी, निज शिव गुरुचेंचि पाय, रीतीतें
सांडूं नये, म्हणति कवि साधुपदार्थींच पायरी तीतें. " ३
शर्मिष्ठा तीस म्हणे, " बैसावें जें सभेंत मत्तातें,
त्वत्तातें व्हावें तें बंदी, तूं विसरलीस मत्ता तें ! ४
सिंहासनीं विराजे मद्गुरु, न सहस्रकर हि, परि सविता;
बैसे खालें त्वद्गुरु कवि, कविता करुनि त्यासि परिसविता. ५
माझी न पाविजे त्वां, मत्ताताची तुझ्या न सरि तातें;
जें जन्हुकन्यकेचें भाग्य, न पावेल अल्पसरिता तें ! ६
तूं तों कन्या, जो स्तुति-कर याचक दान घे सदा त्याची;
मी कन्या स्तव्याची, भव्याची, सर्वसेव्यदात्याची ! ७
होती महेंद्रनयनें पाहुनि राजेश्वरा जया चकितें,
मत्तातभाग्य केंचें त्वत्ताता भिक्षुकासि, याचकि तें ! ८

मत्तातची जी श्री, कीर्ति, कवीला नयेचि भिक्षुकि ती;
अमृतरसासीं व्हाया सम माधुर्ये समर्थ इक्षु किती ? ९
राजसुतेचें यश जें तुज येइल काय गे दरिद्रे, तें ?
पाहसि विकावया तूं केशरमौल्यें कसें हरिद्रेतें ! " १०
निर्भर्त्सना करी बहु, संपादी द्वेष, पाप; गाढ कली
करुनि, कविजेसि कूपीं ती कोपाची महापगा ढकली. ११

मोरोपंत.

## ९. कोंकणप्रांत.

### श्लोक.

त्वत्तीरीं वसति करीति लोक जे या,
ते जाती उदर जगावरी भराया;
तूं रत्नाकर म्हणवीसि आपणातें
कां केलें मग धनहीन कोंकणातें ? १

तीरीं तमाल वट, पोफळि, ताड, माड,
होतात एकवट वाढुन उंच वाढ;
झाडी दिसे बहुत लांबचि लांब काळी
वाहे जणो तव तटीं दिनराजबाळी! २

विपुल सुंदर निर्मळ शीतळ
झुळझुळां बहु वाहतसे जळ,
फिरति पाट सपाट जमीनित
उपवनें उठती तटिं विस्तृत. ३

सरळ उंच नभांत उभारती
दिसति पोफळि नारळि या किती
फलभरें दिसतात सुशोभित
उचित ज्यापरि साधुमनोरथ. ४

अत्यंत सौख्यकर कोंकण रम्य देश
तेथील वेष नव, रीति तऱ्हा विशेष;
पाणी हवा विपुळ, सुंदर, जेथ पाहीं;
खायास अन्न च मिळे न परंतु कांहीं ! ५

समुद्र-

---

## १०. दुर्योधन स्वसैन्यास धीर देत आहे.

### आर्या.

" ऐका हो वीर तुम्ही, मी तुमच्या भुजबलाश्रयें शुद्ध
यश जोडाया कुंती-पुत्रांसीं मांडिलें महायुद्ध.
दिसतां विषण्ण सर्व द्रोणवधीं, मरति वीर युद्धांत,
फल जय कीं वध होणें हा निश्चय निश्चल प्रबुद्धांत. २
द्रोण-वधें रिपु मानिति जय, मानूं द्या न चित्र हें, तो ही
क्षणमात्रचि कीं, पावति न जयातें सर्वथा गुरुद्रोही. ३
युद्ध करील महात्मा कर्ण, पहा ही तुम्ही कुतूहल, तें !
विसरेल दुःख तुमचें मन जें द्रोण स्मरोनि हळहळतें ! ४
राम-प्रसाद-लब्धें दिव्यास्त्रें योजितांचि अंगेना
पाहों न शकेलचि पर-बल, करि-कुल हरि समक्ष भंगेना ! ५
युद्धीं सदाहि ज्या नर-सिंहाचा पार्थ-मृग धरि त्रास,
परिसा त्याच्या रिपुमद महिष-महा-शक्तिच्या चरितास. ६
मानुष युद्धेंचि गजा-युतबल खल भीम त्या अवस्थेला
जेणें सेनापति-गुरु असतां समरांगणीं क्षणीं नेला; ७
दिव्यास्त्रज्ञ घटोत्कच अति शूर क्रूर-भाव मायावी
जेणें वधिला वासव-शक्तीनें, तीस न क्षमा यावी. ८
त्या या कर्णाचें भुज बल खल-बल-जलधिमाजि देखाल,
मग संक्षुब्धौर्वानल-दर्शन झालें असेंचि लेखाल ! ९

करितां विक्रम कर्ण–द्रोणी दिसतील विष्णु-वासवसे,
यांच्या ठायीं चाप–श्रुति करुनि प्रकट वैभवास वसे. १०
भीष्मद्रोण-वध-जयें झाला मद पांडवांसि, तो यांचा
विक्रम करिल क्षीण, ग्रीष्म जसा लघु तडाग तोयांचा. ११
त्या कुंती–पुत्रांच्या अति-दक्ष तुम्हीं असा सखे दमना,
तुमच्या विजयि-भुजबळें न गुरु-व्यसनींहि मी सखेदमना". १२

मोरोपंत.

---

## ११. पतिनिमित्त शोक.

### श्लोक.

तंव नितंबिनि शोक करी,–" पती !
त्यजुनियां मज मुक्ति तुम्हांस ती
प्रिय कशी गमली असतीच ! हा
जिवलगा ! ममता सरली अहा ! १

तातानें मजला करीं तुमचिया आणोनियां घातलें
विश्वासें; करणें मशीं कपट हें कैसें बरें वाटलें ?
पाहूं आजि कुणा तुम्हाविण ? मला हें शून्यसें भासतें
सर्वस्वें जग ! कासयास नगणें आतां अभागीस तें ? २

भृंगावीण कशी तरी कमलिनी पाविल सौख्याप्रती ?
पद्माची उदकाशयाविण पुढें सांगा गती कोणती ?
जैशी निष्प्रभ यामिनी शशिविणें, पृथ्वी नरेंद्राविणें,
तेंवीं व्यर्थ पतीविणें पतिपरेलागीं जगीं वांचणें ! ३

प्रासादीं जरि एकही न वसतें, प्रासाद तो कासया ?
कासारीं जलबिंदु लब्ध न तरी, कोणी न मानी तया;
सेना व्यर्थ, तिला जरी पति नसे धैर्या रणीं द्यावया;
उद्यानीं सुफलें किमर्थ ? न जरी कोणी रुची घ्यावया ! ४

मजकडूनि नसे तिळ दोष हीं;
प्रिय अशी ललना त्यजण्यास ही
सवत मुक्ति कशी पडली गळां ? ”
पडत कामिनि बोलुनि विव्हळा ! ५
आणि उठोनि वदेच-“ पती ! पती ! ”
बहुत मोहभरें मग ते सती.
पति कुठेंहि दिसे न धरेवरी,
मृत अशी पडली मग सुंदरी ! ६

पार्वतीप्रकोप

---

## १२. भामाप्रकोप.

### श्लोक.

कृष्णासि कृष्ण-पद-भक्ति-विशारदानें
जें स्वर्ग-पुष्प दिधलें मुनि-नारदानें,
तें रुक्मिणीप्रति दिलें त्रिजगन्निवासें,
जें द्वारका करि भरोनि सुगंधि वासें. १
अशी गोष्ट दासीजनीं बायकांनीं
विचारूनियां, सांगतां जाय कानीं;
तईं सत्यभामा महा क्रोध दावी,
बुझावी हरी, तेंचि लीला वदावी. २
गडबडां धरणी वरि लोळते । वदवती न कवीसहि लोळ ते;
रडत, मूर्छित होय घडी घडी । पवन निश्चळ नेत्र न ऊघडी. ३
रडत रडत मूर्छेमाजि वृत्ती बुडाल्या,
परम विकल, मी तूं या स्मृतीही उडाल्या;
उचलुनि सखियांहीं मंचकीं दिव्य सेजे,
निजविलि, मृततुल्या सत्यभामा दिसे जे. ४

ये अशांत सदनांत हरी तो । जो अनादि भवशोक हरीतो,
किंकरी नमुनियां चरणातें । सांगती सकळ आचरणातें. ५

म्हणे, " शोक कां प्राप्त झाला महा हा,
अशी कष्टली कां शुभांगी, अहाहा !
न बोलेचि कां आम्हांशीं आज राणी,
जिच्या बोलण्याचीच आम्हां शिराणी ! ६

जयीं श्रीवत्सांक प्रभु करि निजांक स्थित शिरा,
शिरा, नाडी, प्राण प्रकटवि, न लावूनि उशिरा;
शिराणी शब्दांची पुरवि, तरि डोळे न उघडी,
घडी जो मानाची बिघडलि असे तोंवरि घडी. ७

वजागी ते जागी स्वमनिं, परि डोळे न उघडी,
घडी एक क्रोधीं मन बुडवि मानें अवघडी;
घडी पूर्व-प्रेमस्थितिस बसतां तीस विघडी,
घडी स्त्री जातीची घडविलि असे ख्याति सुघडी. ८

जयां देती लाड प्रियपति तयांचाच ठकळा
कळा कांति भ्रांती धरुनि अतिधीटाच सकळा,
कळावें या लोकीं म्हणुनि वदयी ते शशि-कळा,
कळा हे दावी कीं, थट थट वदे क्रोध विकळा. ९

वदे भामा कोपें, अतिविकल चावूनि अधरा,
" धरा—पृष्ठीं नाहीं ठक तुज असा, अंबुजधरा,
धरावें या अंकीं शिर अजि तिचें, पक्षिगमना,
मना आलें देणें कुसुम जिस तें, कंस-दमना ! " १०

जो नेत्र मोडुनि वदे, टकलूनि मांडी,
भ्रू-मंडळीं भ्रमण, अंगुलिभंग मांडी,
तों कृष्णजी करूनि हास्य म्हणे, " अहा हा !
वेडे, अनर्थ इतुक्यास्तव कां महा हा ? ११

अर्पितां मुनिवरें सुमनातें । वाटलें प्रथम हेंचि मनातें
कीं असा तरु पुणीत असावा । त्यांनिही स्वसदनींच वसावा १२
फूल देउनि तिला उतराई । होइं मी, समज हे चतुराई,
दृतसें तरुचि तो तुजला गे । खेद हा न करणें तुज लागे १३
तुतें वृक्ष देणेंचि यालागिं आधीं,
फुलें नाशिला जो तिला होय आधी,
न जाणोनि केले तुवां कष्ट भारी; "
समाधान ऐसें करी कैठभारी. १४
अशी ते बुझावूनि रंभोरु, हातें
तिच्या धूतसे हा मुखांभोरुहातें;
उटी लावुनी वाटल्या केशरा जी,
स्वहस्तांबुजीं विंचरी केशराजी ! १५
करि हरि यमुना हो मूद गंगावनाची,
मिरवि धवल पुष्पीं दीप्ति गंगावनाची;
सित-असित नद्यांच्या संगमीं श्रीत्रिवेणी,
तसिच यदुपतीनें घातली चित्र वेणी. १६

वामन.

---

## १३. भीमाचें दुर्योधनाशीं त्याच्या अंतकाळचें भाषण.

पांचाळ मुदित झाले, जैसे होतांचि वृत्रहानि सुर,
होय वृकोदर मारुनि कुरुपतितें, जेंवि वृत्रहा निसुर. १
दशमुखवधें कपिनिकर, कीं कंसवधें नृपा, जसा नंद,
साप्त-सुयोधन-हननें होय तसा धर्मराज सानंद ! २
पतितातें भीम म्हणे, " रे कुरुधमा कुबुद्धिच्या कंदा,
' गौर्गौः' म्हणोनि हांसत होतास सतीस तूंच कीं मंदा ! ३

दुःशासनासि सांगुनि करवित होतासि तूंचि कीं नग्ना,
कृष्णा-कपिला केली क्रूरा, त्वां कष्ट-कर्दमीं मग्ना ४
त्या कर्माचें घे फळ! " ऐसें गर्जोनि वामपादानें
शिर तुडकी ईश्वरसा दे भीम कृतानुरूप वा दानें, ५
" गौर्गौः म्हणोनि हांसत नाचत होते यथेष्ट जे दुष्ट,
आम्हीं तसेंच ' गौर्गौः ' म्हणतों हांसोनि नाचतों तुष्ट! ६
जिंकाया शत्रूतें विष-वन्हि-द्यूत-वंचना कांहीं
निज-बाहु-बळा-वांचुनि आम्हांसि उपाय ठाउका नाहीं. ७
वस्त्र सतीचें फेडित होते, छळुनी प्रभूत, पापिष्ट!
तीच्याचि तपें झाले हे देवा सर्व भूतप्रा पिष्ट! ८
कृष्णा, धर्मा, विजया, माद्रीसुत हो, समस्त परिसा रे!
' षंढतिल ' म्हणत होते ते म्यां वधिले रणांत अरि सारे! ९
जो गौर्गौः षंढतिला इत्याद्युपहास करुनियां हांसे,
तो हा दुर्जन, याच्या पडले कंठांत मृत्युचे फांसे! " १०
ऐसें गर्जुनि मस्तक मर्दी चरणें पुन्हाहि कोपानें,
तें साहिलें परोपरि पर-पादाक्रमण जेंवि सोपानें. ११
त्यासि अजातारि म्हणे, " केली बा त्वां खरी प्रतिज्ञा ती,
मूर्धाभिषिक्त-कीं हा, संपत शौर्यें हरिप्रति ज्ञाती. १२
झालासि निपट वश तूं कोपाला, उचित काय बापा हें!
लिंग पदच्युत भग्नहि लंघ्य नव्हे साधुनीतिला पाहें. १३
सद्ब्राह्मणाभिमंत्रित शत-तीर्थजलाभिषिक्त कीं शिर हें,
अर्घार्ह नव्हे काय ग्रहणीं रविमंडळ प्रभाविरहें! १४
सर्वजन म्हणति धार्मिक भीम, असें यश तुवां न बुडवावें
चरणें राजोत्तमशिर बहुमत शतपत्रसें न तुडवावें." १५
वदुनि असें गहिंवरला मक्षिवर लावूनि बोल भावास,
मग जाउनि जवळ म्हणे पतिता अति-तापद-प्रभावास. १६

" बापा, सुयोधना, तूं आतां कांहीं करूं नको शोक,
जो कर्म जसें करितो तैसें सुख-दुःख भोगितो लोक. १७
बा, बहु अपराध करूनि बुडवुनियां स्वपर बहु बुडालास,
समतांतुनि तूं तोया आंतूनि अलाबुसा उडालास. १८
रणमखहतासि तुज सुख देतिल आदित्य, रुद्र, वसु नाकीं;
मज दुःखचि राजाच्या करितील विलाप उद्धव सुना कीं ! १९
गुरु-बंधु सुत-स्वजनां-वांचुनि सुखभोग ते नरक सारे,
बा वर्तेल अधीरा शत-धिक्कृत मज असा नर कसा रे ! २०
त्या म्यां कशा पहाव्या झाल्या तुमच्या वधू अधीरा ज्या,
त्वां दुस्तरा मज पराभूति दिली हे सदा नवी, राजा ! " २१
यापरि विलाप बहुतचि करिता झाला नृपा, अजातारी,
समजावी मधु पासुनि जो देव करूनि कृपा अजा तारी. २२

मोरोपंत.

---

## १४. नीतिपर श्लोक.

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें,
धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें;
न जाणे न नेणे अशा पामराला
बुझावूं शकेना विधाता तयाला. १

बळानें काढूं ये मणि मकर-दाढेंत दडला,
महासिंधू-लाटा-तरण करूं येई भुजबळा,
महासर्पातें ही सुमसम धरूं ये निजशिरीं,
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी ! २

जधीं कांहीं कांहीं हरि, कवि, असे शब्द शिकलों,
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याच भरलों !

( ८९ )

जधीं कांहीं नेणें म्हणुनि वदले पंडित मला,
तदा माझा गर्वज्वर सकळहीं हा उतरला !
विपत्कालीं धैर्य, प्रभुपणि सहिष्णुत्व बरवें,
सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे,
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्याव्यसन जें,
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा, सत्पुरुष जे.

वानोत निंदोत सुनीतिमंत,
नसो असो वा कमला गृहांत;
हो मृत्यु आजीच, घडो युगांतीं,
सन्मार्ग टाकूनि भले न जाती !

ने का ज्ञानें लाधले सद्विचारा । संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा ?
पद्माचा जो तंतु तो वारणाला । वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला !

झाला क्षीण बहू क्षुधेस्तव जरी, कीं व्यापिला वार्धकें
आली कष्टदशा, घडो मरण ही, कीं तेज गेलें निकें,
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो खाईल कीं काय हा !
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तक, शुभग्रासींच ज्याला स्पृहा !
पेटीमाजि निरोधिला, न सुटका ज्याला, भुकेला फणी,
तों केलें बिल मूषकें अवचितां, तो आंत गेला क्षणीं.
त्यातें भक्षुनि सर्प, तत्कृत पथें निश्चित गेला पहा !
ऐसें कर्म अतर्क्य ! यास्तव तुम्ही कीं स्वस्थ चित्तें रहा.

आस्फालितांही स्वकरें न राहे,
चेंडू जसा तो उसळेच पाहें,
विपत्तियोगें पडले जरी कां,
तें स्थैर्य नोहे तरि साधुलोकां.
चेंडू पडे आणि उठे, तसाची
दृष्टांत हा सत्पुरुषास साची.

मृत्पिंड जो त्या उठणेंच नाहीं,
दृष्टांत हा केवळ दुर्जनां हीं. १०

जो तोषवी स्वजनकास, सुपुत्र तोच;
जें दे पतीस सुख फार, कलत्र तेंच;
जो एकरूप सुखदुःखपणीं, गडी तो;
हा लाभ पूर्वसुकृताविण कोंवि होतो? ११

संपत्काळीं कोंवळें सज्जनाचें
होतें चित्त ज्ञाति पंकेरुहाचें;
आपत्काळीं शैल हीं आदळो का
थाकेना जें, गाजवी धैर्यडंका! १२

विद्यासमन्वितहि दुष्ट परित्यजावा,
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा;
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं
तो सर्प काय न डसे खल अंतरंगीं? १३

योजी हिताप्रति निवारुनि पापकर्में,
वर्णी बरेच गुण झांकुनियां कुकर्में;
दे आपणास असतां, व्यसनीं त्यजीना
सन्मित्र-लक्षण असें वदताति जाणा. १४

तोयाचें परि नांवही न उरतें संतप्त-लोहांतरीं,
तें भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी!
तें स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें,
नाना उत्तम-मध्यमाधम-दशा संसर्गयोगें शिके. १५

पुष्पापरी दोंपरिचीच साची। हे वृत्ति, संभावित जे तयांची;
लोकांचिये एक शिरीं सजावें। वनींच कीं एक सुकोनि जावें।१६

भाग्याला सुजनत्व भूषण असे, कीं मौन शौर्यास तें,
ज्ञानाला शम, त्या शमास विनय, द्रव्यास दातृत्व तें;

अक्रोधत्व तपा, क्षमा प्रभुपणा, धर्मास निर्दंभता,
या सर्वांस हि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्वतां. १७
खरें वचन बोलवी, जडपणास कीं मालवी,
महोन्नतिस डोलवी, दुरित मारुनी चालवी;
मनीं सुख अमोलवी, यश जगत्रयीं कालवी,
अनेक गुण पालवी सुजनसंग तो भूलवी. १८
वांछा सज्जनसंगमीं, गुरुकुलीं वंदारुता, नम्रता.
निंदेचें भय, तुष्टता परगुणीं, स्वस्त्रीसुखीं लुब्धता;
विद्याभ्यास, महेशभक्ति, खलसंसर्गीं अनासक्तता,
चित्ताचा जय, या गुणांस निधि जे त्यां वंदिजे तत्वतां. १९
खोटें बरें कार्य असो, तयाचा । विचारिजे कीं परिणाम साचा;
कर्तव्य कीं जें विबुधें विवेकें, । तें अन्यथा शल्य घडे विपाकें. २०
अब्धीमाजि बुडो, प्रयत्न करूनि हेमाद्रिशृंगीं चढो,
शत्रूतें रगडो रणीं, क्रयकृषिव्यापारकर्मीं भिडो,
विद्या सर्व पढो, कडे विकडिच्या व्योमास लंघो, उडो,
जें होणार चुकेंचि ना विधिबळें, बेटा रडो ना रडो ! २१
मरावें कीं होतें सुरपतिस देऊनि झगडा,
प्रहारें वज्राच्या करुनि धरणीं इंगळसडा;
पित्यातें संग्रामीं त्यजुनि भय निःशंक भिडणें;
नव्हे त्या मैनाका उचित जलधीमाजि दडणें. २५
कर्मानुसार घडते मति सर्व लोकां,
कर्मा अधीन फल, येथ नसेच शंका;
हें सत्य यद्यपि तरी असतां विवेकें
होणार हो मग सुखें, निजकर्मपाकें. २३
वनचरांसह शैलवनांतरें, निजसुखें फिरणें तरि तें बरें;
परि घडे सहवासचि पामरीं, तरि जळो असणें सुरमंदिरीं ! २४

श्रुतेंचि कीं श्रोत्र, न कुंडलानें, दानेंचि कीं पाणि, न कंकणानें
साजे तसा देहहि हा, न स्नानें, परोपकारेंचि, न चंदनानें. २५

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना
दावी धन्याम, जठरार्थ कसें पहाना ?
दे आळवूनि जरि हस्तिप, बाप ! भाई !
घेतोचि घांस गजराज, कशी बढाई ! २६

प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा,
नृपा तूं करीं फार सांभाळ याचा;
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें
अभीष्टार्थ देईल हे भूमि वेगें. २७

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें,
तो क्षीण ही विधु महोन्नति घे क्रमानें;
जाणोनि हें सुजन, ज्या दुबळीक आली,
त्याशीं कदा न करिती सहसा टवाळी. २८

बरें तें या देहीं माहिवरि कडेलोट करणें,
महासर्पाच्या कीं वदनीं तरि हा हात धरणें;
उडी कीं वन्हींत त्वरित जरि घालूनि मरणें,
जळो तें कीं लोकीं त्यजुनि निज सच्छील फिरणें ! २९

विद्या हें पुरुषास रूप बरवें, कीं झांकलें द्रव्य ही,
विद्या भोग-सुकीर्ति-दायक पहा, ते मान्य मान्यास ही;
विद्या बंधु असे विदेशगमनीं, विद्या महादेवता,
विद्या पूज्य नृपास, हा नर पशु तो वेगळा तत्वतां ! ३०

उपजणें मरणें न चुके नरा,
फिरत नित्य असे भवभोंवरा;
उपजला तरि तोच भला गमे,
कुल समुन्नति ज्यास्तव घे, रमे ! ३१

वृक्ष फार लवती फलभारें । लोंबती जलद घेउनि वारें;
थोर गर्व न धरी विभवाचा। हा स्वभाव उपकारपराचा, ३२
जें पात्र कां पुरुषरत्न महागुणांचें,
तें निर्मितो विधि विभूषण भूमिकेचें;
कीं त्यास ही त्वरित मृत्युमुखांत लोटी,
त्याची गमे मज अपंडितता करंटी! ३३

वामन.

## १५. हंस व नळराजा.

### श्लोक.

त्यांतील एक कलहंस तटीं निजेला,
जो भागला जल-विहार विशेष केला,
पोटींच एक पद, लांबविला दुजा तो,
पक्षीं तनू लपवि, भूप तया पहातो. १
टाकी उपानह, पदें अति-मंद ठेवी,
केली विजार वरि हौराहि, मौन सेवी,
हस्तीं करी वलय उंच, अशा उपायीं
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं. २
कलकल कलहंसें फार केला सुटाया,
फडफड निज-पक्षीं दाविलें कीं उडाया;
नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू,
धरि सुदृढ जया तो काय सोडील पंचू! ३
तदितर खग भेणें वेगळाले पळाले,
उपवन-जल-केली ते करायास मिळाले;
स्व-जन गवसला जो त्याजपाशीं नसे तो,
कठिण समय येतां कोण कामास येतो? ४

दिंडी.

न सोडी हा मठ भूमिपाळ मातें
असें जाणोनी हंस वदे त्यातें,
" हंस-हिंसा नच घडो तुझ्या हातें
सोड राया, जाईन स्व-स्थळातें. ५
जागजागीं आहेत वीरकोटी,
भले झुंजाराहि, शक्ति जयां मोठी,
तयां माराया धैर्य धरीं पोटीं,
पाखरूं हें मारणें बुद्धि खोटी. ६
वधुनि माझी हे कनक-रूप काया
कटक-मुकुटादिक भूषणें कराया
कशी आशा उपजली तुला, राया !
काय नाहीं तूजला दया माया ? ७

श्लोक. म्हातारी, उडतां नयेचि तिजला, माता मदीया अशी,
कांता काय वदों नव-प्रसव ते सातां दिसांची तशी;
प्राता त्या उभयांस मी, मज विधी घातास योजीतसे
हातामाजि नृपा ! तुझ्या गवसलों आतां करावें कसें ! ८

दिंडी. सखे माझे परतोनि घरा जातां,
तुवां सजणे हा समाचार घेतां,
तया शोकें घायाळ हृदय होतां
कशी होशिल ! तें आठवितों आतां ! ९
थोर होतिल बाळकें तुझीं बाळे !
तुला कामा येतील केव्हांळे,
माय माझी बैसेल शोक-शाळे,
मला आठवितां हृदय तिचें पोळे ! १०

श्लोक. सदय हृदय यांचें, भूप हा ताप-हारी.

म्हणुनि परिसतां मी होय एथें विहारी;
मजहि वध कराया पातकी पातला जो,
वरुनि पति असाही भूमि कैसी न लाजो, ११
येणेंपरी परिसतां अति-दीन वाचा,
हेलावला नळ, पयोधि दया रसाचा,
सोडी, म्हणे विहर जा अथवा फिराया,
राहें यथा-निज-मनोरथ, हंसराया ! १२
सुटुनि खग पळाला, बैसला शाल-शाखे,
क्षणभरि निजदेहीं मुक्तिविश्रांति चाखे;
स्वजन तंव तयाचे भोंवताले मिळाले,
कवळिति निज-बंधू, बाष्प-बिंदू गळाले ! १३

रघुनाथपंडित.

---

## १६. मोरोपंताची केकावली.

### श्लोक.

सुस्या बहुत शोधिले अघनिधी पदांच्या रजें,
न तें अनृत वर्णिती बुध जनीं सदाचार जें;
असें सतत ऐकतें सतत बोलतें मीच ते
प्रमाण न म्हणों जरी, उचित माझिया नीचते. १
तसाचि उरलों कसा ? पतित मी नसें काय ? कीं
कृपाचि सरली, असें हि न घडे जगन्नायकीं !
नसेन दिसलों कसा, नयन सर्वसाक्षी रवी;
विषाद धरिला म्हणों, न सुरभी विष क्षीर वी ! २
सदैव नमितां जरी पद ललाट केलें किणें,
नसे इतर तारिता मज भवत्पदाब्जाविणें;

नता करुनि मुक्तही म्हणसि मी बुडालों रिणें,
अशा तुज न जो भजे मनुज, धिक् तयाचें जिणें ! ३
धना परिजना घरीं तुमचिया उणें कायसें ?
न लाभ, मणिहेमभूपतिस जोडल्या आयसें !
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती,
गुणा, न म्हणतां उणाअधिक आदरें सेविती. ४
अतर्क्य महिमा तुझा , गुणहि फार, बा, हे विधी!
श्रुतिज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केंवि धी ?
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती,
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ५
गमो मधुर हें विषस्तवन, सेवितां माजवी,
करी मलिन सद्यशोमुख, हलाहला लाजवी;
हरापरिस तूं बरा प्रभुवरा, सदा जो पिशा,
असा रस समर्पि त्या अमृत आपुलें ओपिशी ! ६
प्रभो शरण आलियावरि नव्हां कधीं वांकडे,
म्हणोनि इतुकेंच हें स्वहितकृत्य जीवांकडे;
प्रसाद करितां नसे पळ विलंब, बापा खरें.
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें. ७
म्हणा मज उतावळा, गुणचि घेतला, घाबरें
असो मन असेंचि, बा भजक-बर्हि-मेघा, बरें;
दिसे क्षणिक सर्व हें, भरंवसा घडीचा कसें
धरील मन, आधिनें बहु परिभ्रमे चाकसें ! ८
कृतांत-कटकामल-ध्वज जरा दिसों लागली,
पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली;
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा,
न हो जरि उतावळा, खरिपु कापितो हा गळा. ९

न जें प्रिय सदोष तें; प्रिय सदोष ही, चांगलें;
स्वतोक पितरां रुचे जरि हि कर्दमीं रांगलें;
तुलाचि धरि पोटिशीं कशि तदा यशोदा बरें ?
जरी मळविशी रजोमलिनकाय तूं अंबरें. १०

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो,
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रि–कमळीं दडो, मुरडितां हटानें अडो,
वियोग घडतां रडो मन, भवच्चरित्रीं जडो. ११

न निश्चय कधीं ढळो, कुजन–विघ्न-बाधा टळो,
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्त-मार्गीं वळो;
स्वतत्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो,
पुन्हा न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो. १२

दयामृतघना, अहो हरि, वळा मयूराकडे,
रडे शिशु तयास घे कळवळोनि माता कडे;
असा अतिथि धार्मिकस्तुतपदा कदा सांपडे ?
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासां पडे. १३

मोरोपंत.

---

## १७. शरदागमन.

### श्लोक.

उदित होय घटोद्भव अंबरीं,
विकसलीं नलिनेंहि सरोवरीं;
जळहि गोड सुनिर्मळ जाहलें,
विमलता शशिमंडल पावलें. १

जलदपंक नभांतिल धूतला,
वरि रुची सरपोसचि घातला;

बसुनियां द्विजराज त्यावरी,
मृदुकरें जन-ताप पहा हरी ! २

धरुनि मौक्तिकहार विशारद,
धवल पातळ नेसुनि शारद,
स्मित-मुखी मुदिता बहु यामिनी,
स्वपतितें रमवी, जशि कामिनी ! ३

जलधिफेनचि चंदन घांसितो,
निजकरें शशि घेउनि लेपितो;
म्हणुनि दिग्वनितामुख पावलें
टवटवी, अनुरक्तहि जाहलें. ४

आली आश्विन शुद्धपक्ष-दशमी, विख्यात मोठा सण
नामें हा दसरा, समस्त करिती देवीस पूजार्पण;
पक्कान्नें विविधें करोनि जन हे, संभोजना ब्राम्हणा
देवोनी नवरात्र पूर्ण करिती, होई महापारणा. ५

कोणी एक सफेत लोक करिती पोशाक, कांहीं जन
घेवोनी हिरवाच, एक पिवळा लेती मनोरंजन;
अस्मानी किति एक ही, भरजरी शाली दुपट्टे महा !
भूमी चित्रपटासमान नयनानंदप्रदा, ही पहा ! ६

घेवोनियां पटुकरें उडवीत खांदा,
आला तयांत भट जेंवि फुलांत कांदा;
' अश्मंतपूजन करा, जय हो तुम्हांला,
द्या दक्षणा, ' म्हणतसे ' जनहो आम्हांला ! ' ७

दीपावळी सण समस्त सणांत आहे
मातांचि, सर्व-जनसौख्यद होय पाहें;
अभ्यंग घालुनि घडोघडि मिष्ट मिष्ट
देऊनि भक्ष, नवभूषण देइ इष्ट. ८

पहांटे उठोनी, दिवे जागजागीं
स्वरें लाउनी रम्यभूषा कृशांगी
समस्तांसि अभ्यंग ह्या घालिताती,
जणों मूर्त लक्ष्मीचि या शोभताती ! ९
हळुहळू शरदुद्भव निर्मळ
प्रियहि होय, जलाशयिंचें जळ;
करुनि सज्जनसंगतितें जसें,
कुजनचित्त सुनिर्मल होतसे. १०
लोकांस ताप शरदर्क बहूत देतो,
तो पूर्ण-चंद्र उगवूनि लयास नेतो;
पावूनि उग्रनृपताप समस्त लोक
शांति सुभूपतिवरी करिती, विलोक ! ११

ऋतुवर्णन.

---

## १८. यमधर्म व सावित्री.

### आर्या.

धर्म म्हणे, “ साध्वि बहु श्रमलीस, स्वाश्रमासि जा मागें,
जो मागशील तो वर देतों, घे, इष्ट जें मला मागें. ” १
“ देवा, व्हावे चक्षुस्तेजस्संपन्न आश्रमामाजी
मामाजी ऐसें द्या, मति साहेनाचि त्या श्रमा माजी. २
धर्म म्हणे “ दिधलें ’ परि जातचि होती तशीच मागूनी,
देव म्हणे पुनरपि “ जा वत्से, घे वर दुजाहि मागुनी. ” ३
ती सुमति म्हणे “ राज्य-भ्रंशें बहु खिन्न सासुरा होतो,
पावुनि भवत्प्रसादें निज-पद, बहुकाळ सास राहो तो. ” ४
“ होइल जा ” धर्म म्हणे, परि करि अनुगमन सबहुमान सती,
कीं जी हंसी हंसावांचुनि मानील न बहु मानस ती ! ५

धर्म म्हणे, " गे बाई करिसी कां व्यर्थ या श्रमास ! तिजा
वर घे, नकोचि मागों, आलीस सुदूर, आश्रमा सति जा. " ६
त्यासि म्हणे सावित्री, " संपन्न असो पिता सु-तनय-शतें. "
हा लक्ष्मीसुत कवि किति लिहिल सतीचें, उमासुत न यश तें! ७
ऐसें शिरोनि चित्तीं घेउनि भारी हि तीन वर देवा
सोडीना सोडविल्यावांचुनियां ती सती नवरदेवा. ८
देव म्हणे, " तूं स्वच्छा स्वच्छायाशीच मागती सति घे,
वर घेउनि जा चवथा देतों मागोनि मागतीस तिघे. " ९
नमुनि म्हणे ती वरदा, " तुजला अति भार न चवथा, न पित्या,
स्वरगा आधि, सुरभिचें भागे द्यायाशि न चव थान पित्या; १०
व्हा सुप्रसन्न, ' वत्से तुज हो सुतशत ' असें वदा, न्या हो
सुयशोराशि स्वर्गीं, लज्जाप्रद सुरनगा वदान्या हो ! " ११
भुलला धर्म द्युतिला, धृतिला, मतिला तिच्या, तया स्तुतिला,
न करुनि विचार जावी मागें म्हणवुनि म्हणे " तथास्तु " तिला! १२
हळुचि म्हणे सावित्री, " पावेन वरें करूनि संततिला,
तुमच्या प्रसाद म्हणुनी प्रेमें गातील सर्व संत तिला. १३
तरि सत्पति मज द्या कीं, तुमची पावेल मान सत्या गी,
यश रक्षाया प्राणाहि सत्य-गुणासक्त-मानस त्यागी. " १४
रोमांचित धर्म म्हणे, " बाई गातिल तुझा प्रभाव सती,
पतिशीं अविनाभावें वसशिल, रविशीं जशी प्रभा वसती. " १५

---

## १९. प्रद्युम्नाख्यान.

### श्लोक.

पूर्वी रुद्र-ललाट लोचन शिखि ज्वाळामुखीं जो जळे,
तो हा रुक्मिण्युदरासि ये रतिपती, हें शंबराला कळे;

कीं स्वप्राणहर स्मर प्रकटला, जों अप्रगल्भ स्वयें
तों मारीन म्हणे, उपेक्षित रिपू देतो अनल्पें भयें. १
ऐसें चिंतुनि, कामरूप खळ तो पावे पळें द्वारका.
प्रासादांत शिरे, हरी हरिचिया मायाबळें दारका;
ने व्योमीं सहसा अभिर्दश शिशू प्राणक्षया दांडगा,
जैसा कीं मृगशावकास पळवी भक्षावया लांडगा. २
काम, श्रीहरिजात बाळ, वधवे कैसें सपत्नाकरीं !
टाकी झांकुनि नेत्र निर्दय बळें तें रत्न रत्नाकरीं;
तों मीनें नवनीत-पिंड मृदुल प्रेक्षूनियां भक्षिला,
जाणो रम्यकरंडकींच सुमणी रत्नाकरें रक्षिला ! ३
दुष्टें नेउनि पुत्र शोक दिधला श्रीरुक्मिणीच्या मनां,
झाला खेद महोत्सवांत सहसा त्या द्वारकेच्या जनां.
जो देतो बहुतांसि दुःख कुमति स्वार्थार्थ तो नाडिला,
कामाद्युग्ररिपुत्रयींचे नरकीं बांधोनियां पाडिला. ४
भक्षावा जळजंतुंनीं म्हणउनी टाकूनि तो अंबुधी-
मध्यें बाळक, शंबर स्वसदना निश्चित गेला कुधी;
जो निःशेष न नाहला जरि हर-क्रोधानलें जाळिला,
केला अंबुधिमग्न, दुर्मति म्हणे मृत्यु स्वयें टाळिला ! ५
पसरुनी गुरुजाळक धीवरीं
धरियले बहु मीन नदीवरीं;
यदुदरीं शिशु, तो झष सांपडे,
विधिबळें व्यसनीं सहसा पडे. ६
दशशीहीं बहु पीन-मीन-निकरीं जो देखिला तो बरा,
भावें भेटविला तयाचि असुरा राष्ट्राधिपा शंबरा;
तेणें सूदकरीं दिला, मग तिहीं पाकस्थळीं कापिला,
पोटीं बाळ करंडकांतुनि निघे जैसा मणि स्थापिला. ७

होती तेथ पतिव्रता रति पति-प्राप्त्यर्थ रम्याकृती,
आच्छादूनि महानसीं करि तदादेशींचि पाकाप्रती,
मानी पाचकमंडळी स्वगुरुता देऊनि सारी तिला,
कीं तो शंबर मानवे बहु तिच्या पाकाचिया रीतिला. ८

परम कोमल रम्य शरीर तीं
झिजवि, दुर्जनदास्य करी रतीं;
प्रियपदींच सती धरि भाव, कीं
उचित मृत्यु तदर्थहि पावकीं ! ९

जैसें रूप, तसेंचि नाम दुसरें मायावती हें धरी,
शत्रूच्या सदनीं न पाक, तप ती पत्याप्तिसाठीं करी;
सूदांहीं शिशु पोषणार्थ दिधला प्रार्थूनि तीकारणें,
त्याचें रूप विलोकितांचि घडलें तल्लोचना पारणें. १०

मायावतीस शिशु अर्पिति सूपकार,
सांगोनि तत्व करि नारद सूपकार;
होतां अकल्पितचि तो पति-लाभ, जाया
पोषी सुखासह तया पतिला भजाया. ११

रक्षी ज्यासि पतिव्रता प्रियतमा मायावती मायसी,
शंभूची अभयोक्तिही, मग तया चिंता असे कायसी !
संसाराब्धि-निमग्न जे जन तयां ज्याचीं पदें पारदें
योगींद्रें अवलोकिलें हि करुणालीलालयें नारदें.

महामाया माया रतिपतिस दे जी न उरवी
अनेका मायांतें, निबिड तिमिरा ज्या परि रवी;
गदा ही दे, मायाशत-निपुण-शत्रु-प्रमथन-
क्रिया-सिद्धयुत्साहा उपजवि, करी युक्तिकथन. १३
उठे काम क्रोधेंकरुनि कलितोद्दामगद या
रिपूतें माराया कलह करि, कैंची मग दया ?

सभेमध्यें होता असुरपति, त्याच्याचि जवळी
बसे, बोले कार्ष्णि श्रवणकटु, दुष्टास खवळी. १४
स्वाधिक्षेप- विवृद्ध- मन्यु खळ तो दंडाहत-व्याळसा,
धांवे, शीघ्र गदा तदा धरि न जी ही सोत्सवीं साळसा;
कोपानें करि अस्त्र शस्त्र कपटें वेचूनियां युद्ध तें
तैसें जें हरिबाळकोन्मुख बळें येणें गजें उद्धतें. १५
भृंगाची पंक्ति मौर्वी, कुसुममय धनू, बाण तेहि प्रसूनें,
लीलेनें दास केले असुर, सुर, नर प्रौढही ब्रह्म-सूनें;
तोचि प्रद्युम्न साक्षादजितसुत, युवा, ज्या रणीं शस्त्रपाणी
बाहेपाहे तदासीं तिळसहित तया सोडिजे कां न पाणी ! १६
काळव्याळ-विषाग्निचीच धरिली जाणों करीं जीभ, या
माराया तरवारि वारिदनिभा, देवाहि दे जी भया,
शत्रूचें सकिरीट- कुंडल शिर च्छेदी क्षणें, होय ज्या
कांहीं न श्रम, कोमळेंहि खुडितां जैसें नखें तोयजा ! १७
जे होते उत्सवा त्या निरखित अमर व्यापुनी अंबरा रे,
" दुष्टा जा दुर्गतीतें " म्हणति, " निजपुरा जा प्रभो, शंबरारे !
प्रद्युम्ना, तूं स्मर, स्त्री रति, बहु दिवसां युक्त जालां, बरा हो,
हा योग स्वात्ममूर्तोत्सवचि न घटिका यावरी लांब राहो ! " १८
गेले ते पुष्पवृष्टि-स्तुति करुनि मुखें, शंबरांतोत्सवासी
पाहोनि, प्रेक्षणीयाकृति रतिपतिसि स्त्रीसख स्वर्गवासी,
नेला मायावतीनें मग गगनपथें मन्मथ द्वारकेला,
विद्युन्मेघभ्रमेंचि क्षणभरि कुतुकी तो सुहृद्वार केला ! १९
व्योमापासुनि जेधवां उतरला अंतःपुरीं, देखिला
दारांनीं प्रभुच्या, क्षण स्वहृदयीं तो श्रीहरी लेखिला !
शोभा, आकृति, वर्ण वेष, सकळ भ्रांतिप्रद स्त्री सती
लज्जेनें लपती, मग प्रतिनिधिलें तींच त्यां दीसती ! २०

पतिप्रतिनिधिप्रतिं प्रभुवरस्त्रिया पाहतीं,
तयाचि भक्त्या तुम्ह्या परमकौतुकें राहती;
परस्पर असें तदा वदाति कीं कसें यास ये
मुकुंदनिजरूप हें, हरिस जाणवूं या सये! २१

मोरोपंत.

## २०. अर्जुन अभिमन्यूकरितां शोक करितो.

### आर्या.

मृदुलप्रकृति न साहे सुतशोका, जेंवि न रविला पाला,
शिबिरीं करी परोपरि नारायणमित्र नर विलापाला. १
" मज आडवा न आला तरि या पांचांत पृथुनय नसावा,
कीं नीरजनाभाचा भाचा, सुगुणाब्धि, पृथुनयनं सावा. २
बोले कृष्ण-मुखींचा वेणु तसा परम लाडिका-वाणी,
जो स्पर्शे शिशुहि न घे गुरुसन्निध पर, मला डिकावाणी. ३
जो बहु पर-पृतनांसीं गोपींसीं बालकृष्णसा रमला,
दावा हो सत्वर तो स्वगुरुवचनगीतकृष्णसार मला! ४
बालहि जो खड्ग-परशु-चक्र-गदा-चाप-तोमरां वाहे,
संकल्प दुर्जनांचे झाले कीं सफल, तो मरावा हे! ५
ज्याचा शास्त्रीं शस्त्रीं व्यवहारीं वासुदेववत्समज,
काय तुम्ही केलें हो, आणुनि तो भेटवाचि वत्स मज. ६
बहुधा तुम्हीं धरुनि गुरु-कृत-चक्रव्यूह-भेद-कामातें,
केलाचि पुढें, न हीं-तरि करिता स्पर्शी खेद कां मातें? ७
न तुम्ही, न कौरवहि, मी तद्घातक, कीं तया रिघायाचा,
कथिला उपाय चपला आधीं, त्यां न कथिला निघायाचा! ८
तुमच्या भुजशस्त्रांतें धिक्! हा निःसार हो खटाटोप!
शिर ज्या न रक्षि तो काचा कीं ओखटा टोप? ९

हर हर! जागीं चुरिला तो बाळकरेणुनीं चरणपाणि !
शिव शिव! भरतिल कीं हो तो बाळक रेणुनींच रणपातें! १०
कुंतीस काय सांगूं ? कृष्णेला दाखवूं कसें वदन ?
दुष्कर मला सुभद्रा-सांत्वन, दुर्दर्श उत्तरासदन ! ११
बाऊं दिला मजविना परलोका काय एकला भाचा ?
होता उपाय हातीं सुयशाच्या हाहि एक लाभाचा. १२
समयीं कोठें गेल्या, बा, तुज सोडूनि गुरुजनवराशी ?
वाहेल आधिच्या किति ती मृदुलप्रकृति नित्य नव राशी ! १३
स्वार्थपर, अकृप, निस्त्रप, आम्ही, म्हणवुनि मनांत विटशील;
परि उत्तरा सती पर-गतिकामा तुज म्हणेल विटशील ! १४
कां माझें उर न उले, कवि पवि कीं म्हणति तोक-शोकाला;
लोकां लाजे मन कीं जावें यश हारवूनि ओकाला! १५
न तुतें पार्थ, कदाचित् कृपण हि वांचेल सोडुनि धनातें !
चुकविल न चकोराच्या विधुवांचुनि सर्व-सोडु निधनातें ! १६
हा वत्सा, रक्ताक्षा ! झाले त्वत्सुगुण आजि घातकसे !
बा, वाहिले परांचे तुजला हाणावयासि हात कसे ? १७
अभिमुख परप्रहारें पडला कीं, धर्मराज, सांगावें;
प्रभुजी न जें यशस्कर, तें स्वगुरुसमक्ष तोक कां गावें ? १८
संरक्षिलें न असतां शस्त्र नयन बाहुही विपुल याला,
निष्फल भार वहातां कां? सोडा जो नव्हे रिपुलयाला ! १९

मोरोपंत.

## २१. हिमालय पर्वतांतराल सृष्टिशोभा.

### श्लोक.

जेथें प्रकाशित जटेंतुनि शंकराच्या
ही येतसे प्रथम दृष्टिपथा जनांच्या;

तेथें घडीभर बसून समग्र सृष्टि—
सौंदर्य भोंवतिल देउनि सूक्ष्मदृष्टि १
जातां बघूं, मग किती तरि जागजागीं
चोहींकडील सुमनोहर भूविभागीं
शोभा दिसे. विविध रम्य किती पदार्थ
देऊन दर्शन तिला करिती कृतार्थ ! २
जैसें वसंत समयीं मधुमक्षिकेला
चोहींकडून फुलल्या सुमवाटिकेला
दैवें प्रवेश मिळतां, तिजला अपार
होतो प्रमोद, मनि उत्सुकताहि फार; ३
तैसेंचि मन्मनहि या बघतां नगातें,
आनंद-सिंधु-लहरींत बुडून जातें;
जो या स्थळीं रुचिर वस्तुसमूह थाट
तो पाहण्यास मज कौतुक फार वाटे ! ४
त्यानंतरें मग जशी मधुमक्षिका ते,
सानंद पंख अपुले उडवीत जाते;
एका फुलांतिल पिऊन रसा दुज्यातें,
तेथीलही रस पिऊन पुढें तिज्यातें, ५
त्या रीतिनेंच मम दृष्टिहि या स्थळींची,
शोभा विचित्र रमणीय पहावयाची
इच्छा धरून हृदयांत, यथाक्रमानें
सारे पदार्थ निरखी परमादरानें. ६
आतां दृष्टि प्रथमचि पहा या गिरीच्या तळातें
जें रानाचें वलय दिसतें कंद त्याच्या सभोंतें,
त्या 'तार्यानी' म्हणुन वसतें देशभाषेंत नांव,
लोकीं त्याच्यापरि न दुसरा सांपडे घोर ठाव. ७

होती या उ-द्गम जवळच्या उंचभागीं नद्यांचे
त्या साऱ्याही सलिल जमतें या स्थळीं निर्झरांचें;
त्या योगानें बहु दलदली थोर या घोर रानी
होती, तापे रविहि वरतीं लंब-रूपी करांनीं. ८
त्यानें येथें विपिन इतकें किर्र माजून जातें,
कीं त्यामध्यें स्थळ न गवसे पायही ठेवण्यातें.
कोठें माजे यवस, झुडुपें कंटकांचीं हि कोठें,
कोठें जाती सरळ गगनीं वृक्षही मोठमोठे. ९
कोठें होती अविरल वनें वेतसांचीं अफाट,
कोठें साधारण गवतही वाढतें उंच दाट.
जागोजागीं पडुनि तरुंचीं जीर्णपर्णें, कुजून
जातां, वाफा विषमय निघूं लागती त्यांमधून; १०
त्यांनीं वातावरण भरतें भोंवतालील सारें
त्यायोगें या-स्थळिं न घडतें राहणें मानवांचें.
ऐसें आहे तरिहि, विविध श्वापदें क्रूर, चंड,
रानीं या नि-र्भय चहुंकडे हिंडतीं हीं उदंड. ११
कोठें मत्त द्विरद फिरती थोर यूथेंकरून,
कोठें व्याघ्रप्रवर करिती वास खिंडींमधून;
कोठें कुंजाश्रय करुनियां वन्य गाई रहाती,
कोठें वस्ती करिति तरुच्या कोटरीं ऋक्षजाती. १२
यातें स्वग्रामधुनि हि नसे मानवी शक्ति ठावी,
तेंव्हां तीपा-सुनि मरणभी केविं यातें असावी !
हे सोडून प्रविततविषोद्गारगंधी अनूप
जातां कांहीं चढुनि वरतीं, या नगाचें स्वरूप १३
पूर्वीपेक्षां अधिक दिसतें सौम्य, पाहून ज्यातें
होतें दृष्टिप्राति सुख, महानंदही मानसातें !

जातां मार्गी बघत, लवणांतून दोहींकडे तें,
येथें दृष्टी पडति हिरवीं गार विस्तीर्ण शेतें १४
कोठें त्यांच्या मधुनि दिसती ओघ हे निर्झरांचे,
वाहे शुद्ध स्फटिकसदृश स्वच्छ वारी जयांचें.
कोठें कोठें मधुनि दिसती रम्य गावें, तयांच्या
भोंती ताट्या अविरल पहा लागल्या या फुलांच्या! १५
चांफा, जाई, गुलतुर, गुलाबादिकांतें विकास
होतां, त्यांचा मधुर पसरे गंध दाही दिशांस.
कोठें सौगंधिक शतदलीं पद्मखंडें विकास
कासारांच्या धरिति सलिलीं, त्यामध्यें राजहंस १६
आनंदानें प्रियसहचरीयुक्त राहून शांत,
संसारींचीं सकळ हि सुखें पूर्ण हे भोगितात !
जे उत्पत्ती धरिति समशीतोष्ण वा उष्णदेशीं
ते एकत्र द्रुम सकलही वाढती या प्रदेशीं; १७
कोठें माळावरि उगवती देवदारू विशाल,
कोठें ओक द्रुम विलसती, उंच कोठें तमाल;
पारंब्याही सुटुनि धरणीमाजि कोठें वडांच्या
जीं का त्यापासुनि उगवती अन्यझाडें, तयांच्या. १८
गुंफा होती निबिड, तरुणादित्य-तापातें ज्यांतें
कस्तूरीचे मृग निपजती प्रत्यहीं आश्रयातें.
ज्यांतें आलिंगिति मधुलता मुग्ध शाखा-करांनीं,
ऐसे आम्रद्रुमहि दिसती नम्र भारी फलांनीं; १९
जो या स्थानीं सतत घुमतो कंदरांतून वारा
त्या मानून स्तनित, अपुला चित्रवर्णी पिसारा
सारा प्रेमें पसरुनि, गलत्प्रेम-नेत्रांबु-पूर
वृक्षस्कंधीं रुचिर करिती तांडवातें मयूर ! २०

जी या स्थानीं निबिड जमते शीतकाळीं हिमानी
ती ग्रीष्मींच्या द्रुत वितळतां भास्कराच्या करांनीं.
मोठीं मोठीं हरित कुरणें वाढती या विभागीं,
त्याच्यामध्यें चरति पशुंचे संघही जागजागीं. २१
कांहीं जागीं हरिण चरती हे निजेच्छानुसारें;
कोठें वन्यच्छगल, इकडे ग्राम्य कोठें खिलारें;
कोठें दृष्टी पडति बकरीं, आत्मजांतुल्य ज्यांसी
शालीसाठीं जतन करिती लोक काश्मीरवासी. २२
जातां हाहि चढून भाग वरतीं, तेथें दिसूं लागती
साऱ्या वस्तु उदास, रूक्ष, अवघें ओसाड दृष्टिप्रती;
भासे हें स्थळ पाहतां, मधु रसा चाखून त्याच्यावरी
खातां तिंतिडिका घडे तशि अतां मच्चित्तवृत्ती बरी ! २३
जातां या स्थलिं खालती, वरि, पुढें, मागें, चहूंहीकडे
सारें बर्फ दिसे; तयाविण दुजें कांहीं न दृष्टी पडे.
वर्षांतून सदैव शीत अपुला आवास येथें करी,
तेणें वृद्धि न उद्भिजा घडतसे या शून्यभागावरी. २४
भूर्जाचे तरु जे क्वचित् खुरटले थंडीमुळें राहती,
त्यावांचून न कोणते हि दुसरे येथें तरू वाढती;
कस्तूरीमृग, वा मदोद्धतकरी, वा हिंसक श्वापदें,
किंवा पक्षिसमूह ही न करती येथें निवासास्पदें. २५
जातां प्राणिनिवास चिन्हहि बघूं कोठें नसे तत्वतां,
सारा भाग दिसे भयाण, अवघी भासे उदासीनता
कोठें उंच कड्यांवरून पडतां वेगें नद्या खालतीं,
त्यांचीं पात-विशीर्ण- तूर्ण- शतधा धाराजळें वाहती; २६
तीं वेगें खडकांमधून पुढतीं वाहूं जशीं लागती,
त्यांच्या भीमरवें प्रपूरित दऱ्या तैशाहि नादावती,

या येथून विलोकितां दिसति जीं जातां नभोऽभ्यंतरीं,
स्वर्गारोहण-हेतुनिर्मित महासोपानमार्गापरी २७
एका मागुन एक, उंच शिखरें या अद्रिचीं, त्यां शिरीं
शोभे क्षीर-विपांडु निर्मळ हिम-प्रावार वस्त्रापरी;
ग्रीष्मींचा प्रखरप्रताप हि जरी भास्वान् सहस्रांकरीं
प्रत्यब्दीं हिम येथलें वितळण्यासाठीं प्रयत्नां करी. २८
सारें व्यर्थ तरीहि; बर्फ न कधीं येथील जातें लया,
ज्यातें थोर निजाश्रया वितरिती कांहीं नसे भी तया.
जीं येथून समीप फार, दिसती तीं स्वच्छ नेत्रांप्रति;
त्यांमागील लगेच अंधक जरा कांहीं दिसूं लागती; २९
त्यांहीहून विशेष अंधक दुजीं त्यामागचीं त्यापरी
ओळीनें शिखरें जशीं चढत हीं जाती नभोऽभ्यंतरीं;
तैसा आदिमवर्ण पालटुनियां नीलत्व त्यां येतसे,
या योगें गगनास आणिक तयां वर्णैकता होतसे ! ३०

गंगावर्णना.

---

## २२. अन्योक्ति.

### केतकीविषयीं

### श्लोक.

दलां सर्वा कांटे असति, मधुचा लेशहि नसे,
उडोनी नेत्रांतें रज बहुत पीडा करितसे;
तुझ्या पुष्पीं ऐसे अवगुण असोनी, भ्रमर हा
कसा एक्या गंधें भुलुनि पडला केतकि, पहा ! १

### वटान्योक्ति.

ऐसा थोर खरा नसेच दुसरा त्वत्तुल्य साऱ्या वनीं,
वार्ता आयकिली तुला कथितसें, कोपा न आणीं मनीं;

कोणी क्षुद्र लता मळ्यांत असते, तुंबी जितें बोलती,
येती थोर फळें जिला बहुत, ती गर्वें तुला हांसती ! २

## निवडुंगान्योक्ति.

### साकी.

भुजंग वेष्टिति चंदन तरुतें, कंटक केतकिला ही,
सुगंध अंगीं आहे, म्हणुनी भीति तयांतें कांहीं; ३
रे निवडुंगा, नीचा, इतके धरिशि कशाला कांटे !
रक्षणयोग्य असें तुजपाशीं काय असे तुज वाटे ? ४

## सूर्यान्योक्ति.

### श्लोक.

होता जोंवरि अंबरीं तपत तो चंडांशु तेजें निजें,
झाला निष्प्रभ तारकाधिपतिही बोला कशाला दुजें ?
राहूच्या वदनीं अजी गवसतां तो भानु दैवें, अहा !
कैसे क्षुद्र हि काजवे चमकती त्याच्यापुढें, हे पहा ! ५

## चंद्रान्योक्ति.

आकाशांत शशांक पूर्ण उदया आला, तया पाहुनी,
झाले तुष्ट चकोरमंडळ, सुधापाना कराया मनीं;
ताप-क्लेश उणा जनांस नुसता होऊं असे लागला,
तों दैवें इतक्यांत मेघ अणुनी कैसा मधें घातला ! ६

## हंसान्योक्ति.

उडत उडत जातां हंस तो मानसींचा,
मरुजनपद मार्गीं लागला त्यास साचा;
सरस कमल तंतू राहिले दूर भारी,
श्रम करुनि मिळेना बापड्या कूपवारी ! ७

पद्यरत्नावलि.

# स्पष्टीकरण व टीका.

## भाग पहिला.

१. विश्वमंदिर=ईश्वरानें हें विश्वरूप मंदिर निर्मिलें आहे, त्यांतील अतिरमणीय शोभा दाखविण्यास द्वारांत तत्ववेत्ते हे हेर उभे आहेत. जे आस्तिक बुद्धि धरितात, त्यांस ही शोभा दिसते. जे नास्तिक आहेत व ईश्वरास मानीत नाहींत, त्यांस दिसत नाहीं असा कवीचा भाव आहे. १—४ नयन-गति. इ.—पूर्वी ईश्वराचें अज्ञान रूपी जें डोळ्यावर पटल होतें, तें जाऊन ईश्वराचें स्वरूप दिसूं लागतें.

२-२ लघूस=हलक्या जनास. ३ आर्य—श्रेष्ठ, कथा—कीर्तन, छंदानें-नादानें—श्रेष्ठ लोकांची कीर्ति गाण्याचा नाद असल्यामुळें. ३ तनु-वाक्कर्म मन:पाप=शरीर, वाणी, आचार, मन यांनीं घडलेलें पाप. ४ जनपदभाषा=देशभाषा. ५' भवशीत 'इ० संसाररूप जी थंडी तिच्या भीतीनें भ्यालेलें आहे स्वांत=अंत:करण ज्याचें तो; बहु. स.

३-१ कलहंस=एक प्रकारचे हंसपक्षी—यांना कमळांची फार आवड असते. २ ' प्रकाशुनीयां नित्य चंद्रही '=कुबेरनगरी कैलास पर्वतावर आहे; व शिवाचे मस्तकीं नेहमीं चंद्र आहे, यामुळें येथें चंद्र कधीं अस्तास जात नाहीं, ही कल्पना येथें कवीचे मनांत आहे. ३ तळीं जयांच्या बिंबुनि तारा इ०तळ=प्रासादतल-गच्ची; गच्च्यांची भुई इतकी घोंटीव होती, कीं त्यांत आकाशांतले तारे प्रतिबिंबित होत. ६. भयें तयाच्या इ०—शंकरांनीं मदन जाळिला ही कथा सर्वप्रसिद्धच आहे. तिला उद्देशून हें वर्णन आहे. १० ' लाल कराया पाय ' इ० पूर्वी तरुण स्त्रिया पायांस अळत्याचा रंग लावीत असत. ही चाल अझून गुजराथेंत दृष्टीस पडते. व आमचे इकडे लहान मुली हातांचीं व पायांचीं नखें वगैरे मेंदीचे पाल्यानें रंगवितात हें प्रसिद्धच आहे.

४. मऱ्हाठी—मराठी या शब्दाचें हें जुनें रूप आहे. हा शब्द कोणच्या संस्कृत शब्दापासून झाला, याबद्दल अनेक भिन्नमतें आहेत. मुक्तेश्वराचे

वेळीं तरी निदान हा शब्द ‘ महाराष्ट्री ’ या शब्दापासून झाला असें मत होतेंसें दिसतें. डा० भांडारकर यांणीं आपल्या ‘दक्षिणेच्या इतिहासां’ त या शब्दाची अशीच उत्पत्ति दिली आहे. मुक्तेश्वराचे वेळीं आतां प्रमाणेंच विद्वान् लोकांस मराठी ग्रंथ वाचण्याचा कंटाळा होता, किंवा मराठी वाचणें त्यांस हलकी गोष्ट असें वाटत असे, असें दिसतें. तथापि कवि म्हणतो, श्रेष्ठ जे आहेत ते संस्कृतात केलेली ग्रंथरचना वाचतील. पण आमचे सारखे कनिष्ठ लोक जे आहेत, त्यांनीं ईश्वरभक्ति स्वभाषेनें केली, व स्वभाषेंतच त्याचे गुण गाइले तरी चिंता नाहीं; कारण ईश्वरास संस्कृत व मराठी सर्व सारखेंच.

५. मनास बोध.—या उताऱ्यांत कवीनें जे कित्येक अशुद्ध व्याकरण प्रयोग केले आहेत, ते मुलांस सागून द्यावे. ४ मत्सरू, दंभभारू='ऊ' हा जुन्या मराठी कवितेंत प्रथमेचा प्रत्यय सांपडतो. १० सगुणीं=गुण सहित जें सामर्थ्यें=ज्याचे ठिकाणीं सर्व गुण आहेत, असें रूप, ईश्वर ( अर्थात् साकार रूप. ) ११ जनीं बोलण्यासारखें-जनांमध्यें तुझ्याबद्दल बोलतील, म्हणजे तुझी कीर्ति गातील अशा प्रकारें.

६. हा उतारा सीतास्वयंवरांतील आहे. यज्ञरक्षणार्थ राम व लक्ष्मण विश्वामित्राबरोबर गेले. त्यांनीं तें कार्य साधिल्यावर विश्वामित्र त्यांस घेऊन जनकाचे घरीं स्वयंवराची मौज पाहण्याकरितां व शिवधनुष्य म्हणून जें प्रसिद्ध धनुष्य होतें तें रामास दाखविण्याकरितां घेऊन आला. या उताऱ्यांतील नृप म्हणजे जनक राजा व मुनिराज म्हणजे विश्वामित्र. ३ धर्मे-करूं-रक्षणीं-धर्मानें प्रजेचें रक्षण करण्यामध्यें; हा चमत्कारिक समास आहे.—कृपा-ईक्षणीं-समास संस्कृताचे रीतीनें केला आहे, पण मध्यें संधी केला नाहीं. ४ या श्लोकांतील ताटिका राक्षसी व मारीच व सुबाहु राक्षस यांच्या कथा लोकप्रसिद्धच आहेत. याच मारीच राक्षसानें पुढें सुवर्णहरिणाचें रूप घेऊन रामास एकीकडे नेलें, व मरतां मरतां ‘ हा सीते, हा लक्ष्मणा ! ’ असा शब्द करून लक्ष्मणासही दूर नेलें, व रावणास सीता चोरून नेण्यास संधी दिली. ५ चाप=शिव-धनुष्य, याची कथा अशी आहे, कीं हें धनुष्य परशुरामांनीं जनकाचे घरीं

ठेविलें होतें. एक वेळ तें सहज घरांत पडलें असतां जवळ सीता बाळपणीं खेळत होती, तिनें त्याचा घोडा केला. हें पाहून जनकानें पण केला होता, कीं जो हें धनुष्य उचलून सज्ज करील, त्यालाच सीता द्यावी. अहिल्या शिळा मुक्त केली, १०—अहिल्या ही गौतमऋषीची स्त्री. ही फार सुंदर व पतिव्रता होती. तिच्या बापानें लग्नसमयीं पण लाविला होता, कीं जो कोणी प्रथमतः पृथ्वीप्रदक्षिणा करून येईल, त्यास ती द्यावी. देवेंद्र या पणाप्रमाणें पृथ्वीप्रदक्षिणेस निघाला. पण गौतम-ऋषीनें एक धेनु प्रसवत असतां तिला प्रदक्षिणा घातली, तेव्हां शास्त्राप्रमाणें अर्थात् ती पृथ्वीप्रदक्षिणा होऊन इंद्र परत येण्यापूर्वी गौतमाचें अहि-ल्येपाशीं लग्नही झालें. परंतु ह्या गोष्टीपासून इंद्रास फार वाईट वाटलें. त्यानें कोणच्या तरी उपायानें अहिल्येचें पातिव्रत्य भंगण्याचा निश्चय केला. एकवेळ ऋषि घरीं नाहीं असें पाहून इंद्र गौतमरूपानें आला, व बिचाऱ्या अहिल्येस फसविलें. गौतम घरीं येतांच इंद्र मार्जार रूपानें पळत होता, त्याचेवर ऋषीनें झारीनें पाणी ओतलें, यामुळें त्याचे शरीरावर सहस्र छिद्रें पडलीं. व अहिल्येस त्यानें शापानें शिळा बनविली. पुढें रामाचे पादस्पर्शानें ती पुनः पूर्ववत् झाली; अशी कथा आहे.

७–१ चित्ताभस्में=हें वस्तुतः चिताभस्में असें पाहिजे.

८–२ झाला बायकोच्या बोला=अनुसरला. ८ वैरकार=वैर करणारे.

९-२ पुत्रोत्पादन=पुत्र झाला असतां मागील सर्व पितरांचा उद्धार होतो, म्हणून पुत्रोत्पादनाचें पुण्य शतक्रतूंपेक्षांही जास्त मानलें आहे. मेरु–सर्षप–दृष्टांतें=मेरु सर्षपापेक्षा म्हणजे मोहरीपेक्षा जितका मोठा त्या मानानें. ७ वोळंगे=असें पाहिजे; अर्थ, संनिध येतें ९ नातळे= न-आतळे=संबंध घडत नाहीं.

१०. हा उतारा साहाव्या उताऱ्याची पुरवणीच आहे. ३ ती भूमीसि १० या श्लोकांत सीता भूमि, शेष, कूर्म इत्यादिकांस रामास जड धनुष्य उचलण्यास साह्य करण्याविषयीं विनवीत आहे. ९ श्लोकाचा भाव असा:– ‘ रामानें धनुष्य वर उचललें, त्यावेळीं ऋषीलाही वर उचललें, म्हणजे त्यास इतका अभिमान वाटला. व ‘ हा काय पोर धनुष्य उचलतो, ’

हा राजांचा संशय, आणि रामाच्यानें धनुष्य उचलेल कीं नाहीं हा जनकाचा संशय उडविला; धनुष्याचे दोरी बरोबर सीतेचें चित्तही ओढलें, परशुरामा सारख्यांचा गर्व हरण केला, व सर्व धनूभृत् म्हणजे वीर यांना त्यांच्या आकृति टाकायास लाविलें, म्हणजे त्यांनीं एवढा वेळ ज्या वर माना केल्या होत्या, त्या लज्जेनें खालीं घातल्या.' १० सर्वे भुप=सर्व याचें संस्कृत मधील बहुवचन; भूप—हा शब्द दीर्घ असून छंद जुळण्याकरितां ऱ्हस्व घातला आहे; असाच पांचव्या श्लोकांतही आहे.

११.—कर्णार्जुन यांचें युद्ध चाललें असतां कर्णाचा अंतकाळ येऊन ठेपला. पूर्वी कर्णानें परशुरामास आपण ब्राम्हण म्हणून सांगून फसवून त्याजपासून धनुर्विद्या संपादन केली होती. पण परशुरामास हें समजल्यावर त्यानें शाप दिला, कीं अंतकाळीं तुला शस्त्रास्त्रें आठवणार नाहींत, व तुझ्या रथाचें चक्र पृथ्वी गिळील. या वेळीं हा शाप आपला अंमल करूं लागला. तेव्हां कर्ण कृष्णार्जुनांस म्हणूं लागला, कीं तुम्हांस युद्धधर्म अवगत आहे, यासाठीं मी विरथ आहें तोंपर्यंत माझ्यावर शस्त्रवृष्टि करूं नका. यावर कृष्णानें त्यास हें पुढील उत्तर दिलें आहे. १ राधेय=कुंतीला कर्ण हा कुंवारपणीं झाला, म्हणून तिनें लज्जारक्षणाकरितां त्याचा त्याग केला. त्याला एका सूत (रथकार म्ह० सुतार) जातीच्या पुरुषानें वाढविलें. त्याची स्त्री राधानामें होती म्हणून त्यास सूतपुत्र, राधेय इ० म्हटलें आहे. ११ धर्मगृहीं=यमाच्या घरीं. १२ या आर्येपासून पुढें 'धर्म' या शब्दाचे दोन अर्थ घ्यावयाचे; एक धर्मराजा व दुसरा धर्म=धर्मशास्त्र. १३ जो न तोय सांचविता=जो पाणी सांठवून ठेवीत नाहीं. १४ वित्त-मद्य-मत्तांनीं=धनरूप जें मद्य त्यानें मत्त झालेले जे त्यानीं. १५ नान्य=न अन्य=दुसरा नाहीं.

१२—१२ विजेसहित इ० हें मेघाला उद्देशून आहे. एका यक्षानें कांहीं दांडगाईची वर्तणूक केल्यावरून कुबेरानें त्यास शाप दिला, कीं तुला तुझ्या प्रिय स्त्रीचा एक वर्ष वियोग घडेल. तो यक्ष रामगिरीवर येऊन राहिला. व तेथें त्यास स्त्रीवियोग न साहून त्यानें मेघास आपला दूत कल्पून त्याजबरोबर स्वस्त्रीस निरोप पाठविला आहे; व तो या ठिकाणीं विजेस मेघाची स्त्री मानून बोलत आहे. १५ बकुलास फुलें येत

नसलीं, तर तरुण स्त्रीनें मद्याच्या गुळण्या करून त्याच्या बुडाशीं टाकाव्या म्हणजे तो फुलूं लागतो. व अशोकास फुलें येण्याकरितां तरुण स्त्रीनें डाव्या पायास रंग लावून त्यापायानें त्या झाडास लत्ताप्रहर करावा, अशी मागें समजूत असे. स्त्रियांनीं चाखून उष्टें केलेलें मद्य पुरुषानें पिणें हें एक भूषण मानीत, त्याला उद्देशून पहिल्या चरणांतील ' मजपरी ' याचा उपयोग केला आहे. " पहिला ( बकुल ) माझ्या प्रमाणें ( म्हणजे मी जशी वांच्छा करीत आहें तसा ) तुझ्या सखीच्या वदनांतील मदिरेतें वांच्छी. "

१३ हा उतारा व त्याचप्रमाणें पुढील उतारा हे ' यशवंतराय ' या नांवाच्या एका छापून प्रसिद्ध न झालेल्या काव्यांतून घेतले आहेत. या काव्याचें सर्व कथानक पाहणें असल्यास निबंधचंद्रिकेचे ४५ व ४६ हे अंक पहा. या उताऱ्याचा प्रसंग असा आहे:—उत्तर हिंदुस्थानांतल्या एका रजपूत शहरांतील लोकांचें व पेशव्यांचा सरदार मल्हारराव होळकर यांचे युद्ध चाललें असतां त्यांनीं समेट करण्यासाठीं एक वकील पुण्यास पाठविला. त्याचे दृष्टीस प्रथमतःच पुणें शहर पडलें असतां त्याचे मनांत काय विचार आले, ते त्यानें १३ व्या उताऱ्यांत वर्णिले आहेत. व पुढील उताऱ्यांत सध्यांची पुण्याची स्थिति मनांत आणून कवीनें आपले उद्गार प्रकट केले आहेत.

१४–२ भगवें निशाण—मराठ्यांचें निशाण भगवें होतें. या रंगाचें निशाण करण्याचें कारण असें, कीं एकवार शिवाजी महाराज रामदासस्वामींच्या उपदेशानें विरक्त बनून त्यांनीं आपलें सर्व राज्य स्वामीचरणीं अर्पिलें. पुढें स्वामींनीं महाराजांस बोध केला, कीं प्रजारक्षण करावें व धर्मसंस्थापना करावी यासाठीं तुझा अवतार आहे, तर हें राज्य माझेंच म्हणून तूं हें परत घे. त्यावेळीं महाराजांनीं राज्य परत घेतांना या गोष्टीचे आठवणीकरितां स्वामींच्या छाटीचे रंगाचें म्हणजे भगवें निशाण केलें. मराठ्याचें दुसरें निशाण जरीपटका हें होतें, व तें पेशव्यांनीं काढलें होतें. ४ दसरा—दसरा झाल्यावर मराठे स्वारीस निघत. ५ नजीब—नजीब उद्दौला. ७ पंत

प्रधान-पेशवे. पेशव्यांचे पुण्याचे सर्व वाडे एका मागून एक जळून गेले, तिकडे या श्लोकांत संबंध आहे.

१५–भारती युद्धांत एक वेळ धर्माची व कर्णाची गांठ पडली. धर्माचा पराभव झाला. कर्णानें कुंतीस वचन दिलें होतें, कीं मीं अर्जुनास मारण्याची प्रतिज्ञा केली आहे तेव्हां प्रसंग आला तरी त्याच्या खेरीज पांडवांपैकीं दुसरे कोणाचा वध करणार नाहीं, म्हणून कर्णानें धर्मास पळवून लाविलें. त्यावेळीं कर्ण त्यास खोंचून बोलत आहे. १–शुद्धसेतानीं=चांगल्या वंशांत. ६ वनकोलयूथनाथें=वनांतील डुकरांच्या राजानें. ५ कुश-स्रुक्स्रुव-संभार=दर्भ व होमपात्रें यांचा संभार ८ जागा दाटुनि इ० ' हरि दाटुनि जागा ( जागृत ) केल्या गजा वांचाया जागा नसे ' असा अन्वय.

१६ भारती युद्धारंभीं अर्जुन व दुर्योधन दोघेही कृष्णाकडे तूं आमच्या पक्षाकडे ये म्हणून बोलावयास गेले. पण कृष्णानें सांगितलें, कीं मी पाहिजे त्याकडे येतों. पण तुम्ही दोघेही आप्त, यासाठीं मी शस्त्र धारण करणार नाहीं. या अटीवर दुर्योधनानें त्यास आपले पक्षास घेतलें नाहीं; पण अर्जुनानें घेतलें, व कृष्ण त्याचा सारथी झाला. या उताऱ्यांत कृष्ण प्रतिज्ञा म्हटली आहे ती हीच. भीष्माची प्रतिज्ञा अशी होती कीं, मी कृष्णाकडून शस्त्रधारण करवीन. १ जन्मेजय=परीक्षिताचा पुत्र व अर्जुनाचा पणतु. ह्याला सर्व भारती कथा वैशंपायन नामक ऋषीनें सांगितल्या. ३ असि गर्व तो ही इ०=अर्जुनाचे मनांत गर्व होता कीं आपण फार पराक्रमी, आपणास कोण जिंकील ? श्लोक ६ वा पहा. वामनावतारीं प्रभूनीं बळीचा गर्व हरण केला होता, म्हणून येथेंही वामन हें नांव घातलें आहे. ५ सव्यसाची–सव्य–डावा, साच बाण जोडणें; अर्जुनास दोन्हीं हातानीं सारखेंच शरसंधान करितां येत असे, म्हणून त्यास सव्यसाची असें नांव होतें. अर्जुनाचीं दहा नांवें खालच्या श्लोकांत आहेत:—' अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः। बीभत्सुर्विजयी कृष्णः सव्यसाची धनंजयः'=६ काळखंज वधिले इ० नवनीतांत ' वधिला ' असा पाठ आहे; पण काळखंज हा एक राक्षस नसून राक्षससमुदाय होता. ८ हुतवहार्पित खांडवानें=हुतवह ( अग्नि ) त्याला

अर्पित आहे खांडव (वन) ज्यानें; बहु. स. १७ मारावें इ० भीष्म म्हणतो कीं 'तुझ्या मनांत जर मला मारावयाचें असेल तर माझें रक्षण कोण करणार आहे? पण तसें तुझ्या मनांत नाहीं; तर मी जो तुझा भक्त त्याची प्रतिज्ञा तुला खरी करावयाची होती, म्हणून तूं शस्त्र धारण केलें आहेस मला मारण्यासाठीं नव्हे.'

१७ साङ्ग नोहे तो कुसुमचाप इ०—कुसुमचाप( मदन )यास शंकरानें जाळल्यावर त्याला शरीर नाहींसें झालें म्हणून तो साङ्ग नोहे असें म्हटलें. मदनास अनङ्ग असें नांव आहे. ६ धाले धनी इ० नळाचे पुढील ( पुढें आलेले ) याचक धनी म्ह० धनांनीं धाले म्ह० तृप्त झाले; किती तृप्त झाले, तर 'येतां फिरोनी समुदाय इ० इ०'

१८–२ समकरुणेची इ० ईश्वराची दृष्टी अशी आहे, कीं ती सर्वांवर सारख्या दयेची असते. ४ प्रवृत्ति विषयीं इ०—जे जन नामस्मरण करितात, त्यांची मनें जरी प्रवृत्तिविषयीं म्हणजे संसाराकडे असलीं तरी, इ०

१९–१ कंदपे=' कंदर्वे ' असें पाहिजे. ४ निरंतरा-मंद इ० तामरसान पायें म्हणजे तामरसांच्या (कमळां) च्या अंनपायें म्ह० अविनाशाचे योगानें निरंतर( नित्य )अमंद म्हणजे मंद नाहीं असा, अर्थात् पुष्कळ, मरंद म्ह० मकरंद वाहे. ५ या श्लोकाचा अन्वय-'गा तें सारस जल तसें मधुर ( कीं ) अमृत ही पय ही म्हणवीतसे; ( कारण ) उभय होय तशी रुचि वीतसे; यास्तव ( तेथील ) सारस मधुर गातसे.' ६ जें होय मंदिर इ०=कमल हें इंदिरेचें म्ह० लक्ष्मीचें मंदिर म्ह० वसतिस्थान आहे.

२० हा उतारा हरिवंशांतला आहे. राम व कृष्ण कंसवधानंतर मथुरेसच राहिले व गोकुळांतील लोकांस फार दिवसांत भेटले नाहींत. पुढें ते गोवर्धन पर्वतावर आले असतां तेथें नंद यशोदा व इतर गोपी वगैरे त्यांस भेटावयास गेलीं आहेत. ५ नृपा—हें व ६ व्या श्लोकांतले 'महीवरा' हीं संबोधनें जन्मेजयास उद्देशून आहेत.

२१–४ किंशुक=पलाश किंवा पळस; याचीं फुलें लाल रंगाचीं असतात, म्हणून त्यांस दीप म्हटलें आहे. गुंजद्भ्रमद्भ्रमरपुंज

प्रधान–पेशवे. पेशव्यांचे पुण्याचे सर्व वाडे एका मागून एक जळून गेले, तिकडे या श्लोकांत संबंध आहे.

१५–भारती युद्धांत एक वेळ धर्माची व कर्णाची गांठ पडली. धर्माचा पराभव झाला. कर्णानें कुंतीस वचन दिलें होतें, कीं मीं अर्जुनास मारण्याची प्रतिज्ञा केली आहे तेव्हां प्रसंग आला तरी त्याच्या खेरीज पांडवांपैकीं दुसरे कोणाचा वध करणार नाहीं, म्हणून कर्णानें धर्मास पळवून लाविलें. त्यावेळीं कर्ण त्यास खोंचून बोलत आहे. १–शुद्धसेतानीं=चांगल्या वंशांत. ६ वनकोलयूथनाथें=वनांतील डुकरांच्या राजानें. ५ कुश-स्रुक्स्रुव-संभार=दर्भ व होमपात्रें यांचा संभार ८ जागा दाटुनि इ० ' हरि दाटुनि जागा ( जागृत ) केल्या गजा वांचाया जागा नसे ' असा अन्वय.

१६ भारती युद्धारंभीं अर्जुन व दुर्योधन दोघेही कृष्णाकडे तूं आमच्या पक्षाकडे ये म्हणून बोलावयास गेले. पण कृष्णानें सांगितलें, कीं मी पाहिजे त्याकडे येतों. पण तुम्ही दोघेही आप्त, यासाठीं मी शस्त्र धारण करणार नाहीं. या अटीवर दुर्योधनानें त्यास आपले पक्षास घेतलें नाहीं; पण अर्जुनानें घेतलें, व कृष्ण त्याचा सारथी झाला. या उताऱ्यांत कृष्ण प्रतिज्ञा म्हटली आहे ती हीच. भीष्माची प्रतिज्ञा अशी होती कीं, मी कृष्णाकडून शस्त्रधारण करवीन. १ जन्मेजय=परीक्षिताचा पुत्र व अर्जुनाचा पणतु. त्याला सर्व भारती कथा वैशंपायन नामक ऋषीनें सांगितल्या. ३ असे गर्व तो ही इ०=अर्जुनाचे मनांत गर्व होता कीं आपण फार पराक्रमी, आपणास कोण जिंकील ? श्लोक ६ वा पहा. वामनावतारीं प्रभूंनीं बळीचा गर्व हरण केला होता, म्हणून येथेंही वामन हें नांव घातलें आहे. ५ सव्यसाची–सव्य–डावा, साच बाण जोडणें; अर्जुनास दोन्हीं हातानीं सारखेंच शरसंधान करितां येत असे, म्हणून त्यास सव्यसाची असें नांव होतें. अर्जुनाचीं दहा नांवें खालच्या श्लोकांत आहेत:—' अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः । बीभत्सुर्विजयी कृष्णः सव्यसाची धनंजयः'=६ काळखंज वधिले इ० नवनीतांत ' वधिला ' असा पाठ आहे; पण काळखंज हा एक राक्षस नसून राक्षससमुदाय होता. ८ हुतवहार्पित खांडवानें=हुतवह ( अग्नि ) त्याला

आपंत आहे खांडव (वन) ज्यानें; बहु. स. १७ मारावें इ० भीष्म म्हणतो कीं 'तुझ्या मनांत जर मला मारावयाचें असेल तर माझें रक्षण कोण करणार आहे? पण तसें तुझ्या मनांत नाहीं; तर मी जो तुझा भक्त त्याची प्रतिज्ञा तुला खरी करावयाची होती, म्हणून तूं शस्त्र धारण केलें आहेस मला मारण्यासाठीं नव्हे.'

१७ साङ्ग नोहे तो कुसुमचाप इ०—कुसुमचाप( मदन )यास शंकरानें जाळल्यावर त्याला शरीर नाहींसें झालें म्हणून तो साङ्ग नोहे असें म्हटलें. मदनास अनङ्ग असें नांव आहे. ६ धाले धनी इ० नळाचे पुढील ( पुढें आलेले ) याचक धनी म्ह० धनांनीं धाले म्ह० तृप्त झाले; किती तृप्त झाले, तर 'येतां फिरोनी समुदाय इ० इ०'

१८–२ समकरुणेची इ० ईश्वराची दृष्टी अशी आहे, कीं ती सर्वांवर सारख्या दयेची असते. ४ प्रवृत्ति विषयीं इ०—जे जन नामस्मरण करितात, त्यांची मनें जरी प्रवृत्तिविषयीं म्हणजे संसाराकडे असलीं तरी, इ०

१९–१ कंदर्पे='कंदर्वे' असें पाहिजे. ४ निरंतरा–मंद इ० तामरसान पायें म्हणजे तामरसांच्या (कमळां) च्या अंनपायें म्ह० अविनाशाचे योगानें निरंतर( नित्य )अमंद म्हणजे मंद नाहीं असा, अर्थात् पुष्कळ, मरंद म्ह० मकरंद वाहे. ५ या श्लोकाचा अन्वय–'गा तें सारस जल तसें मधुर ( कीं ) अमृत ही पय ही म्हणवीतसे; ( कारण ) उभय होय तशी रुचि वीतसे; यास्तव ( तेथील ) सारस मधुर गातसे.' ६ जें होय मंदिर इ०=कमल हें इंदिरेचें म्ह० लक्ष्मीचें मंदिर म्ह० वसतिस्थान आहे.

२० हा उतारा हरिवंशांतला आहे. राम व कृष्ण कंसवधानंतर मथुरेसच राहिले व गोकुळांतील लोकांस फार दिवसांत भेटले नाहींत. पुढें ते गोवर्धन पर्वतावर आले असतां तेथें नंद यशोदा व इतर गोपी वगैरे त्यांस भेटावयास गेलीं आहेत. ५ नृपा—हें व ६ व्या श्लोकातले 'महीवरा' हीं संबोधनें जन्मेजयास उद्देशून आहेत.

२१–४ किंशुक=पलाश किंवा पळस; याचीं फुलें लाल रंगाचीं असतात, म्हणून त्यांस दीप म्हटलें आहे. गुंजद्भ्रमद्भ्रमरपुंज

निकुंज=निकुंजामध्यें ( झाडांच्या राईत ) जिकडे तिकडे गुंजारव करणारे व भ्रमण करणारे असे भृंगाचे समुदाय झाले होते. पहिलें ( गुंजत् इ० ) निकुंज याचें बहुव्रीहिसमासात्मक विशेषण. १२ कृशांगी=वरील सर्व वर्णन एका पुरुषानें आपले स्त्रीशीं बोलतांना केलें आहे.

३२ देव आपणावर अजून कां प्रसाद करीत नाहीं ? असा प्रश्न घेऊन कवि मोरोपंत त्याचीं आपणच कल्पनेनें उत्तरें देत आहे. म्हणून या प्रकरणास कवीनें ' संशयरत्न-माला ' असें नांव दिलें आहे. १ कोणी बाहेर निघाला असतां त्यास कोठावलें असतां काम होत नाहीं, अशी समजूत आहे. २ हरिणापरिस—हरिणास गाणें फार आवडतें असें कवि मानितात. १२ उगाळितां कोळसा इ०=मीं कोळशासारखा बाहेर तसाच आंत आहें, कोळसा उगाळून हातांना मात्र प्रयास, त्याप्रमाणें माझी परीक्षा पाहूं लागल्यास तुम्हांस प्रयास मात्र पडतील. १८ ' तूं जर मला बीज म्हणून जतन करून ठेविलें आहेस असें म्हणावें, तर मग तुझें नांव माझे तोंडांत कां येतें ? कारण नामस्मरणानें मुक्ति प्राप्त झालीच पाहिजे ' असा भाव.

३३ हरिणान्योक्तीच्या पहिल्या भागांत पूर्ण स्वातंत्र्य अनुभविणाऱ्या हरणाची व ग्राम्यपशूची तुलना केली आहे. दुसरे भागांत एक हरिण अकस्मात् कसा फसला गेला आहे हें सांगितलें आहे. व तिसऱ्यांत एक हरिण पारध्यांपासून निसटून आश्रमांत आला आहे, त्याजकडे उद्देश आहे. या तीनही भागांचा परस्पर संबंध नाहीं.

# भाग दुसरा.

१–१. चमत्कृति-निधान=चमत्कारांचा ठेवा, स्थान. जगदंड=जगत् +अंड=जगद्रूपी अंड=गोळा; ब्रह्मांड. २ चर्मचक्षु=शरीराचे किंवा शारिरिक नेत्र. अदृश्य वस्तु आपण ज्या विचारशक्तीच्या योगानें जाणतों, त्या शक्तीस ज्ञानचक्षु असें म्हणतात. ईश्वर आपणास चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं, त्यास ज्ञानचक्षूंनीं जाणिलें पाहिजे. २ मनोहरा, व साधारणा=मराठी भाषेंत विशेषणाचीं विशेष्याप्रमाणें लिंगभेदेंकरून नेहमीं रूपें फिरत नाहींत, व विभक्तीप्रत्ययही लागत नाहींत. फक्त ज्या विशेषणाचीं पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग यांचीं रूपें अनुक्रमें आ, ई व एँ हे प्रत्यय लागून होतात, त्या विशेषणांस संस्कृताप्रमाणें लिंगें व वचनें लागतात; व विशेष्यास विभक्ति लागली असतां त्याचें सामान्यरूप होतें. या ठिकाणीं कवीनें संस्कृतपद्धतीवर विशेषणास लिंग लाविलें आहे. असा प्रकार जुन्या कवितेंत आढळतो. उदाहरणार्थः—

> ' संसाराब्धिनिमग्न जे जन तयां ज्याचीं पदें पारदें
> योगींद्रें अवलोकिलें हि करुणा लीलालयें नारदें ' मोरोपंत.

२ अतुलशक्ति–' दाविते ' याचें कर्म. ३ देखितो़हे=पहात आहे. १ किन्नर=पुराणांतरीं यक्ष, गंधर्व, किन्नर, राक्षस इ० देवगण गणले आहेत. त्यांस देवाच्या खालच्या प्रतीचे समजतात. हे देवांचे ' परिजन गण ' म्हणजे सेवक होत. १ त्यासी=परिजनगणास. पृच्छा करीं =विचारितों. ३ 'तें' याचें दर्शक ' जें सांगावयाचें तें ' म्हणजे पुढील चरण. ४ यांचीं=याचना-प्रार्थना करितों. ७ ' कधीं चंद्र ' इ० चंद्र व सूर्य अमावास्येस एका राशीस असतात; त्या दिवशीं चंद्र सूर्याचे घरीं येतो असें म्हणतात. ९ यत्संयोगें–हीं पांच तत्वें एकांत एक मिळून आमच्या शास्त्रांत हीं पांच तत्वें मुख्य असून त्यांपासून पृथ्वीवरचे सारे पदार्थ झाले असें मानिलें आहे. पण आलीकडील शोधावरून हीं मूलतत्वें नसून मिश्रपदार्थ आहेत व खरीं मूलतत्वें ६४ आहेत, असें ठरलें

आहे. ९ सर्व स्थित्यंतरी=ज्या निरनिराळ्या स्थिति प्राप्त होतील, त्या सर्व स्थितींत. १० निःशब्द=मेघगर्जना न होतां. ११ सप्तसुरांत=गाण्याचे सात सूर–सा. री. ग. म. प. ध. नी. हे आहेत, त्यांस अनुक्रमें षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत व निषाध हीं नांवें आहेत. ११ श्रवण–रंध्र -विहार=कर्ण रूप रंध्रें=भोंकें त्यांत विहार करणारे, म्ह॰ कानास गोड लागणारें असा अर्थ. १२ प्रेमोत्कर्टे=अतिशय प्रेमानें तृतीया विभ॰ १२ सत्पक्ष=सत्, चांगले—सुंदर आहेत पक्ष–पंख ज्याचे, बहु: समास. १३ त्वत् करीं=या कवितेंत जो सूर्याचा व अंधकाराचा दृष्टांत आहे, त्याचे अनुरोधानें करीं यावर श्लेष आहे; कर=हात, पक्षीं किरण.

२–१ प्रधानपंतातें=पेशव्यास.–मोरोपंताचे वेळीं पेशव्यांचा अंमल पूर्ण होता, व म्हणून कवि म्हणतो, कीं राजा व पंतप्रधान यांबद्दल राजनिष्ठा धरावी. २ 'चूर्णें तसेंच हळदीनें' चूण म्ह॰ डाळ ज्याप्रमाणें हळदीनें रंगते—' जेंवि कधीं, इ॰ ज्याप्रमाणें दीनें कर्षकें ( शेतकऱ्यानें ) हळ ( नांगर ) कधीं सोडूं नये इ॰ ८ सुकवि-कुल-गीतें—सुकवींचें जें कुल म्हणजे समुदाय त्यांनीं ' गीतें ' म्हणजे गाइलेलीं म्ह॰ कविलेलीं.

३–१ गतिदायक=मोक्ष देणारा. २ सूर्यवंश–अमृतांबुधि–सोम =सूर्यवंश हाच अमृत-समुद्र त्यांतला सोम–चंद्र. दाह शांत करणार शिवाचे–देवदैत्य समुद्रमंथन करित असतां अकस्मात् विष निघालें, व त्याचे योगानें त्रिभुवन दग्ध होऊं लागलें. शेवटीं शंकरानीं तें विष प्राशन केलें. त्यामुळें त्यांच्या शरीराचाही दाह होऊं लागला, पण तो रामनामाच्या जपानें शांत झाला. ७ तारिली स्वनगरी=राम अवतारकृत्य संपवून निजधामास गेले, तेव्हां त्यांनीं सारी अयोध्या बरोबर नेली, अशी कथा आहे.

४ कालिया किंवा कालिय हा एक सर्प होता. तो गरुडाच्या भीतीनें यमुनेच्या डोहांत लपून बसला होता. त्याठिकाणीं शापामुळें गरुडास प्रवेश नव्हता. तेथें कालिया जाऊन राहिल्यावर तो डोह इतका विषमय झाला कीं, त्यांतून भयंकर वाफा येत, आणि त्यामुळें

वरून पक्षीही जाऊं शकत नसे. एकदां कांहीं गोप व गाई चुकून या डोहावर पाणी पिण्यास गेल्या व मृत झाल्या. हें पाहून कृष्णानें या डोहांत प्रवेश करून कालियाचें मर्दन केलें व त्यास तेथून घालवून देऊन डोह निर्विष केला. ३ आश्चर्य हें इ०=आश्चर्याचें कारण पुढील श्लोकांत आहे. ८ कर्णहीन नयनें ध्वनि घेतो इ०=सर्पांस कान नसतात, ते ऐकण्याचें कामही नेत्रेंद्रियानेंच करितात अशी समजूत आहे.

५—१० मनुष्यानें विजेला जशी संदेशहारिका केली आहे. तशी अलीकडे दीपहारिका सुद्धां केली आहे. ज्या कवीनें ही कविता लिहिली, याचे वेळीं विद्युद्दीप उपयोगांत आले नव्हते. ११ ‘ केला रवि-चित्रकार ’=सूर्यप्रकाशानें पदार्थांचें हुबेहुब चित्र ( Photograph ) काढितां येतें. होऊनि अंकित वायुहि=एक प्रकारचें वाद्य आहे, तें वाऱ्यावर ठेविलें असतां त्याच्या तारा हालून तें सुस्वर वाजतें. १० ‘ परि तें फळ ’इ०=व्यास, वाल्मीकि, यांनीं जर भारत, रामायणांसारखे ग्रंथ रचिले नसते, तर पांडव कोण किंवा राम कोण हें लोकांस कळलें असतें काय ?

६ हा संवाद युद्धांत आणीबाणीच्या प्रसंगीं झालेला आहे. २ जतु-सद्म-छद्म-कर्म=लाक्षागृह तयार करण्याचें काम. लाक्षागृहाची कथा अशी आहे:—आपले मुलांचे व पांडवांचे वारंवार तंटे न व्हावे म्हणून धृतराष्ट्रानें मध्यस्ती करून पांडवांस वारणावती व त्याचे भोंवतालचा मुलुख दिला पण ही गोष्ट दुर्योधनादिकांस आवडली नाहीं. त्यांनीं पुरोचन नावांच्या एका यवनाकडून पांडवांकरितां वारणावतींत एक लाक्षागृह तयार करविलें, व पांडव येथें राहूं लागल्यावर त्याला आग लावावी असा त्यांचा उद्देश होता. पण ही गोष्ट विदुरास कळली होती. त्यानें त्या वाड्यांतून बाहेर पडण्यास एका भुयाराचा गुप्त मार्ग बनविला होता, व पांडव वारणावतीस जाण्यास निघाले असतां त्यानें बर्बर भाषेंत सर्व हकीकत सांगितली. पुढें पांडव वाराणावतीस गेल्यावर एकवेळ त्याच वाड्यांत पांच किरात व त्यांची आई अशीं पांथस्थ येऊन निजलीं होतीं. व तो कृत्रिमी पुरोचनही तेथेंच निजला होता. ही संधी सा-

धून पांडवांनींच वाड्यास आग लाविली, व आपण भुयाराचे मार्गें सुरक्षित निघून गेले. २ कितव—लबाड-कपटी असा शकुनी; कपटद्यूतांत कौरवांनीं शकुनीस पुढें केलें होतें; हा फार कपटी होता. ३ प्रीति-हेतु=आवडती. शब्दशः प्रीतीचा हेतु म्ह० मूळ. ४ अस्मत्-सर्वस्व, कीर्ति-जीव=आमचें सर्वस्व, आमची कीर्ति, व आमचा केवळ जीवच, अशी. ५ ' तूं जेंवि ' इ० ' तूं जितक्या दुर्गुणांनीं भूषित झाला आहेस, तितक्यांनीं रावणही झाला नव्हता. ' ६ युद्धश्रद्धेसह इ०=तुझें शरीरही भंगितों, व युद्ध करण्याची श्रद्धाही भंगितों. ७ तदेक प्रतिकृत इ०=त्यांतल्या एकाचें देखील उसणें फिटलें नाहीं, म्हणून मला लाज, व भी; म्ह० माझी लज्जा व भीति धर. ९ या आर्येंत दुर्योधन भीमास अज्ञातवासांतल्या बल्लवपणाची आठवण देऊन खोंचून बोलत आहे.

७ शर्मिष्ठाही दैत्यांचा राजा वृषपर्वा याची कन्या व देवयानी ही दैत्यांचा गुरु शुक्राचार्य याची कन्या. एक वेळ या नदीतिरीं क्रीडा करीत असतां त्यांच्यांत कलागत लावून द्यावी म्हणून इंद्रानें वाऱ्याचे रूपानें येऊन त्यांचीं वस्त्रें एकत्र केलीं. त्या मुली परत येऊन एकमेकींचीं वस्त्रें घाईंनें न उमगून नेसूं लागल्या. त्यावरून हा उभयतांचा तंटा झाला आहे ८ आदित्याचीं झाडें=सूर्यकमळाचीं झाडें-ह्या झाडाचें फूल ज्या बाजूस सूर्यबिंब असतें, तिकडे सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारखें फिरतें.

८ हंस आणि दमयंति—नळाचे आज्ञेनें दमयंतीचें मन पहाण्यासाठीं हंस निघाला, तो दमयंती होती तेथें आला. मग तिला तिच्या सख्यांमधून त्यानें एकीकडे काढली, तो प्रकार यांत वर्णिला आहे. ५ निष्कंप-कंकण=निष्कंप आहे कंकण ज्याचेठायीं तो; कर याचें विशे; बहु. स.

९ लाक्षागृहांतून पांडव कुंतीसहवर्तमान गुप्तपणें बाहेर पडले; पण ही गोष्ट फक्त विदुर व कृष्ण यांस मात्र माहीत होती. ते जळून गेले, अशीच सर्वत्र समजूत होती. अशा गुप्त वेषानें ते द्रौपदीस्वयंवर-समयीं द्रुपदाचे राजधानींत जाऊन पोंचले, व व्यासाज्ञेनें स्वयंवरांत ब्राह्मणरूपानें गेले. तेथें द्रुपदानें असा पण लाविला होता, कीं अंतरिक्षांत फिरत

ठेविलेल्या यंत्रांतील मत्स्याचें नेत्रभेदन खालीं तप्त तैलांतील पडच्छायेकडे पाहून जो करील, त्याला द्रौपदी द्यावयाची. या पणांत कर्णादि कौरव विरांची फजीति झाल्यावर द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न क्षात्रियांस टाकून बोलूं लागला. तें सहन न होऊन अर्जुन उठून यंत्रभेदन करावयास जात आहे. १ साधु-उत्साह-अतिरेक=साधूंच्या उत्साहाचा अतिशय.–२ 'हा सुचपळ बटु आम्हां याया क्षत्रिय कृतोपहासाचें नवें पात्रत्व जोडीत आहे=याला अपयश येऊन क्षत्रियांना आमचा उपहास करण्यास नवीन संधी मिळेल ६ 'पार्थ हाच तोक=वत्स; विप्राशी त्या कामदुघा ('धा' हें अशुद्ध आहे) इच्छित देणाऱ्या माता; आणि त्यांचें कारुण्य हेंच स्तन्य=दूध.' ८ ज्याच्या स्मरणानें शुचि-मति (असे जे) यति-पति (यतिश्रेष्ठ, त्यांच्या) गतिला संसारी योग्य होय.' ११ 'मुनिगणांच्या गळ्यांत प्रीतीनें माळ घातली; सोमवंशा राजांच्या गळ्यांत कीर्तीनें माळ घातली, व श्रीमरुत्वान् जो इंद्र त्याचा अंश अर्जुन त्याचे गळ्यांत कृष्णेनें माळ घातली. १४ कृष्णाजिनधारक=पांडवानीं या वेळीं विप्रवेष धारण केला होता.

१०–३ नका जा=जाऊं नका—८ पंखा हवेस्तव इ० पंख्यानें जरीं हवा येऊन सुख होतें, तरी तो हालवावा तेव्हां वारा येतो;—म्हणजे श्रमाखेरीज सुख मिळत नाहीं.

११ वामन कवीचा 'भीष्मार्जुन-युद्ध' (भाग १—१६) हा उतारा व प्रस्तुतचा उतारा यांतील कथासंबंध एकच आहे. १ भीष्मऋतूंतला सूर्य फार कडक असतो, व हेमंतांत सौम्य असतो, ९ हा शूर 'दूर ओ सर' इ०='हा असा शूर आहे, कीं महाप्रभ असा जो रवि त्याला हा दूर म्हणणार, ओ म्हणणार म्हणजे त्याचे समोर येऊन हाकेस हाक देणार, व एकीकडे सर म्हणणार. हार विलासि जनेंसा =विलासी जनानें जसा हार हरवावा त्याप्रमाणें. ४ पदरासि अकीर्ति इ० 'श्रित म्हणजे आमचा आश्रय केला आहे ज्यानीं अशा सुहृदाचें अनवन म्हणजे अरक्षणरूप जो पथ, तो करून म्ह० तो मार्ग स्वीकारून पदरीं अकीर्ति येयाची.' ८ एह्येहि इ०=एहि एहि, ये, ये. ११

तूं हरिसा इ०=या आर्येचा अन्वय. ' तूं हरी हरिसा ( म्ह० सिंहा सारखा ) सुर-सिंधु ( म्हणजे गंगा ) साची हरिणी, मी हि पाडससा; पाड; स-साध्वस ( म्ह० म्यालेला ) ससा अरि-हरिचा पाड पावेल काय हो ? १३ प्रभुनें=शंकरानें; शंकरानें मदन जाळल्याची कथा अशी आहे:- देवांना राक्षसावरोबर युद्ध करण्यासाठीं सेनापति पाहिजे होता. तो शंकराचे व पार्वतीचे पोटीं जन्मावा, असा योग होता. परंतु शंकर व्रतस्थ होत्साते तपश्चर्या करीत होते, व हिमालयाची कन्या पार्वती त्यांचे प्राप्त्यर्थ त्यांची सेवा करीत असतां तिकडे शंकराची दृष्टीही जाईना. तेव्हां देवांनीं शिवाचें ध्यान मोडून त्यांचें लक्ष पार्वतीकडे जावें म्हणून मदनास त्याचेकडे पाठविलें. मदन त्याचेवर कुसुमबाण सोडूं लागला असतां शंकरानीं आपला तृतीय नेत्र उघडला. तों त्यांतून अग्नीच्या ज्वाळा निघून मदन भस्म झाला. १५ इभ व अंदुक= प्रभु इभ म्ह० हत्ती सारखा व भक्त म्ह० अर्जुन अंदुकसा . म्ह० हत्तीचा पाय बांधण्यांची जी श्रृंखळा, तिचे प्रमाणें भासला.

१२-३ तैसाच आठ महिने इ०=सूर्याचे उष्णतेनें पाण्याची वाफ होऊन त्याचे घन बनणें, व त्यांचा भूमीवर वर्षाव होणें, या गोष्टीकडे याचा संबंध. १४ समतुष्टि=सम म्हणजे सारखी आहे तुष्टी जिच्यापासून, बहु. स. वृष्टीचें विशे. १५ विद्वत्-प्रसंग=विद्वान् मनुष्याची गांठ पडली नाहीं तोंच. २१ नांगा=नागवण.

१३. दमयंतीचे स्वयंवरास नळ राजा चालला असतां तिच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून इंद्रादि देवही चालले होते. त्यांची व नळाची गांठ पडल्यावर त्यांनीं त्याचा सुस्वभाव पाहून विनंती केली, कीं तूं आमचा दूत होऊन दमयंतीकडे जा व आमच्या पैकीं कोणाला तरी ती वरील अशी खटपट कर. ती विनंती मान्य करून नळराजा दमयंतीकडे गेला आहे. १ निज-हृदयनिवासी=दमयंतीनें नळास मनानें वरलें होतें; म्हणून तो तिचे हृदयांत वास करीत होता. १२ तुला न तयाची=ज्याचे बरोबर तुलना करण्यास दुसरा कोणी नाहीं.

१४ कौरव व पांडव यांचा द्यूतांत असा पण झाला होता, कीं जो हरेल त्यानें बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास करावा. त्याप्रमाणें पांडव हरल्यामुळें त्यांनीं बारा वर्षे वनवास केला, व एक वर्ष विराटाचे घरीं अज्ञातवास केला. विराटाचे घरीं पांच पांडव व द्रौपदी निरनिराळे वेष धारण करून राहिलीं होतीं. पुढें तेरा वर्षे पूर्ण झाल्यावर ते प्रकट झाले. ७ भिडला ज्या चाप-पाणिसह देव=ज्या धनुर्धराबरोबर देव म्हणजे शंकर भिडला; अर्थात् किरात युद्ध समयीं. ८ ‘ इच्या क्षोभें हरमुरज व उदधि हे अनाद ( नाद रहित ) व रितें व्हावे. ’ ११ या आर्येंत कथा संबंध असा आहे. पांडव विराटनगरींत असावे, अशी अर्धवट बातमी लागून कौरवांनीं विराटावर एकदम दोन बाजूंनीं हल्ला केला. त्यावेळीं विराट ज्या बाजूस गेला होता तिकडे भीमानें व दुसरे बाजूस अर्जुनानें कौरवांचा पराभव केला. १२ म्यां ताडिला ललाटीं इ०=कौरवांस जिंकून आल्यावर विराट आपले मुलानें कौरव जिंकले म्हणून त्याची स्तुति करूं लागला. धर्मराज व विराट हे त्यावेळीं सारीपाट खेळत होते. धर्मानें हें ऐकून विराटास सांगितलें कीं बृहंनडा (म्ह. अर्जुन,) होती म्हणून त्यास जय आला. हें विराटास न आवडून त्यानें रागानें फांसा आपटला, तो वर उडून धर्मराजाचे कपाळास लागून भळभळां रक्त वाहूं लागलें. धर्मराज चक्रवर्ती राजा होता, त्यामुळें त्याचे रक्ताचा एक थेंब खालीं पडता, तर अनर्थ झाला असता पण सैरंध्रीरूपानें द्रौपदी तेथें उभी होती, तिनें चटकर पात्र पुढें करून त्यांत रक्त धरिलें. या कथेकडे येथें संबंध आहे. २२ केंवि करावी इ०अर्जुन बृहंनडा रूपानें विराटगृहीं राहून उत्तरेस नृत्य शिकवीत असे, त्यामुळें ती त्याची शिष्या अर्थात् कन्येसारखी झाली होती, म्हणून अर्जुनानें तिला वरण्याचें कबूल केलें नाहीं. २३ बहिश्चर प्राण इ०=अभिमन्यु हा जलजनाभाचा म्ह० कृष्णाचा बहिश्चर प्राण, म्हणजे शरीराबाहेरचा प्राण, अर्थात् फार आवडता.

१५ राम वनवासास निघून गेले; दशरथ अखेरची मूर्च्छा येऊन पडला असतां भरत अयोध्येस नव्हता. तो मातुलगृहाहून परत आल्या-

वर त्यानें या सर्व कृत्याबद्दल कैकेयीची निर्भर्त्सना केली, व रामास परत आणण्याकरितां अरण्यांत आला आहे, १ वाम बाहु सुरता=डाव्या हातास चिकटून बसलेली. ५ परि न राघव मानी इ०=रामानें दक्षिण दिशेप्रत जाऊन रावणास मारावें या हेतूनें देवांनीं अनेक युक्तींनीं रामास अरण्यवासास बाहेर काढला होता; म्हणून विमानीं सुरवरांस देखून राम भरताची प्रार्थना मानीना हाच संबंध पुढल्याही श्लोकांत आहे १५ कीं सांग गुप्त अवतारचरित्र इ०=भरताची जेव्हां समजूत होईना तेव्हां रामानें वसिष्ठ ऋषींस सांगून त्यास सर्व अवतारचरित कथन करविलें

१६-५ तनु अर्ध इ०=शंकराचे अर्धांगीं पार्वती आहे, •इकडे संबंध ८ कथि न सुरस गाथा इ०=तिनें नवऱ्याला उगाच संसाराच्या गोड गोष्टी सांगून बडबड केली नाहीं. १३ हातीं आमलकासमान= हातावर आमलक म्हणजे आंवळा ठेविला असतां जसा त्याचा प्रत्येक भाग स्पष्टरीतीनें दिसतो, त्याप्रमाणें सर्व शास्त्रें त्याला उत्तम रीतीनें समजत होतीं, म्हणजे त्यांत त्याची उत्तम गति होती. याचें मूळ संस्कृत 'हस्तकामलक' किंवा 'करतलामालक' असें आहे, व त्यावरूनच मराठींत 'हातचा मळ' याचा उपयोग आला आहे. १८ या श्लोकाचे आरंभीं धारल आहे तेथें धरिल पाहिजे. २० शितीकंठ वरें दिधलासि वरा=शितिकंठ हा कर्ता, तूं हें कर्म, दिधलासि क्रियापद कर्मणि प्रयोग. " ल प्रत्यय लागून जीं भूतकाळीं कर्मणि क्रियापदें होतात तीं प्रायः तृतीय पुरुषींच असतात; द्वितीय पुरुषीं व प्रथम पुरुषीं सर्वनामें धातूंचीं कर्मे असल्यास कर्मणीप्रयोग बहुत करून होत नाहीं; तर कर्मवाचक पदास स किंवा ला प्रत्यय लावून भावीं प्रयोग करितात." ( शाळा प. व्याक. नि. ) परंतु कवितेंत असे प्रयोग पुष्कळ आढळतात याचीं कित्येक उदाहरणें खालीं देतों:—

'मी आधींच कांहीं नेणें। वरी कवळिलों मोहें येणें,
श्रीकृष्णा विवेक या कारणें। पुसिला तुज.' ज्ञानेश्वर.

'भूप म्हणे तूं मुनिनें चित्तीं षडारिक्षयार्थ धरिलास.' मोरो. स्वर्गा प.

'वरिलासि मत्सखीनें, म्याही वरिलासि तूं मनें, मातें
पापापासुनि रक्षीं या माझ्या चालवूनि नेमातें.' मोरो. आदि.

' जाउनि तो सुत म्हणे ' कृष्णे, द्यूतांत तूं स्वयें धर्में
हारविलीस, सुयोधनसदनाप्रति ये करावया कर्मे. ' मोरो० सभा.

३० चिरंजीवी=जगाचे अंतापर्यंत वांचणारा. असे जिरंजीवी खालचे श्लोकांत आहेत:—

' अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च विभीषण:
कृप: परशुरामश्च सप्तैते चिरंजीविन: '

१७-१७ ' तरी इ० ' इतकें त्यानें केलें, तरी जो ऐकून मत्तकरी देखील भिऊन पळतात, त्या सिंहनादातें तो पामर क्षणभर तरी कसा करणार आहे ?

# भाग तिसरा.

१-१ समान-गुण=हिमालय वर्णामुळें शुभ्रद्युति, व शुक्र हा शुभ्रद्युति हे समान गुण. ३ ' जलामधिं ' येथें ' जयामाधें ' असें पाहिजे. ४ परिसर= भोंवतालचा प्रदेश. ५ तरी न मन इ०-तुझें भव्य स्वरूप पाहून जरी आनंद होतो, तरी मन तुला थोर मानीत नाहीं, तर ईश्वरास मानतें. ६ 'असे उदय पावतो' इ०='वाद्यांचा रव बहिर्विषयक आहे, तरी तो मनांतच उत्पन्न होतो. तशी हिमालयाची मूर्ति जरी दृष्टिविषयक आहे, तरी ती मनांतच जशी काय उत्पन्न होते; मग मानस प्रमोदभर होऊन निजा ( आपली ) चेतना विसरतें, व ईश्वरीं तल्लीन होतें; ' असा भाव ९ येथपासुन कवि पुढें पर्वत, नद्या, वगैरे यांस ईश्वरानें दिलेल्या गोष्टींची आठवण देऊन त्याचें स्तवन करावयास सांगतो. ११ इंद्रवज्राहतां= इंद्रवज्र ( विद्युलत्ता ) त्यानें आहत=फोडलेले; हें ' कांतळां ' याचें विशेषण. १२ भंगावलि=लाटांची पंक्ति. १४ प्रपात=धबधबे. १४ 'तुम्हां भास्करें वदा कवण रंग दे'=तुम्हास भास्कराकरवीं ( भास्करें, करणी तृतीया ) रंग कोणीं दिले तें सांगा ! पुष्पाकरें=वसंतऋतु करवीं. १५ सरल वृक्ष='सरल' नांवाचे वृक्ष. १६ गवय=वनगाई.

२-३ तशांत=तशा प्रकारचे जे त्यांत ( आसक्ति नसावी ). १३ कीं सोसितां इ०=अपकार सोलले असतां शरीर सात विती उंच असावयाचें तें सहा विती होत नाहीं; व अपकार न सोसितां आठ विती होत नाहीं.

३-२='देखतां चोर तैसें'=चोर दृष्टीस पडल्यावर जसा पळतो, त्याप्रमाणें इ० ४ निषिद्ध दर्शन=सूर्य उगवताच त्याचें दर्शन निषिद्ध मानिलें आहे. ७ ' पर्वत अंधकारास आपल्या गुहेत आश्रय देतात; व सूर्य त्याचा नाश-करण्यास आला, कीं त्याचे पाद ( पाय शिरीं धारण करितात; मग सूर्य आपले करांनीं ( हातांनीं; पक्षीं किरणांनीं ) त्यांस अभय देतो. ' असा एकंदर भाव. ८ येथें पूर्वदिशा व श्यामा ( रात्रि ) यांवर स्त्रीकल्पना कवीनें केली आहे. ९ पादप नें-पाया

पहून ( पक्षीं, किरणें पाहून. ) १० तद्वियोगासहमान=तत्-वियोग-असहमान तिच्या विरहास सहन न करणारा.

३-रामानें लंकेस जाण्यास बांधलेला सेतु पाहून कवी हा सेतु नव्हे, तर दुसरें काय आहे, याची कल्पना करीत आहे. १ कपि-कटकोत्तर-सिंधूद्गत=कपिकटक हाच एक उत्तरसिंधु त्यांतून उद्गत म्ह० निघालेला ५=प्रभुप्रताप हाच असित म्ह० अग्नि त्याचा मार्ग. रक्षोऽटवी=रक्षस्=राक्षस त्यांचें अटवी म्ह० अरण्य.

५-१ विशाला=विशाला व अवंती हीं उज्जयिनीचीं नांवें आहेत. उदयनभूप=उज्जयिनीस उदयन नांवाचा प्रख्यात राजा होऊन गेला. २ सुकृति जनांनीं इ०=पुण्यवान् लोक मेल्यावर स्वर्गी जातात, ते आपआपल्या पुण्याचे मानानें स्वर्गी वास करितात; तें पुण्य सरल्यावर पुनः पृथ्वीवर जन्म घेतात. त्यांचें थोडें थोडें पुण्य उरलें होतें, त्याचे जोरावर त्यांनीं स्वर्गाचा एकेक तुकडा आणून ती नगरी बनविली कीं काय, असा कवीचा भाव. ४ शिप्रावात=शिप्रानदीवरून वाहात आलेला वारा. ८ महांकाल=उज्जयिनीमध्यें महांकालेश्वर किंवा कालप्रियनाथ या नांवाचें एक मोठें शिवाचें देवस्थान आहे.

६ या उताऱ्याचे संबंधाचा कथाभाग असा आहे. भीष्माचे दोघे सापत्न बंधु चित्रांगद व विचित्रवीर्य यांच्या बरोबर लग्न करण्याकरितां भीष्मानें अंबा, अंबिका व अंबालिका या नांवाच्या तीन काशीराजाच्या कन्या युद्धांत हरण करून आणिल्या. त्यांपैकीं अंबा म्हणूं लागली, कीं मी मनानें शाल्व राजा वरिला आहे, तर मला तिकडे जाण्यास परवानगी दे भीष्मानें तिला जाऊं दिलें. पण ती शाल्वाकडे गेल्यावर त्या मानी राजानें सांगितलें, कीं तुझें मन जरी मजवर असलें, तरी दुसऱ्यानें जिंकलेल्या स्त्रीचा अंगिकार मी करणार नाहीं. यामुळें ती भीष्माकडे आली पण मी शाल्वास मनानें वरिलें आहे, असें तिनें अगोदर सांगितलेलें असल्यामुळें भीष्मही तिचा स्वीकार करीना. या अंबेचा आजा होत्रवाहन नामक राजा होता त्याचा व भीष्माचा गुरु परशुराम यांचें सख्य होतें; म्हणून हें गाऱ्हाणें परशुरामाकडे गेलें. तेव्हां आपला शिष्य भीष्म तिचा कसा अंगिकार करीत नाहीं पाहूं, अशा

दोलानें परशुराम भीष्माकडे आले आहेत. २ सुरापगांगभवा=सुरापगा-नी गंगा तिचा अंगभव=तिचे पासून जन्मलेला. ३ गरुडें सुधा इ०= गरुडाची आई विनता व सापत्न माता कद्रु यांच्यामध्यें कांहीं पण पडून विनतेस कद्रूचें दास्यत्व करावें लागलें. पुढें कद्रूला अमृत पाहिजे होतें तें गरुडानें पाताळांतून आणून दिलें, व मातेस सोडविलें. ९ छात्रांमृतांशु-जनक=छात्र म्ह० शिष्य हाच चंद्र, त्याचा जनक म्ह० समुद्र २४ जयमाशास्व=मला जय येवो असा आशीर्वाद द्या. २५ वंदावा गुरु हर्षद इ०=हा द्विजराज ( ब्राह्मण ) अमळ म्ह० शुद्ध आहे व द्विजराज म्ह० चंद्र हा मलिन आहे, म्हणून चंद्रानें यास नमन करावें

७ नारायणरावास मारल्यावर त्याला मारण्यांत राघोबाचा पूर्ण हात असावा, असा रामशास्त्री यांस संशय होता; पुढें त्यांस राघोबाचे हातचेंच खुद्द पत्र मिळालें; तेव्हां राघोबानें आपण धरण्याविषयीं हुकूम दिल्याचें कबूल केलें, व यास प्रायश्चित्त काय, म्हणून त्यानें शास्त्री बोवांस विचारिलें असतां त्या निस्पृह पुरुषानें हें ठशठशीत उत्तर दिलें आहे. २ ऐसें अकर्म=एवढें थोर जे तुम्ही त्यांस देहांत प्रायश्चित्त सांगणें हें अकर्म.

८ दुसऱ्या भागांतील सातवा उतारा व हा उतारा यांतील कथा-भाग एकच आहे दोहोंतील कविता ताडून पहाव्या. १ तत्-परिहित--आत्म-वास=तिनें नेसलेलें आपलें वस्त्र. ४ बंदी=स्तुतिपाठक; शुक्राचार्यांचें दुसरें नांव कवि होतें, म्हणून त्यास बंदी म्हटलें. ५ 'न सहस्र कर' इ० -माझा बाप सहस्र कर ( हात, पक्षीं किरण ) नसून सूर्यासारखा शोभतो; सूर्यास सहस्रकर हें नांव आहे. ७ तूं तों=तूं तर ११ महा-आपगा=मोठी नदी.

९-१ 'त्वत्तीरीं' इ० हें सर्व समुद्रास उद्देशून म्हटलें आहे. २ दिनराजबाळीं=यमुनानदी; यमुनेचें पाणी काळें आहे.

१०-५ कर्ण हा रामम्ह०=परशुराम याचा शिष्य होता. परशुरामापासून यानें विद्या कशी संपादन केली याबद्दल पहिल्या भागाच्या अकराव्या उताऱ्यावरील टीप पहा. ६ रिपुमद-महिषइ०-रिपुमद हाच कोणी महिषासुर त्याला महाशक्ति-भवानी प्रमाणें ८ 'दिव्यास्त्रज्ञ' इ० कर्णाचे

शरीरावर उपजतच सहज कवच व कर्णात अमृतमय कुंडलें होतीं. यामुळें त्याचा वध होणें कठीण होतें, म्हणून तीं कवच कुंडलें इंद्रानें ब्राह्मण रूपानें जाऊन मागितलीं. कर्णाची दातृत्वाचे संबंधाची कीर्ति सर्वप्रसिद्धच आहे. त्यानें इंद्रास कवच कुंडलें दिलीं. पण इंद्र त्याच्या दातृत्वामुळें प्रसन्न होऊन त्यानें त्यास वासवीशक्ति दिली—ही शक्ति एकवेळ उपयोगीं पडावयाची होती. व ती अर्जुनावर सोडावी असा संकेत होता, यामुळें पांडवांस मोठें संकट पडलें होतें. पण द्रोण सेनापति असतां कृष्णानें भीमपुत्र घटोत्कच याच्याकडून असा पराक्रम करविला, कीं तो जर त्या दिवशीं मेला नसता, तर संपूर्ण कौरवसैन्य नाश पावलें असतें. या प्रसंगीं कर्णानें निरुपायानें ही शक्ति घटोत्कचावर घातली, व पांडवही भयविमुक्त झाले. १२ सखेदमना=खेदयुक्त आहे मन ज्याचें; बहु. समा.

११—१ मुक्ति=हिला अन्यत्री कल्पिली आहे; व पुढें ती अनेकांस स्वीकारिते, म्हणून तिला कवि 'असती' म्हणतो. ३ पतिपरा=पतिव्रता.

१२ नारद मुनीनें एक वेळ द्वारकेस येऊन कृष्णास पारिजातकाचें फूल दिलें. तें कृष्णानें रुक्मिणीस दिलें, हें पाहून सत्यभामा कृष्णावर रुसून बसली आहे. ५ जो अनादि भवशोक इ०=जो हरी अनादि भवशोक हरण करितो, त्याला तिचा शोक हरण करणें कठीण नव्हतें असा भाव. ७ घडी जो मानाची इ०=जों मानाची घडी बिघडली असे, तोंवरि घडी ( घटकाभर ) डोळे न उघडी असा अन्वय. ८ घडी स्त्री जातीची इ०='स्त्री जातीची सुघडी (चांगली) घडी घडविली ( अशी ) ख्याति असे' असा अन्वय.

११ भीम व दुर्योधन यांचें युद्ध होऊन दुर्योधन मृतप्राय पडला आहे; त्यापुढील कथा या उताऱ्यांत आहे. १२ मूर्धाभिषिक्त इ०=दुर्योधन सार्वभौम राजा होता, म्हणून त्याचेवर यथाशास्त्र अभिषेक झाला होता, व मस्तकीं अनेक तीर्थांचें पाणीं पडलेलें होतें. म्हणून त्याचे मस्तकीं भीमानें पाय दिलेला धर्मास सुद्धां आवडला नाहीं. १६ अति-तापद-प्रभाव=अतितापद आहे प्रभाव ज्याचा; बहु. समा. २० अवीरा-शत-

धिकृत=अवीरा झालेल्या म्हणजे ज्यांचे पति-पुत्र रणांत मीं मारले आहेत अशा शंभर स्त्रियांनीं धिकार केला आहे ज्याचा असा.

१४ हे श्लोक भर्तृहरि कविकृत संस्कृत श्लोकांचें भाषांतर आहे. २ हरि, कवि, इ०रूपावळीचे आरंभींचें शब्द. १ तें स्थैर्य इ०=साधु लोकांस स्थैर्य म्हणून जें कांहीं तें नोहे इ० १२ ज्ञाति पंकेरुहाचें=कमळाचें भावंड म्ह० कमळा सारखें. १४ दे आपणास असतां=आपणास ( आपणा जवळ ) असतां म्ह० असलें तर ( दुसऱ्यास ) देतो. २१ कडे विकडिच्या=डोंगराच्या कड्याच्या पलीकडच्या. २५ न आनें=दुसऱ्या कोणच्याही वस्तूनें नाहीं. २९ दे आळवूनि इ०=हत्तीचा महात 'बाप, माई,' अशा हाका मारून जेव्हां घांस देतो, तेव्हांच हत्ती घेतो अशी हत्तीची मोठी बढाई आहे. ३२नीरे=उदकें; हें अनेक वचन आहे.

१५-२ हस्तीं करी वलय उंच इ०=हस्तीं ( सप्तमीचें एकवचन, हातातलें ) वलय उंच करी; अशा उपायीं भूपें कलहंस हळूच पायीं ( सप्तमी ) म्ह० पायाचे ठिकाणीं धरिला; म्हणजे त्याचा पाय धरिला; अर्थात् जो पाय लांबविला होता तो धरिला. ९ व १० हे श्लोक हंसानें स्वस्त्रीला उद्देशून म्हटले आहेत.

१६ केकावलि=मोराचें ओरडणें; कवीचें नांव मोरोपंत आहे, म्हणून त्यानें या काव्यास अन्वर्थक नांव दिलें आहे. १ नतें अनृत इ०=जनीं सदाचार बुध जें वर्णिती तें अनृत न; ऐकते व बोलते हीं बुध याचीं विशेषणें; ४ 'आयसे मणिहेमभूपातिस जोडिल्या न लाभ=ज्या भूपती जवळ रत्नें व सुवर्ण आहे, त्याचा जर लोखंडानें आश्रय केला, तर त्याला तो लाभप्रद होणार नाहीं. ६ गमो मधुर, व हरा परिस तूं बरा इ०= हर म्ह० शंकर एकदांच विष प्याला व तूं स्तुतिरूप विष सदां पितोस म्हणून तूं बरा. ८ भजकबर्हि-मेघा-भक्त हेच कोणी मोर त्यांचा मेघ. ९ कृतांत-कटकामल-ध्वज-जरा-यमाचे सैन्याचा शुभ्र ध्वजच अशी जी जरा ती. १० रजोमलिन काय-रजानें मलिन आहे काय ज्याचा; बहु. समास.

१७-१ घटोद्भव=अगस्त्य; हा तारा दक्षिणदिशेकडे आहे. व हा साऱ्या आकाशांतील ताऱ्यांत एक लुब्धक शिवाय करून सर्वांत चकच-

कीत आहे. याचें पर्जन्य काळाचे आरंभीं, बहुधा आषाढांत, अस्त होतें व तो पर्जन्य काळ संपल्यावर, बहुधा भाद्रपद महिन्याचे अखेरीस, पुन: उगवतो. याचे उदयास्त पंचांगांत लिहिलेले असतात.

१८–यमधर्म व सावित्री=सावित्रीचा पति सत्यवान् यास अरण्यांत सर्पदंश होऊन तो मरण पावला. त्याचा प्राण यम घेऊन जात असतां सावित्री त्याच्या मागून जाऊं लागली; व यमानें तिच्या नवऱ्यास पुन: सजीव केलें, तोंपर्यंत तिनें त्याची पाठ सोडली नाहीं. या वेळचा हा यम व सावित्री यांचा संवाद आहे. २ चक्षुस्तेज:संपन्न=चक्षुरूप जें तेज त्यांनीं युक्त. ३ मामाजी=सावित्रीचा सासरा, हा अंध झाला होता. ४ राज्य-भ्रंशें=राज्यापासून च्युति झाल्यामुळें, शत्रूंनीं राज्यावरून काढून लाविल्यामुळें ५ कीं जी हंसी हंसावांचुनि इ०=कीं जी हंसी हंसावांचुनि मानस बहु न मानिल, असा अन्वय. ७ हा लक्ष्मीसुत इ०=जें उमासुत ( गणपति ) न ( लिही, लिहूं शकत नाहीं ) तें सतीचें यश हा लक्ष्मीसुत कवि ( मोरोपंत; मोरोपंताचे आईचें नांव लक्ष्मी होतें ) किती लिहील ? ९ स्वच्छा=शुद्धकीर्ति, पतिव्रता. मागती घे= मागून येतेस. 'देतों मागोनी' इ० तिचे ( वर ) मागतीस ( जिनें मागितले तीस ) मागोनी ( मागून ) आणखी, चवथा देतों. १० स्वरगा=स्वर–अगा कल्पतरूला. १४ सत्यगुणासक्तमानस=सत्याचे जे गुण त्यांचे ठिकाणीं ज्याचें मन आसक्त आहे तो. १५ अ–विना भावें=विरह झाल्या खेरीज; अखंड.

१९ शंकरांनीं मदन जाळल्यावर तो पुढें कृष्णाचे घरीं जन्मास आला. व त्याचा शत्रु शंबर यानें त्यास पळवून नेलें. शंबराचे घरीं मदनाची बायको रति सेवा करून होती, तिला पुढें येणाऱ्या प्रसंगाची सूचना होती. २ कामरूप=इच्छिलेंरूप घेणारा, मायावी. अनिर्दश=ज्याला जन्मून दहा दिवस नाहीं झाले तो. १२ संसाराब्धि इ०=उतारा. १ भा १ श्लोक २ या वरील टीप पहा. कलितोद्दामगद=कलित म्हणजे घेतली आहे उद्दाम म्ह० मोठी गदा ज्यानें, बहु. स; विशे काम याचें. १५ साधिक्षेप-विवृद्धमन्यु खळ याचें विशे. साळसा=आळस करणारी, गदेचें विशे. तैसें जें इ०–ज्याप्रमाणें उद्धतगजानें हरिबालकोन्मुख यावें त्या-

प्रमाणें. १६ बाहे पाहे इ० =असा जो मदन त्याला जो युद्धाला बोलावितो, त्याचे आप्तांनीं त्याला तिळांसहित पाणी कां सोडूं नये ? म्हणजे तो मेलाच असें समजावें असा भावार्थ. १८ दिवसां-दिवसांनीं; तृतीया विभ०. १९ सुहृद्वार=सुहृदांचा समुदाय.

२० नीरजनाभाचा ( कृष्णाचा ) भाचा=अभिमन्यु. ३ ढिकावाणी =ढिकासारखा. ४ कृष्णसार=मृग; मृगांस गीत फार प्रिय असतें. ६ वासुदेववत्-कृष्णासारखा, समज=समजूत. ८ 'मी तद्घातक' इ० अर्जुनानें अभिमन्यूस चक्रव्यूहांत शिरण्याचें शिकवलें होतें. पण बाहेर कसें यावें, हें शिकविलेलें नव्हतें. १३ गुरुजनवर-आशी=गुरूजनांचे वर आणि आशीर्वाद. १४ विटशील=विटाचे स्वभावाचा, लबाड, फसव्या. १५ तोक-शोकाला=मुलाचे शोकास. १६ सोडु=स-उडु=नक्षत्रांसह; सर्व याचें विशे. सर्व शब्द निराळा पाहिजे.

२१ १ ही=गंगानदी. पुढील वर्णन गंगावर्णाना या सुरस काव्यांतून घेतलें आहे. २ तिला=दृष्टीला. १३-प्रवितत=फार पसरलेले असे जे विषोद्गार त्यांच्या गंधानें युक्त असे भाग; हे विषोद्गार म्हणजे मागें सांगितलेलीं पानें कुजून निघालेले विषोद्गार. २० नूतन ध्वनि=नूतन ध्वनि. २७ पातविशीर्ण-तूर्ण-शतधा-पडण्याचे योगानें शंभर ठिकाणीं तुटलेली.

२२-५बोला कशाला दुजें-दुसऱ्याची गोष्टच कशाला पाहिजे ?

# कठिण शब्दांचा कोश.

अकल्पित=अकस्मात्.
अखिल=सर्व.
अगम्य=समजण्यास कठीण.
अघ=पातक.
अजातारि=धर्म.
अज=ब्रह्मदेव.
अजित=परमेश्वर.
अजिन=कातडें.
अटवी=अरण्य.
अर्णव=समुद्र.
अतिरेक=अतिशय; वाढ.
अतिथि=पाहुणा.
अद्रि=पर्वत.
अधर=ओंठ.
अनल=विस्तव.
अनुगमन=मागून जाणें. [ लाल.
अनुरक्त=प्रीतियुक्त (पक्षीं) तांबस,
अनुक्षणी=प्रत्येक क्षणीं, क्षणोक्षणीं.
अनुज्ञा=परवानगी.
अनृत=खोटें.
अन्वय=वंश.
अप्रगल्भ=अप्रौढ; बालवयांतला.
अब्ज=कमल.
अब्धि [अप्+धि] समुद्र.
अभिराम=सुंदर
अभिमुख=समोर.
अभिधान=नाम.
अभीष्ट=इच्छिलेलें.
अभ्यंग=स्नानाचा एक प्रकार.
अमल=स्वच्छ, पांढरा.
अमृत=मुक्ति. [ असा, चंद्र.
अमृतकर=अमृतयुक्त कर ज्याचे
अरविंद=कमल.
अलवण=अळणी.
अलाबु=भोपळा.
अवगाहन=बुडी मारणें, स्नान.
अवथिलें=योजिलें.
अविनीत=दांडगा, मगरूर.
अशिव=अशुभ,कल्याणकारक नव्हे,
अश्मत=आपट्याचें झाड.
असि=तरवार.
असित=काळें.
अर्ह=योग्य.
अक्ष=फांसा.
अज्ञातवास=गुप्त वसती, कोणाला-
ही न उमगूं देतां रहाणें.
आकर=ठेवा, खाण
आकर्णोनि=ऐकून.
आगळें=अधिक, श्रेष्ठ.
आदेश=आज्ञा.
आधि=मानसीक दुःख.
आन=अन्य, दुसरा.
आनकदुंदुभि=वसुदेव, कृष्णाचाबाप.
आनत=खालीं केलेलें.
आप्ति=प्राप्ति.
आय=आयुष्य.
आयत=लांब.
आयतन=घर.
आयस=लोखंड.

आसव-दारू, रस.
आस्फालन=आदळणें.
इभ=हत्ती.
इभारि-हत्तीचा शत्रु, सिंह
इक्षु=ऊंस.
ईक्षण=पाहणें.
इंगळ=निखारे.
इंदिरा=लक्ष्मी.
इंद्रदंती=ऐरावत.
इंद्रवज्राहत=विजेनें ताडण केलेलें.
उखी=भांबावलेलो धाबरलेलो.
उच्चालिलें-उचललें.
उत्कट=अनिवार.
उत्तरा=अभिमन्यूची बायको.
उत्कर=अत्यंत.
उत्तमांग=मस्तक.
उत्तंस=तुरा.
उत्पादिसी-उत्पन्न करितोस.
उदित-उदय पावलेला.
उद्गत=बाहेर पडलेला.
उद्गम=आरंभ, उत्पत्ति.
उद्वेग=अस्वस्थता.
उद्यान=बाग
उन्मुख=समोर.
उपराग-ग्रहण.
उपल दगड.
उपवन=बाग.
उपाधि=व्यवधान.
उपानह=जोडा.
उपायन=भेटीला नेलेला पदार्थ.
उपेक्षा=हयगय.
उफाळति=उसळति, धांवति.
उमानणें=मोजणें; मापणें; उचलून धरणें.

उल्कापात=तारे पडणें उल्का=निखारा.
ऊदित=उद्युक्त, तयार, सिद्ध.
ऋद्धि=भाग्य.
ऋक्ष=आस्वल.
एणी=हरिणी.
ओक=घर.
ओखटा=तिरस्कारास्पद.
अंक=मांडी.
अंकित=चिन्हित.
अंगना=स्त्रिया.
अंगेना=अंग देशचा राजा कर्ण.
अंजन=काजळ.
अंतरिक्ष-आकाश.
अंदुक हत्तीचा साखळदंड.
अंबुरुह -कमल.
अंभोरुह=कमल.
अंशुमाळी-सूर्य=चंद्र.
कटीं -कंबरेंत
कडसणी=विचार
कदन=युद्ध
कनक सोनें
कमनीय-सुंदर
कर्णांत=कानापर्यंत
कर्णिकार=पांगाऱ्याचें झाड
कंथा=गोधडी
कर्दम-चिखल
कारण्डक=करंडा
करेणु -बालहस्ती
कलत्र=बायको
कल्पवृक्ष=इच्छा किंवा कल्पना कल्याबरोबर वस्तु देणारा वृक्ष—
कलाधिप=चंद्र.
कलानिधी=चंद्र.

कली=भांडण, तंटा.
कवि=ज्ञाते
कर्षक=शेतकरी.
कंदर=गुहा.
कंदुक=चेंडू.
कंधरा=मान.
कंसारी=कंसाला मारणारा (कृष्ण.)
काचावें=भीतिनें दडपून जावें.
कांचन=सोनें.
कार्पास=कापूस.
काम=मदन.
कामदुघा=कामधेनु.
कामरूप=पाहिजे तें रूप धरणारा.
कामारि=शिव.
कार्मुक=धनुष्य.
कालकूट=विष.
कालाही=काळसर्प.
कार्ष्णि=कृष्णाचा मुलगा प्रद्युम्न.
कासार=सरोवर.
कितव=जुगारी, लुच्चा.
किण=घट्टा, किणें=घट्टयानें.
किंकरी=दासी, चाकर (स्त्री)
किंशुक=पळस.
कीजे=करावें; कृधातूच्या कर्मणी वरून हें रूप झालें आहे.
कुचला=काजरा.
कुजात=वाईट कुळांत उत्पन्न झालेला.
कुटिल=वांकडा.
कुतूहल=कौतुक.
कुमुद=कमल.
कुवलय=कमल (चंद्राच्या उदयानें फुलणारें.
कुश=दर्भ.
कुशेशयाक्ष=कमलाक्ष; कमलासारखे आहेत ज्याचे डोळे तो.
कुसुमचाप=मदन.
कुंज=लतागृह=वेलींनीं बनलेलें घर
कुंती=पांडवांची आई.
कृती=शहाणा.
कृत्ती=कातडें.
कृष्णसार=मृग.
कृसर=तीळ, तांदूळ इत्यादिकांनीं युक्त पक्वान्न; खीर; खिचडी.
कयूरागद-(केयूर+अंगद) बाहुभूषण बाजुबंद.
केली=क्रीडा.
केशराजी=केशसमूह. केशकलाप.
केसरी=सिंह.
कैटभारी=विष्णु.
कोटी=कांब; संख्या विशे.
कोदंड=धनुष्य,
क्रतु=यज्ञ.
क्रय=कृषिव्यापार.
खग=पक्षी.
खेटक=ढाल.
खोटी=लगड; गोळा.
गतवयस्क=वय ज्याचें गेलें आहे, [ल]ातारा.
गणिका=वेश्या, कलावंतीण.
गवय=वनगाई.
गवाक्ष=खिडकी.
गव्हर=विवर.
गहन=खोल, अरण्य.
गर्हा=निंदा.
गाजी=शूर.
गात्र=शरीर.
गाढालिंगन=घट्ट मिठी मारणें.
गारद=नाश केलेला.
गांगेय=भीष्म.
गिरिजा=पार्वती

गो-वाणी
गीर्वाण=संस्कृत भाषा.
गुणागळा=गुणांनीं श्रेष्ठ. [ (खोल
गोष्पदोपम=गाईच्या पावला इतका
गोलांगुळ=वानर.
ग्रथित=बांधलेला.
घटना=बेत, निश्चय.
चकोर=एकेजातीचा पक्षी ( याला चंद्रोदय झाला म्हणजे आनंद होतो )
चक्र=एक शस्त्र; चाक.
चक्षु=डोळा.
चाप=धनुष्य.
चार=चेष्टा.
चैल=वस्त्र.
चंड=भयंकर; अतिउष्ण.
चंडांशु=सूर्य.
च्छगल=एकप्राणी.
छत्र=छत्री; राजच्छत्र.
च्छद्म=कपट.
छात्र=शिष्य.
जगदेकराय=जगाचा एक स्वामी, परमेश्वर
जगदंड=जग हेंच आंडें; ब्रह्मांड.
जतुगृह=लाखेचें घर.
जननीयंचळीं=आईच्या पदराखालीं
जन्हुकन्या=गंगा.
जयकाम=जयाची इच्छा करणार
जलजनाभ=जलज म्ह० कमळ आहे नाभीच्याठायीं ज्याच्या तो विष्णु
जलदभाज=मेघाची बायको ( वीज
जंबीर=कागदी लिंबू.
जाति=समुदाय; समूह.
जाया-भार्या.
जालक-जाळें,
जिष्णु=अर्जुन, इंद्र.
जीवन=पाणी.
झष=मासा.
टोप शिरस्त्राण.
ठकळा-छद.
ठेले-उभे राहिले; तिष्ठले या पासून हें रूप झालें आहे.
ढोर=झगा.
तडाग-सरोवर.
तती=समूह
तनया मुलगी.
तनु=शरीर.
तपन=सूर्य.
तर्पण=तृप्ति, संतोष, सुख.
तम=अंधार, काळोख.
तृष्णा=आशा, उत्सुकता.
तांडव=नृत्य.
तामरस=कमल.
तारक=नक्षत्र.
तारकाधिप=चंद्र
ताल=टाळ्या.
तितिंडिका-चिंच.
तिमिर=अंधकार.
तुकी=हालवी, डोलवी
तुंग=उंच.
तुंबी=भोंपळा.
तूळ-कापूस.
तेज=पराक्रम.
तोकडें=आंखुड.
तोखद=आनंद देणारा.
तोमर=एकशस्त्र.
तोय=पाणी.

तोष=आनंद, सुख.
त्राण=रक्षण.
थोकले=थांबले, उभे राहिले.
दल=पान; सैन्य.
दंभभारू=सोंग-ढोंगाचा-भार-आव.
दारक=बाळ.
दारा=बायको.
दावाग्नि=वणव्यांतला विस्तव.
दाश=कोळी.
दिग्गज=( दिक्+गज ) दिशांचे हत्ती.
( दिशांचें संरक्षण करण्यास त्यांचें शेवटीं हत्ती उभे केलेले आहेत अशी पौराणिक कल्पना आहे )
दिठी=दृष्टी, नजर.
दीप्त=आग लागलेलें. [ डित
दु:खदवार्ता=दु:खरूप वणव्यानें पी-
दुदुंभी=नगारा.
दुराप=मिळण्यास कठीण.
दुरित=पाप.
दूषितो=दोष देतो, नांव ठेवतो.
देवव्रत=भीष्म.
देवापगा=गंगा.
दोर्दंड=(दोस् × दंड )बाहूरूप दंड.
द्विज-भुक्त=ब्राह्मणांनीं खाल्लेलें.
द्विजराज=चंद्र-ब्राह्मणश्रेष्ठ.
द्विप=हत्ती.
द्विरद=हत्ती.
द्रुत=त्वरित, लौकर.
द्रुपद=द्रौपदीचा बाप.
द्रौणि=अश्वत्थामा.
धनद=कुबेर ( देवाचा खजीनदार. )
धनंजय=अर्जुन, अग्नि.
धनु=चार हाताचें माप.
धर्मगृह=यमाचें घर.
धवल=पांढरा.
धाले-तृप्त झाले.
धीवर=कोळी.
धूर्जटि-शिव.
ध्वांत=काळोख.
नर्तन=नाचणें.
नभ=आकाश.
नभ:प्रांगण=नभरूपी मैदान.
नलिन=कमळ.
नाक=स्वर्ग.
नातळे=स्पर्शत नाहीं.
नाबद=साखर.
निकर=समूह.
निकी=चांगली.
निकुंज=लतागृह.
निगदती=बोलती.
निर्जर=देव.
निर्जळ=ज्यांत पाणी नाहीं असा
निर्झर=प्रवाह.
नितंबिनी=स्त्री.
निबिड=घन, दाट.
निदान-कारण.
निधन=मरण.
निधी=ठेवा, सांठा, समूह.
निपट=केवळ.
निमाल्या-मेली असतां.
नियमी=आटोपी, दाबांत ठेवी.
निरोधिला=कोंडिला.
निवटिली=मारिली.
निवासास्पद=राहण्याचें स्थान.
निशाकर=चंद्र.
निष्पंक=निर्मळ.

नीर=पाणी.
नुति=स्तुति.
नूपुर=तोरड्या.
पटल=आच्छादन, झांकण.
पतित=पापी, पडलेला.
पतिपरा=पतिव्रता.
पद=स्थान, जागा, पाऊल.
पद्म=कमल.
पद्मज=ब्रह्मदेव.
पद्मभवांड=ब्रह्मांड.
पद्मा=लक्ष्मी.
पद्मिनी=कमलिनी.
पनस=फणस.
परस्व=दुसऱ्याचें धन-
पराग=बुका, रज:कण.
पराभूति=पराभव.
परासु=मृत, मेलेला,
परिचय=ओळख, संबंध.
परिजन=चाकर.
परिपूत=पवित्र.
परिमळ=सुगंध. [विशेष.
परिवेष=खळें, भोंवतालचा तेजो-
परिसर=समोंवतालचा प्रदेश.
परेशरत=ईश्वराच्या ठिकाणीं रत.
पर्यंक=पलंग.
पवन=वारा.
पशुपति=शिव, महादेव, सांब.
पंक=चिखल, पाप.
पंकेरुह=कमळ.
पंचशर=मदन
पटू=शहाणा.
पंजर=पिंजरा.
पाक=परिणाम.
पाचक=आचारी.
पाणि=हात.
पाता=रक्षण करणारा.
पाद=पाय, किरण.
पादप=वृक्ष.
पारद=पारा, परतीरावर पोंचविणारा.
पांथस्थ=प्रवासी.
पितामह=भीष्म.
पिनाक=शिवाचें धनुष्य.
पिनाकी शिव.
पिशुनता=दुष्टपणा, चहाडखोरपणा.
पीन=पुष्ट.
पीयूष=अमृत.
पुण्यश्लोक=पुण्यवान् पुरुष.
पुरहर=शिव (त्रिपुरांचा नाश करणारा,
पुराण=जुनाट.
पुरोहित=उपाध्याय.
पुर:सर=पुढें होणारा.
पुंगव=श्रेष्ठ. [आहेत असे.
पूरित काम=ज्यांचे हेतु पूर्ण केले
पूर्वसंचित=पूर्वी जमविलेलें (पाप-पुण्य)
पृच्छा प्रश्न.
पृतना=सैन्य.
पृथुनय=नीतिमान्. [असा.
पृथुनयन=ज्याचे डोळे मोठे आहेत
पैंजारा=खेटरें, वहाणा.
प्रकल्पित=कल्पना केलेली.
प्रचुर=पुष्कळ.
प्रज्ञा=बुद्धि.
प्रतोद=चाबूक.
प्रथित=विख्यात, नावाजलेला.
प्रपात=पडणें, धबधबा.
प्रभूत=पुष्कळ.

प्रमदा=स्त्री.
प्रवया=म्हातारा.
प्रवर=श्रेष्ठ, मोठें, प्रचंड.
प्रसून=फूल.
प्राज्य=पुष्कळ.
प्रेक्षक=पाहणारे.
प्रेक्षणें=पहाणें.
प्रेषी=पाठवी.
फणि=सर्प.
बजागो=मांडखोर, कजाग, रागीट.
बर्ह=मोराचें पीस.
बल्लव=आचारी.
बंक=चौकी.
बंदी=स्तुतिपाठक.
बाहती=बोलावतात.
बाष्प=अश्रु.
ब्रम्हसू=मदन.
भद्रासन=सिंहासन,
भणग=भिकारी.
भव=संसार, शिव.
भव्य=दैववान्, कल्याणप्रद.
भल्ल=भाला.
भंड=फजिती, नासधूस.
भागवत=भगवद्भक्त.
भार्गवी=शुक्राची कन्या, देवयानी.
[ च्या बापाचें नांव.
भीम=भयंकर, भीमसेन, दमयंती.
भीरु=स्त्रिया, भित्रा.
भृगुपुत्र=परशुराम.
भोगी=सर्प, उपभोग घेणारे.
मकरंद=फुलांतला रस.
मख=यज्ञ.
मणिबंध=मणगट.
मादरा=दारू ( पिण्याची )
मधु=द्राक्षाची दारू, एका दैत्या-
चें नांव.
मधुप=भुंगा.
मनोभिराम=मनाला आनंद देणारा.
मनोमुकुर=मनरूप आरसा.
मरुजनपद=मारवाड देश.
मशक=क्षुद्रप्राणी माशी, चिलट इ.
महाकाल=उज्जयिनी येथील प्र-
सिद्ध देवस्थान.
महानस=स्वयंपाक घर.
महापगा=मोठी नदी.
मही=पृथ्वी.
माकंद=आंबे.
माद्री=पांडु राजाची दुसरी बायको,
नकुल, सहदेवांची आई.
मायावी=कपटी.
मार=मदन.
मारुत=वारा.
मालिन्य मलिनपणा.
मीन=मासा.
मुदित=आनंदी.
मुरज=मृदंग.
मुरडितां=परत वळवितांना.
मुरहर=विष्णु, कृष्ण. ( मुर दैत्या-
ला मारणारा. )
मूर्त=साक्षात्, केवळ तोच.
मूर्धन्=डोकें, मस्तक.
मृगया=शिकार. [ ज्याचें, तो.
मृगांकानन=चंद्रासारखें आहे तोंड
मृत्युंजय=शिव.
मृषा=खोटी.
मोदाकर=आनंदाची खाण.
मोह=भ्रांति, घाबरेपणा.
मौर्वी=धनुष्याची दोरी.

यवस=एक प्रकारचें धान्य किंवा गवत.
यष्टि=काठी.
याजी=यज्ञ करणारा.
यामिनी=रात्र.
युग्म=दोन ( दोहोंचा समुदाय ), ( जोडी.
रज=धूळ, बारिक कण.
रजत=रुपें.
रजनी=रात्र.
रति=गोडी, आवड, हौस.
रथचरण-पाणी=विष्णु, चक्रपाणी.
रमेश=लक्ष्मीचा नवरा विष्णु, कृष्ण.
रथाधः=स्थळीं=रथाच्या खालीं.
रव=शब्द, नाद.
रसालतरु=आम्रवृक्ष.
रक्षोगण=राक्षसांचा समुदाय.
रात्रिंचर=राक्षस.
रामा=स्त्री.
रिझवी=आनंदवी.
रुचिर=सुंदर, सुरेख.
रोप=वाण.
रोमंथ=रवंथ.
रौरव=एक प्रकारचा नरक.
रंभापर्ण=केळीचें पान.
रंभोरु=रंभा म्ह० केळ तिचे सारख्या आहेत ऊरु म्ह० मांड्या जिच्या अशी स्त्री.
लक्ष=निशाण.
लाघव=
लाहो-लाभ.
लेखा-बरोबरी, साम्यता.
लेणें-आंगावर घालण्याचा दागिना अलंकार.
लोकबंधु-लोकांचा हितकर्ता.
लोचन-डोळा.
वक्त्र-तोंड.
वत्सल-दयाळू.
वदन-तोंड.
वदान्य-दाता.
वनिता-स्त्री, बायको.
वन्हि-अग्नि, विस्तव.
वपु-शरीर.
वलय-कडें, कंकण.
वर्षा-पावसाळा.
वसनांचल-वसन + अंचल-वस्त्रा. [ चा पदर.
वसुंधरा-पृथ्वी.
वक्ष-छाती, ऊर.
वृक-लांडगा.
वृत्र-इंद्राचा शत्रु.
व्यजन-पंखा.
व्यसन-संकट, दुःख.
व्रज-गोकुळ (गांव), समुदाय.
वृंद-समूह.
वंचन-फसविणें.
वंदारुता-वंदनशीलता.
वृष-कर्ण.
व्यवसाय-व्यापार, क्रिया काम.
वागुरा-जाळें.
वाजी-घोडा.
वादन-वाजविणें.
वार्धक्र-वृद्धवय, म्हातारपण.
वातप्रचालित-वाऱ्यानें हालविलेलें.
वापिका-विहीर.
वानोत-स्तुतिकरणें.
वामदेव-शिव.
वारण-हत्ती.
वारणावत-एका शहराचें नांव.
वारिकण-पाण्याचा थेंब.

वारी–पाणी.
व्याळ सर्प.
विकत्थन–बडबड.
विक्रम–पराक्रम.
विकोश–नागवी;म्यान नाहीं अशी.
विखी–विस्तृत, पूर्ण.
विचक्षण–चतुर, शहाणे.
विदेही–बैरागी
वितरती–पसरिती.
विधाता–ब्रम्हदेव.
विधी–ब्रम्हदेव.
विधु–चंद्र.
विनटतां–जडतां.
विपदा–दारिद्र्य, संकटें.
विपक्ष–शत्रु.
विपाक–परिणाम.
विप्राशी–ब्राम्हणाचे आशीर्वाद.
विपिन–रान.
विबुध–शहाणा, २ देव.
विभु–समर्थ, परमेश्वर.
विभूति–भस्म.
विमल–शुद्ध.
विरिंची–ब्रम्हदेव. [ सुख.
विलोचनसुख–दृष्टिसुख, पाहण्याचें
विवर–भोंक, गुहा.
विश्वेश–शंकर (विश्वाचा स्वामी.)
विषण्ण–खिन्न.
विषाद–राग, खेद.
विश्राम–विलास.
विहार–क्रीडा.
विहारी–विहार करणारा.
वेणु–पांवा,. पावरी.
वेतस–वेत.
वेझारा–खेपा.

वैखरी–वाणी, भाषण.
वोंगरिली–वाढिली.
वोपिली–दिली.
वोळगे–कडे, वळणें, मिळणें.
व्योम–आकाश.
शक्र–इंद्र.
शठ–टुच्चा.
शतकोटी–वज्र.
शतपत्र–कमळ.
शर्म–सुख.
शरदर्क–शरदृतूंतील सूर्य.
शराधि–भाता. [ तिकडे जाणें येणें.
शरतांडव–बाणांचा नाच, इकडून
शरासन–( शर + आसन ) धनुष्य.
शशांक–चंद्र.
शशिचूड–शशी आहे चुडेचे ठायीं म्ह० मस्तकावर ज्याच्या, शिव.
शल्य–सल.
शाटी–वस्त्र.
शांतनव–भीष्म.
शारद–शरदृतुसबंधीं.
शावक–बाळ.
शासन–आज्ञा.
शिखी–मोर.
शितिकंठ–शिव.
शिबिर–छावणी; डेरा, तंबू.
शिराणी=कौतुक.
शिलाराशी–कातळ.
शिव–कल्याण.
शिवा–कोल्ही.
शीतभानु–चंद्र.
शुचि–स्वच्छ, पवित्र.
शुभ्रांशु–चंद्र.

शेवीं–शेवटीं.
शैल–पर्वत.
श्री–शोभा, लक्ष्मी.
श्रीमरुत्वदंशाच्या–( मरुत्वत्, इंद्र ) इंद्राचा अंश, अर्जुन.
श्रीवत्सांक–कृष्ण ( त्याच्या हृदयावर श्रीवत्स नांवाचें चिन्ह आहे.
श्रुत–चांगल्या गोष्टी ऐकणें.
श्रुतिज्ञ–वेद जाणता.
षंढतिल–पोळ, बैल.
सकंटक–कांट्यानीं युक्त.
सकळवेदी–सर्व जाणणारा.
संघ–समूह.
सजणें–तयार होणें.
सत्यवती–भीष्माची सावत्र आई.
सदन–घर.
संदेश–निरोप.
संध्या=संध्याकाळ.
सपत्न=शत्रु.
समन्वित=युक्त.
समीर=वारा.
समुन्नत=उंच, उंची.
सम्राट्=मोठा राजा.
सर–सरोवर.
सरस्वती–वाणी, भाषण.
सराग=प्रीतियुक्त.
सरिता–नदी.
सरिसा–सारखाच.
सर्षप–मोहरी.
सलिल–उदक, पाणी.
सव्य–डावा.
सहचरी–सखी, मैत्रीण बरोबर ( असणारी.
सहिष्णुत्व–सहनशीलता.
संहृष्ट–आनंदित.
संभ्रम–घाई.
संभवला–जन्मला.
संभार–तयारी.
संसर्ग–संगती.
संसृति–संसार.
स्पृहा–इच्छा.
सृष्ट–उत्पन्न केलेलें.
स्पर्धा–बरोबरी करण्याकरितां झटणें.
स्मर–मदन.
स्वरगा=कल्पवृक्ष (स्वर+अग ).
स्वभावें–सहज, आपोआप.
स्वन–शब्द, स्वर, अवाज.
स्यंदन–रथ.
स्तन्य–दूध.
स्तनित–मेघगर्जना.
साकेताधिप–दशरथ ( साकेत=अयोध्ये. [
सासु–जिवंत.
साग्रज–वडील भावासह.
सायक–बाण.
स्वांत–मन.
सानु–शिखर.
साहंकृती–सगर्व, गर्विष्ठ.
स्वाध्याय–ब्राह्मणाचें नित्यकर्म.
स्वावास–आपली रहाण्याची जागा.
सिकतासेतु–वाळवेचा बांध.
सिगेला–मर्यादेला, अवधीला.
सिंधुर–एक राक्षस; हत्ती.
सित–पांढरें.
स्थित्यंतर–अन्यास्थिती.
सुचिर–पुष्कळ वेळपर्यंत.
सुधा–अमृत.
सुधाकर–चंद्र.

सुधी–शहाणा, बुद्धिवान्.
सुपर्ण–गरुड.
सुबाहू–एक राक्षस.
सुभद्रा–अर्जुनाची स्त्री, कृष्णाची बहीण, व अभिमन्यूची आई.
सुमुदित–आनंदित.
सुम–फूल.
सुमन–देव, फूल; गहूं.
सुरभि–कामधेनु सुगंधी.
सुरद्रुम–देवाचावृक्ष, कल्पवृक्ष.
सुरधुनी–गंगा.
सुरभि–सुगंधी.
स्रुक(ना)–तूप ओतण्याचें पात्र.
स्फुलिंगकण–विस्तवांचीं किटाळें.
स्रुव–तूप ओतण्याचें पात्र.
सूद–आचारी.
सूदन–मारणें, हनन.
सूप–स्वयंपाक.
सोपान–जिना.
सोम–चंद्र.
स्तोम–समुदाय.
सौदामिनी–वीज.
सौधाग्र–गची, घराचा कळस.
हर–शिव.
हरित–हिरवें.
हरिद्रा–हळद.
ऱ्हद–डोह.
हिम–थंडी.
हिमानी–बर्फ.
हुताश–अग्नि.
हेतु–कारण.
हेम–सोनें.
हेमाद्रिशृंगी–मेरु पर्वताच्या शिखरावर.
हेर–जासूद.
हेलावला–उचंबळला.
हंता–मारणारा.
क्षमी–क्षमावंत.
क्षितिभृच्छिर–क्षितिभृत्राजा किंवा पर्वत; त्यांचें शिर म्ह० मस्तक किंवा शिखर.
क्षिति–भूमि, जमीन.
क्षोभ–राग.

शेरवीं—शेवटीं.
शैल—पर्वत.
श्री—शोभा, लक्ष्मी.
श्रीमरुत्वदंशाच्या—( मरुत्वत्, इंद्र ) इंद्राचा अंश, अर्जुन.
श्रीवत्सांक—कृष्ण ( त्याच्या हृदयावर श्रीवत्स नांवाचें चिन्ह आहे.
श्रुत—चांगल्या गोष्टी ऐकणें.
श्रुतिज्ञ—वेद जाणता.
षंढतिल—पोळ, बैल.
सकंटक—कांट्यानीं युक्त.
सकळवेदी—सर्व जाणणारा.
संघ—समूह.
सजणें—तयार होणें.
सत्यवती=भीष्माची सावत्र आई.
सदन—घर.
संदेश—निरोप.
संध्या=संध्याकाळ.
सपत्न=शत्रु.
समन्वित=युक्त.
समीर=वारा.
समुन्नत=उंच, उंची.
सम्राट्=मोठा राजा.
सर—सरोवर.
सरस्वती—वाणी, भाषण.
सराग=प्रीतियुक्त.
सरिता—नदी.
सरिसा—सारखाच.
सर्षप—मोहरी.
सलिल—उदक, पाणी.
सव्य—डावा.
सहचरी—सखी, मैत्रीण बरोबर असणारी.
सहिष्णुत्व—सहनशीलता.
संहृष्ट—आनंदित.
संभ्रम—घाई.
संभवला—जन्मला.
संभार—तयारी.
संसर्ग—संगती.
संसृति—संसार.
स्पृहा—इच्छा.
सृष्ट—उत्पन्न केलेलें.
स्पर्धा—बरोबरी करण्याकारितां झटणें.
स्मर—मदन.
स्वरगा=कल्पवृक्ष (स्वर+अग ).
स्वभावें—सहज, आपोआप.
स्वन—शब्द, स्वर, अवाज.
स्यंदन—रथ.
स्तन्य—दूध.
स्तनित—मेघगर्जना.
साकेताधिप—दशरथ ( साकेत=अयोध्ये.
सासु—जिवंत.
साग्रज—वडील भावासह.
सायक—बाण.
स्वांत—मन.
सानु—शिखर.
साहंकृती—सगर्व, गर्विष्ठ.
स्वाध्याय—ब्राह्मणाचें नित्यकर्म.
स्वावास—आपली रहाण्याची जागा.
सिकतासेतु—वाळवेचा बांध.
सिगेला—मर्यादेला, अवधीला.
सिंधुर—एक राक्षस; हत्ती.
सित—पांढरें.
स्थित्यंतर—अन्यास्थिती.
सुचिर—पुष्कळ वेळपर्यंत.
सुधा—अमृत.
सुधाकर—चंद्र.

सुधी–शहाणा, बुद्धिवान्.
सुपर्ण–गरुड.
सुबाहू–एक राक्षस.
सुभद्रा–अर्जुनाची स्त्री, कृष्णाची बहीण, व अभिमन्यूची आई.
सुमुदित–आनंदित.
सुम–फूल.
सुमन–देव, फूल; गहूं.
सुरभि–कामधेनु सुगंधी.
सुरद्रुम–देवाचावृक्ष, कल्पवृक्ष.
सुरधुनी–गंगा.
सुरभि–सुगंधी.
स्रुक(ना)–तूप ओतण्याचें पात्र.
स्फुलिंगकण–विस्तवांचीं किटाळें.
स्रुव–तूप ओतण्याचें पात्र.
सूद–आचारी.
सूदन–मारणें, हनन.
सूप–स्वयंपाक.
सोपान–जिना.
सोम–चंद्र.
स्तोम–समुदाय.
सौदामिनी–वीज.
सौधाग्र–गच्ची, घराचा कळस.
हर–शिव.
हरित–हिरवें.
हरिद्रा–हळद.
ऱ्हद–डोह.
हिम–थंडी.
हिमानी–बर्फ.
हुताश–अग्नि.
हेतु–कारण.
हेम–सोनें.
हेमाद्रिशृंगी–मेरु पर्वताच्या शिखरावर.
हेर–जासूद.
हेलावला–उचंबळला.
हंता–मारणारा.
क्षमी–क्षमावंत.
क्षितिभृच्छिर–क्षितिभृत्‌राजा किंवा पर्वत; त्यांचें शिर म्ह० मस्तक किंवा शिखर.
क्षिति–भूमि, जमीन.
क्षोभ–राग.